
साप्ताहिक

२९ डिसेंबर ८४/२ रुपये

# माणूस

## देशातील सर्वोच्च सत्तास्थानाकडे चारजण




उत्कंठा
वाढवणारी
नवी
कादंबरी

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : एकतिसावा

¤

२९ डिसेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

राजू देशपांडे

# निवडणुकांच्या आदल्या दिवशी

१९८४ या वर्षाची ही अखेर अखेर. हे सगळे वर्षच एक मृत्यूवर्ष म्हणून ओळखले जाईल. सुरुवात झाली पंजाबपासून.धार्मिक अतिरेक्यांनी जवळ जवळ ४००–५०० हिंदूशीख नागरिकांना ठार केले. वर्षाच्या मध्याला सुवर्णमंदिर कारवाई झाली व या कारवाईत भिंद्रानवाले व त्यांचे सहकारी जसे मारले गेले तसेच हजारवाराशे लष्करी जवानही कामी आले. नंतर इंदिरा गांधींची निर्घृण हत्या व पाठोपाठ ज्येष्ठ काँग्रेस नेते यशवंतराव चव्हाण यांचा मृत्यू. भोपाळची दुर्घटना तर अविस्मरणीय. दक्षिणेत तामिळींची हत्या आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री रामचंद्रन यांच्याभोवती काही काळ घोटाळलेला मृत्यू.एका वर्षात इतके मृत्यू यापूर्वी कधी घडले नसतील. मृत्यू न म्हणे भूपती । मृत्यू न म्हणे गजपती...हयपती... । या रामदासांच्या ओव्यांची आठवण व्हावी इतका सर्वव्यापी असा हा या वर्षीचा मृत्यूचा सार्वत्रिक संचार होता. निदान आपल्या कडचा. आफ्रिकेतल्या दुष्काळात लाखो माणसे मृत्युमुखी पडली ती वेगळीच.

या मृत्यूवर्षाच्या शेवटी आल्या निवडणुका. हा अंक वाचकांच्या हाती असेल तेव्हा त्या संपल्या असतील; पण निकाल मात्र जाहीर झालेले नसतील. मृत्यूचे सावट असल्याने म्हणा किंवा कोणतेही प्रश्न, कोणताही विचार धसाला लागणार नसल्याने म्हणा, निवडणुकात चुरस यावेळी निर्माण झाली नाही, वातावरण म्हणावे असे तापले नाही. मोठ्या सभा यावेळी झडल्याच नाहीत. अपवाद फक्त पंतप्रधानांच्या झंझावाती सभांचा व मुंबईत शिवाजी पार्कवर झालेल्या अटलजी-शिवसेना यांच्या एका संयुक्त सभेचा. लाखाच्यावर जनसमुदाय जमला अशा आपल्या भागातल्या सभा एवढ्याच. बाकी सगळा भर लहान सभांवर, भित्तीपत्रकांवर व वृत्तपत्रीय जाहिरातींवर. यातही एक फरक जाणवण्यासारखा. पोस्टर्स, जाहिराती यात काँग्रेस (आय) ची आघाडी तर विरोधकांचे माध्यम लहान सभा. महाराष्ट्रात शरद पवार काँग्रेसच्या जाहिराती मोठ्या होत्या तरी काँग्रेस (आय) च्या मानाने त्या कमीच. दूरदर्शन, आकाशवाणीचा वापरही झाला. पण दूरदर्शनवरील पक्षनिहाय प्रसारण योजनेतील भाषणमालिका अगदीच निर्जीव. दूरदर्शनचा खरा लाभ झाला राजीव गांधींना. इंदिरा गांधींवरील सर्व अन्यसंस्कार दूरदर्शनने दाखविले.राजीव गांधींची एक सालस व गंभीर प्रतिमा या संस्कारदर्शन कार्यक्रमामुळे आपोआप जनमानसावर उमटली, ठसवली गेली. ही प्रतिमा निवडणुकांच्या वेळी राजीव गांधींना चांगलीच उपयोगी पडली. दूरदर्शन माध्यमाचे लोणी अशा तऱ्हेने गेले राजीव गांधींकडे व विरोधकांच्याहाती आले निर्जीव भाषणांचे ताक पाणी. तरी वाटले होते. तेवढे विरोधक या इंदिरा–राजीव यांच्या दूरदर्शन लाटेमुळे खचले झाले नाहीत. सगळीच परिस्थिती प्रतिकूल. सामना विषम. काँग्रेस (आय) जवळ सत्ता आणि संपत्तीचा महापूर. त्या मानाने विरोधकांजवळची साधन–संपत्ती अगदीच तुटपुंजी. वेळ कमी. तरी विरोधक लढले चांगले. त्यांनी आपापसातील मतभेदांची, फाटाफुटीची दरी खूपच बुजवली. महाराष्ट्रात बहुसंख्य ठिकाणी विरोधकांना एकी करण्यात यश प्राप्त

झाले, ही वस्तुस्थिती आहे. प्रचाराचा दर्जाही त्यांनी चांगला ठेवला. राजीव गांधींच्या घणाघाती आरोपांना विरोधकांनी तेवढीच खणखणीत व बिनतोड प्रत्युत्तरे दिली. पंजाबप्रश्नाबाबत तर राजीव गांधींचे विरोधकांवरील बेफाट आरोप अगदीच बिनबुडाचे ठरले. सवालांना जवाब व्यवस्थित दिले गेले, हल्ले परतावण्यात विरोधकांना यश लाभले. विरोधकांकडून तरी अशा परिस्थितीत आणखी किती अपेक्षा बाळगायच्या ?

कुठल्याही विचारांचा संघर्ष या निवडणुकीत अग्रभागी नसला तरी वैचारिक अदलाबदल गंमतीची झाली. राजीव गांधी अखंड भारताचा पुरस्कार करत होते तर विरोधकांना अल्पसंख्याकांची काळजी वाटत होती. परकीय शक्तींच्या हस्तक्षेपाचा, बड्या राष्ट्रांच्या कारवायांचा धोका राजीव गांधी वरचेवर जाणवून देत होते तर कम्युनिस्टांसह सर्व विरोधी पक्षांना महागाई–भ्रष्टाचार हे विषय महत्त्वाचे वाटत होते. भारतात एकूण तीन राजकीय प्रवाह अस्तित्वात आहेत. कम्युनिस्ट, हिंदुत्ववादी आणि काँग्रेस. कम्युनिस्ट आणि हिंदुत्ववादी या दोन टोकांच्या विचारप्रवाहातील त्या त्या वेळी महत्त्वाचा ठरलेला व लोकमानसाची पकड घेतलेला भाग उचलून, त्यांचे आकर्षक राजकीय घोषणेत रूपांतर करून काँग्रेस आपली मध्यममार्गी वाटचाल करीत आली, सत्ता आपल्याकडे राखण्यात काँग्रेसला यामुळे कायम यश लाभले. काँग्रेसची स्वतःची अशी ठाम विचारसरणी नाही. नवीन एखादा विचारप्रवाह काँग्रेसने निर्माण केला नाही. डावीकडून, उजवीकडून त्या त्या वेळी आपल्याला हवे ते उचलणे व सत्ता कायम ठेवणे हा काँग्रेसचा खाक्या. बँक राष्ट्रीयकरणासारखा एखादा कम्युनिस्ट कार्यक्रम उचलून कधी ती समाजवादी रूप धारण करते तर बांगलादेश युद्धात पाकिस्तानचा पराभव करून किंवा शीख अतिरेक्यांचा बीमोड करून ती राष्ट्रीय एकात्मवादी म्हणजेच हिंदुत्ववादी भूमिका पार पाडते. नेहरूंनी समाजवादी समाजरचना हे काँग्रेसचे ध्येय ठरवल्यानंतर समाजवादी पक्षांच्या अस्तित्वाला तसा अर्थच उरला नाही. म्हणून हा पक्ष पुढेपुढे तुटत, खचत गेला. तशीच परिस्थिती कम्युनिस्ट, हिंदुत्ववादी यांच्याबाबतीतही निर्माण होऊ शकते. उद्योगधंद्यात जसे मोठे व प्रचंड कारखाने छोट्या व मध्यम कारखान्यांचे शोषण करीत असतात, छोट्यांचा माल घेऊन, त्यावर आपल्या नावाचे शिक्के उमटवून वरचेवर नफा कमावीत असतात, त्याचीच ही राजकारणातली आवृत्ती आहे. मोठा मासा लहान–मध्यम वगैरे सगळ्याच माशांना गिळत असतो. शिवाय राजसत्तेजवळ इतकी संपत्ती, साधनसामग्री, अधिकाराची पदे एकवटलेली असतात की छोटेमोठे विरोधी गट, चळवळी सहज या सत्तेला विकत घेता येतात, वाकवता येतात–त्यातील स्वत्व काढून घेऊन त्या निर्जीव करता येतात. गेल्या दशकात शेतकरी चळवळ उदयास आली. लगेच इंदिरा गांधींनी दिल्लीत भव्य शेतकरी मेळावा आयोजित केला व आपण, काँग्रेस पक्ष कसा शेतकऱ्यांच्या बाजूने आहे हे लोकांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला. मागासलेल्या देशात हा धोका तर फारच मोठा आहे व राजकीय पक्षच काय, सांस्कृतिक संघटना धार्मिक संस्थाही राजसत्तेच्या सर्वंकष प्रभावापासून स्वतःला अलिप्त ठेवू शकलेल्या नाहीत. मागासलेल्या देशात त्यामुळे विरोधी पक्ष वाढत नाहीत. लोकशाही मार्गाने सत्ताबदल सहसा होत नाही. ७७ साली भारतात घडले तो एक अपवाद होता. पाकिस्तानात झियांची राजवट चालूच राहते–लोकमत प्रतिकूल असतानाही. आपल्याकडे झिया अद्याप डोके वर काढत नाहीत याला कारण केवळ पं. नेहरूंनी केलेले लोकशाहीचे बीजारोपण, एवढेच नाही. श्रेयाचा काही वाटा विरोधकांकडेही जातो. २८ महिन्यांची दिल्लीतील जनता राजवट आपापसातील फाटाफुटींमुळे कोसळली असली तरी तिने या अल्पावधीत बजावलेली कामगिरी अगदीच निराशाजनक नव्हती. आणि राज्याराज्यातून विरोधकांनी सरकारे चालवून दाखविलेली आहेतच. कर्नाटकात भाजप–कम्युनिस्ट यांच्या पाठिंब्यावर जनता पक्षाचे सरकार चालू आहे. या सरकारची कामगिरी मागील गुंडुरावांच्या काँग्रेस (आय) सरकारपेक्षा निश्चितच उजवी आहे. आंध्र–तामिळनाडूमध्ये विरोधकांचीच सरकारे आहेत. तेव्हा असे एखादे सरकार दिल्लीत आले तर दिल्ली कमजोर होईल, केंद्रसत्ता दुबळी होईल, देशाची एकात्मता–अखंडता धोक्यात येईल अशी हाकाटी पिटण्यात अर्थ नाही. देशभक्तीचा मक्ता काही काँग्रेस (आय) लाच कुणी बहाल केलेला नाही. अर्थात या निवडणुकीनंतर लगेचच असे एखादे संयुक्त सरकार दिल्लीत सत्तारूढ होईल असे नाही. आज तरी काँग्रेस (आय) विजयाची शक्यता अधिक दिसते. राजीव गांधींविषयी लोकमानसात, विशेषतः तरुण वर्गात, झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकात निश्चितच सहानुभूती आहे. मध्यमवर्ग मात्र साशंक आहे व तो बहुधा विरोधी मतदान करण्याचा संभव आहे. शेतकरी वर्ग हा पूर्वी काँग्रेसचा बालेकिल्ला; पण या वेळी हा किल्ला ढासळलेला आहे. त्यामुळे मतपेटीतून काय बाहेर पडते या विषयी सगळेच संभ्रमात आहेत. कोणी म्हणतात 'लाट' आहे कोणी म्हणतात नाही. वृत्तपत्रेही हातचे राखूनच अंदाज व्यक्त करीत आहेत. सगळीच अनिश्चितता. आठवड्याभरात ही अनिश्चितता संपेल व आपण नव्या वर्षात पदार्पणही करू. हे नवे वर्ष काय भेट घेऊन येते ते पहायचे !

–श्री. ग. मा.

# आधुनिक व्यवस्थापन

## आत्मा हरवलेल्या यंत्रणेकडून कार्यहानीचा खटाटोप

निवडणुकांचे निकाल लागायला आता सुरुवात होईल; पण ते लागण्या-आधीच भारतीय राजकारणात काही नव्या प्रवृत्ती येऊ लागल्या आहेत. व्यवस्थापकीय तंत्र ही त्यापैकीच एक.

कसे असते हे व्यवस्थापकीय जग ? उद्योग, प्रशासन, लष्कर या सगळया-मध्ये व्यवस्थापकीय तंत्र वापरले तर काय होईल ? सी. नॉर्थकोट पार्किन्सन व डॉ. लॉरेन्स पीटर यांनी आधुनिक व्यवस्थापनातील कारभारावर मर्मभेदक प्रकाश टाकला आहे. त्यांच्या विचारांचा हा परिचय.

**ज. शा. देशपांडे**

इ. स. १९५८ मध्ये सी. नॉर्थकोट पार्किन्सन यांनी एक सिद्धांत मांडून मोठी खळबळ उडवली. त्यानंतर १९६० मध्ये त्यांनी दुसरा एक सिद्धांत मांडला, व १९६२ मध्ये तिसरा एक सिद्धांत मांडला. १९७० मध्ये त्याने विलंबाचा सिद्धांत प्रकाशित केला. दिवसेंदिवस या सिद्धांतांची सत्यता तीव्रतेने अनुभवास येत आहे.

### अधिक माणसे, अधिक घोळ

जेवढा वेळ उपलब्ध असेल तेवढे काम वाढवले जाते हा त्यांचा पहिला सिद्धांत. या सिद्धांतानुसार वेळ भरून काढण्यासाठी काम वाढते व काम वाढले म्हणून कर्मचारी संख्या वाढते. काम–कर्मचारी संख्या यांचा संबंध राहात नाही. खूप माणसे कामावर असली की खूप काम असते असे मुळीच नाही. सर्वजण निरर्थक कामे निर्माण करून हाताखाली माणसे वाढविण्याचा उद्योग करतात. समजा अ व ब दोन अधिकारी आहेत व अ थोडासा वरचा आहे. वय वाढल्याने किंवा कदाचित थोडेसे काम वाढल्याने किंवा आपल्या जागेचे महत्व वाढावे म्हणून अ, बचे सहकार्य घेण्याऐवजी आपल्या हाताखाली दोन जागा निर्माण करतो व त्यावर क आणि ड विराजमान होतात. मग जे काम एकटा अ करी तेच काम क, ड व नंतर अ पाहतो. कालांतराने क व ड काम वाढल्याची तक्रार करतात व त्यांच्या प्रत्येकाच्या हाताखाली दोन दोन माणसे येतात. पूर्वी जे काम अ एकटाच करी तेच काम आता अनेकांच्या हातून होते व भरपूर विलंब होतो. अ आता खाते प्रमुख झालेला असतो व तो रात्ररात्र कचेरीत बसतो. केस पिकलेला अ यश मिळवण्यासाठी कसे कष्ट पडतात याची रसभरीत हकीकत श्रोत्यांना सांगतो. रेडिओ, टी. व्ही. वर त्याच्या मुलाखती होऊन तो प्रसिद्ध असामी होतो.

अशाच तऱ्हेने मंत्रिमंडळे, समित्या, संचालकमंडळे सतत वाढत राहातात. त्यात काही जराजीर्ण, बहिरे, अपंग असतात व कामकाजाचा गंध कुणालाच नसतो. त्यांच्यात एक दादांचा गट तयार होऊन तो वाटेल ती कामे मंजूर करून घेतो. विधिमंडळे अशीच चालतात. कंपन्यांच्या वार्षिक सभा म्हणजे लहान विधिमंडळेच. तिथेही ह्याच प्रकार चालतो. भागधारकांचा प्रभाव पडत नाही व सत्ताधारी गट हवे ते करतो.

वरील नियमामुळे काही गोष्टी लक्षात येतात. सेनापतींची संख्या व शत्रूची हानी यांचे व्यस्त प्रमाण असते हा एक त्या संदर्भातला महत्वाचा शोध आहे.

### फालतूपणाचा उपसिद्धांत

मुख्य सिद्धांतावरोबर एक फालतूपणाचा उपसिद्धांत मांडता येतो. प्रकरणाचे महत्व व खर्च यांच्या व्यस्त प्रमाणात त्यावर विचार करण्यात वेळ घालवला जातो हा तो उपसिद्धांत. अणुभट्टीसाठी कैक कोटींचे कंत्राट चर्चेला आले तर त्याबद्दल कोणाला काही कळत नसल्याने कोणी काही बोलणार नाही व त्यावरचा ठराव दोन मिनिटात मंजूर होईल पण शंभर रुपयांच्या फालतू खर्चावर दोन तास खडाजंगी होईल.

आवक होईल तसा खर्च होतो हा दुसरा सिद्धांत. पगार वाढला की खर्च आपोआप वाढतो याचा प्रत्येकाला अनुभव येतो. संस्थेतही तोच प्रकार घडतो. अनुदाने पाहिली की त्या संस्था खर्च वाढवून उधळपट्टी करतात; पण शासन नावाच्या संस्थेला आवक या बाबतीत मर्यादा नसते कारण ती हवा तसा कर बसवू शकते. इतकी आवक तेव्हा इतका खर्च करायचे असे न म्हणता, इतके पैसे खर्च करायचेत तर कोणते कर बसवावे असे सरकार पाहाते. सरकारी हिशोब असे मांडले जातात की त्यात वस्तुस्थिती लपवली जाते. त्यामुळे त्याच्यामागे लपलेली उधळपट्टी लोकांना कळत नाही. कर कुठपर्यंत वाढवायचे ? कर एक तृतीयांशावर जाऊ नयेत असे पुष्कळांचे म्हणणे आहे; पण ही सीमा ओलांडली जाते. परचक्र, लढाई अशा आणीबाणीच्या काळात कर येतात; पण ती गेली तरी कर राहातात. कर फार वाढले की राष्ट्रातला उत्साह नष्ट होऊन ते खच्ची होते व त्याची पत घसरते. लोक म्हणतात की एवीतेवी सरकार आपल्याकडून पैसे उकळून ते उधळणार. मग आम्ही कर चुकवले तर बिघडले कुठे ?

### कर कसे चुकवावे

कर कसे चुकवावे याचे शास्त्र झाले आहे. त्यातला एक राजमान्य मार्ग म्हणजे तोटघात चालणाऱ्या कंपन्या तयार करणे अथवा विकत घेणे. या बहुधा शेती, कुक्कुटपालन अशा व्यवसायातल्या असतात. तेथे भरपूर पगारावर नातलग असतात. घरातला खाजगी खर्च कंपनीच्या खाती जातो व कंपनी तोटयात येऊन दुसरीकडचा फायदा कमी होतो. कराच्या सवलतीतही असाच प्रकार घडतो. कुणी अपंग संस्था उभारतात व त्यांना करमाफ देणग्या देतात. प्रत्यक्षात तिथेही नातलगच लठ्ठ पगारावर असतात. वरती अशा संस्था चालवण्याबद्दल गौरव होतो. संशोधन विभागाचीही तीच तऱ्हा.

सवलती दिल्यास काही वेळा त्याचा कसा दुरुपयोग होतो याचे एक विलक्षण उदाहरण आहे. एका उष्ण प्रदेशात सरकारने साप मारण्यास बक्षिसे ठेवली. त्याबरोबर लोकांनी सापांची पैदासच सुरू केली. ज्या देशात लोक मोठ्या प्रमाणात कर चुकवतात तो देश घोर अवनतीच्या मार्गावर जातो यात शंका नसते.

### उधळपट्टी, काटकसर

आता उधळपट्टीने व्यापले नाही असे एकही क्षेत्र नाही. शास्त्र, वाङमय, कला यांच्या संस्थाही उधळपट्टीत गर्क असतात. प्रत्येक शास्त्रज्ञ व साहित्यिक स्वतःचे मासिक काढतो, त्याचा दर्जा कोणी पहायचा? शासनाचे अनुदान मात्र लगेच मिळते. शाळांसाठी भव्य इमारती बांधल्या जातात, त्यात अनेकजण हात धुवून घेतात. आतल्या शिक्षणाचा दर्जा मात्र विचारू नका. लोककल्याणाच्या नावाने होणारी उधळपट्टी थांबवली तर लोकांचे कल्याण होईल असे जेफरसन म्हणाले होते. दिवसेंदिवस शासकीय पुस्तिकांची संख्या वाढत आहे. त्या कुणीही वाचत नाही व दरवर्षी प्रचंड प्रमाणात कागद फुकट जातो, मात्र त्यावर अनेक मुद्रणालये जगतात. तीच गत प्रसिद्धी, प्रकाशने व जाहिरातींची. काम मिळवण्यासाठी मुद्रणालये, जाहिरातवाले इत्यादी व्यावसायिक कमिशन देतात. अनेक वेळा शासनाची निरनिराळी खाती एकमेकांविरुद्ध जाहिराती देतात. या अनागोंदीत वरच्या कुणाला तरी काटकसर आठवते व त्यात आवश्यक अनावश्यक सर्व खर्चात काही टक्के कपात होते व वीज, कागद इत्यादी फालतू खर्चावर संक्रात येते. म्हणजे अनावश्यक खर्च बहुतेक तसाच चालू राहातो.

### कागदी कामे

कागदी कामे वाढत चाललीत. दवाखान्यात नर्स पेशंटकडे लक्ष देण्याऐवजी रुमाल, कपडे अशा वस्तूंचे हिशेब पाहात बसतात. कागदी काम करणारे डॉक्टर व तंत्रज्ञ निर्माण होत आहेत. संस्थेवर देखरेख करण्याच्या निमित्ताने सल्लागार समित्या, तज्ज्ञ यांची बांडगुळे तयार होतात. कागदी कामांचा पसारा इतका वाढला आहे की, शेवटी राज्यकारभार फक्त कागदावर चालेल.

नोकरशहांना काय किंवा लोकप्रतिनिधींना काय छोट्या गोष्टी करणे आवडत नाही. त्यात लभ्यांश नसतो. फ्रान्समध्ये सेंद्रिय कचरा, घाण इत्यादीपासून खत व गॅस मिळवता येतात व गॅसवर गावाला छोट्या प्रमाणात वीजपुरवठा करता येतो हे सप्रमाण सिद्ध झाले; पण नोकरशहांना अशा छोट्या गोष्टी नकोत. त्यांना वाटेल तेव्हा बंद पडणारी 'ग्रिड' हवी.

### कर्मचारी

या उधळपट्टीच्या कारखान्यात काम करणाऱ्यात एक वर्ग बुद्धिमान असतो. त्याला निरर्थक कामे करतो हे कळते. तो गोष्टी सुधारण्याचा प्रयत्न करतो; पण आपले म्हणणे कोणी ऐकत नाही हे समजल्यावर ते संस्था सोडून जातात किंवा कसे तरी दिवस घालवतात. दुसऱ्या अल्पबुद्धीच्या बहुसंख्य वर्गाला आपण मोठे काम करीत आहोत अशी घमेंड असते व आपण आहोत म्हणूनच कचेरी चालते असे त्यांना वाटते. कर्मचाऱ्यांना अनेकदा काही केले तरी जाब


## WASP PUMP FOR EVERY PURPOSE

1. **High pressure pumps to work against 600 kg / cm²**
2. **Deepwell Pumps to draw water from 100 meters depth.**
3. **Pumps for pumping Chemicals, Acids and Corrosive Liquids.**
4. **High Pressure Multistage Pumps.**

**M/s. Water Supply Specialists Pvt. Ltd.**

House of "WASP" Pumps,
151, Thambu Street,
P. B. No. 1707, Madras - 600 001.
Telephone Nos. 23436 & 27225
Telegram : PUMPMEN.

विचारला जातो, मात्र जिथे खरोखरी जाब विचारला पाहिजे तिथे कोणी विचारीत नाही. नवीन सत्ताधीश झाले की, पूर्वीच्या सत्ताधीशांच्या मर्जीतल्या लोकांवर नवीनांची अवकृपा होते. त्याचा परिणाम कोणी जबाबदारी घेत नाही, कागद खालीवर फिरत राहातात आणि काम वाढते. दुसरीकडे कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढत असतात व त्या ऐकायला कोणी नसते. मोठ्या शहरात दोन तीन तास प्रवास करून सुखरूप कचेरीत पोचेपर्यंत कर्मचारी अर्धमेला झालेला असतो, तो काम काय करणार ? संध्याकाळी परत जाताना तीच तऱ्हा. अशा अवस्थेत कामे कशी होणार ?

या परिस्थितीत सामान्य नागरिकांचे काय ? त्याला कोणीही नकार देणे सोपे असते. त्यात एकापेक्षा जास्त खात्याशी त्याच्या कामाचा संबंध आला की संपलेच दोन्ही खाती टोलवाटोलवी करणार. नियमांचे खुसपट काढून नकार देणे फार सोपे असते, खुसपट काढून विलंब करणे हा नकाराचाच प्रकार होय. यालाच विलंबाचा नियम म्हणतात. नागरिकांना छळणाऱ्या अशा यंत्रणेत आत्मा नसतो व सर्व मूल्य नष्ट झालेली असतात. मग वाङमय, सौंदर्य, कला प्रेम इ• शब्दांना अर्थ उरत नाही.

### तज्ज्ञ व सल्लागार

संस्थात बेबंदशाही सुरू झाली की त्या सुधारण्यासाठी तज्ज्ञ व सल्लागार उत्पन्न होतात. ते कुठे व काय शिकले हे कोणीच विचारीत नाही. त्यांना कसलेच ज्ञान नसते व त्यांना समजते असे फक्त त्यांच्या नावाची पाटी म्हणते. त्यांच्या नेमणुकीत संस्थाचालकही आपला खिसा भरतात. तीच गोष्ट शासकीय संस्थात होते. कार्यक्षमता कोणाचीच सुधारत नाही.

### तिसरा सिद्धांत

आता राष्ट्राची सीमा ओलांडणाऱ्या आंतरराष्ट्रीय (मल्टिनॅशनल) प्रचंड कंपन्या झाल्या आहेत. त्यांना राष्ट्र ही भावना नसते अधिकाऱ्याच्या पायऱ्या, त्यांचे साचेबंद पालन, सैन्यासारखा एकसूत्रीपणा व सारखेपणा त्यात तयार होऊन नियम, पूर्वापार रूढी इ. गोष्टी व्यक्तिगत संबंधाची जागा घेतात. सर्वांना वाटते आपली संस्था अमर आहे; पण जगात अमरपट्टा कुणालाच नाही. इथे तिसरा सिद्धांत येतो. संस्थेची वाढ झाली की गुंतागुंत वाढते व गुंतागुंत वाढली की ऱ्हास सुरू होतो.

संस्थेच्या ऱ्हासाच्या पहिल्या अवस्थेत नालायक लोक संस्थेत घुसतात व नको तेथे ढवळाढवळ करू लागतात. दुसऱ्या अवस्थेत ते तिचा ताबा घेतात. ते मत्सरी असल्यामुळे त्यांना आपल्यापेक्षा जास्त बुद्धिमान लोक संस्थेत नकोसे वाटतात व त्यामुळे ते कमी दर्जाचे लोक जवळ करतात, ते तृतीय श्रेणीचे लोक असले तर चतुर्थ श्रेणीचे लोक भोवती गोळा होणार. मग संस्था मृत्युपंथाला लागते. संस्थेच्या सुरुवातीच्या काळात तिची इमारत लहान असते ती ऱ्हास काळात भव्य होते. सुरुवातीला शस्त्रक्रिया करून संस्था वाचवणे शक्य असते; पण शेवटच्या अवस्थेत ते कठीण असते. दुसऱ्या कोणी धाडसी तरुणांनी नवीन संस्था काढली तर हिचा निकाल लवकर लागतो; पण संस्था शेवटल्या अवस्थेत किती काळ राहील ते सांगता येत नाही. विशेषतः शासकीय संस्था दीर्घकाळ टिकतात.

दुसऱ्या एखाद्या संस्थेचा नाश करायचा असेल तर शेवटल्या अवस्थेत असलेल्या संस्थेतल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना उत्तम शिफारसपत्रे देऊन तिकडे पाठवावे. इमारतीचा भरपूर विमा उतरून ती फायलीसकट जाळून टाकावी. मग पाहिजे तर नवीन जागा, नवीन नाव घेऊन नवीन संस्था सुरू करावी. जुन्या संस्थेतून थोडेही प्रदूषण आल्यास ते धोक्याचे होईल.

### वर कसे जावे ?

वर कसे यावे याचे एक तंत्र असते. जगातला जवळजवळ प्रत्येक माणूस कोणाचा ना कोणाचा जावई असतो हे लक्षात ठेऊन वर यावयाचे असेल तर योग्य सासरा गाठावा, म्हणजे वरेचसे काम आपोआप होते. आता विकसनशील राष्ट्रात जावई कंपनीही मागे पडून बेटा कंपनी उगवली आहे. पुढे आणखी कोण उदयाला येईल ते पहायचे आहे.

वर यायचे असेल तर जाणत्याने बॉससमोर जास्त हुशारीचे प्रदर्शन करू नये. शक्य असेल तेव्हा आपली चांगली सूचना त्याचीच असल्याचे भासवावे. माणसाची सही आणि लिखाण वाचणे अवघड होऊ लागणे हे तो वरवर जात आहे याचे चिन्ह असते.

झोपडीतून पॅकार्ड गाडीपर्यंत प्रवास करणाऱ्या यशस्वी माणसाचे चित्र पहा. प्रथम त्याचेजवळ एक जंगी आल्सेशियन कुत्रा संरक्षक म्हणून येतो. आयकरवाले मागे असतातच. त्याशिवाय युनियनचे पुढारी, संरक्षण विकत देणारे दादा, वर्गणी गोळा करणारे घटिंगण इ. लोक सतत भेटी देतात. सहकारी व कर्मचारी यांच्यापैकी काहींच्या हातात त्याची शेंडी असते व प्रत्येकजण संधीची वाट पाहात असतो. या यशस्वी माणसाला समाधान तेवढे लाभत नाही.

आता लोकशाहीतच मक्तेदारी अवतीर्ण झाली असून, ती बरीचशी शासनाकडे आहे. या मक्तेदारीत नागरिकाला कुठे दुसरीकडे जाण्यास वाव नसतो व तो हैराण होतो. शासनाची व संस्थांची सत्ता एकीकडे वाढत आहे; पण दुसरीकडे ती कमकुवत होत आहे. या कमकुवतपणामुळे मोटारवाल्यांना बेगुमानपणे मोटारी उडविण्याचे, नफेबाजांना लूटमार करण्याचे अशा तऱ्हेची स्वातंत्र्ये मिळत आहेत. घरातलाच प्रकार पहा. पूर्वी घरात बाई नवऱ्याकडून आलेली सत्ता मुलावर चालवी. आता पुरुषाचे प्राबल्य जाऊन, बाईच्या हातात सत्ता आली; पण आता ती मुलांच्यात शिस्त ठेवू शकत नाही. त्यामुळे शिस्तहीन पिढी तयार होणार. नवीन पिढीला कॉम्प्युटर उत्तम माहीत असेल; पण नेतृत्व, वाङमय कलाप्रेम इत्यादी गुण असणार नाहीत. ते बुद्धिमान असतील, पण व्यापक विचार, शहाणपण इत्यादी गोष्टीत ते कमी पडतील. त्यामुळे सत्तेचा व समाजाचा ऱ्हास होण्यास मदत होईल अशी भीती वाटते.

## पीटरचा सिद्धांत : गोष्टी का बिघडतात

पार्किन्सन यांनी आधुनिक व्यवस्थापनातली उघळपट्टी व बेबंदशाही विनोदी परंतु मर्मभेदक शैलीत दाखवून दिल्यावर डॉ. लॉरेन्स पीटर व रेमंड हल् यांनी तशा धर्तीवर 'पीटरचा सिद्धांत' (पीटर प्रिन्सिपल)

हे पुस्तक लिहिले व तेही फार गाजले. ते सांगतात, त्यात विनोद असला तरी गंभीर व भीतीदायक सत्य आहे हे वाचकाच्या लक्षात येते.

## नालायक वरच्या श्रेणीत

सगळ्या जगभर समाजयंत्र विस्कळीत होत आहे, याचे मुख्य कारण उच्चपदावर नालायक लोकांचा भरणा होतो हे आहे. शिक्षण हा समाजाचा पाया पण ते क्षेत्र नालायक लोकांनी व्यापले तर काय करायचे ? संस्कृती राखणारे वाङमय हेही नालायक लोकांच्या हातात जाते. गोष्टी बिघडतात म्हणून प्रत्येकजण दुसऱ्याला नावे ठेवतो. मालक म्हणतात कामगार काम करीत नाहीत, तर कामगार म्हणतात, मालक नफेबाजी करतात. राजकारणी लोक एकमेकांना दूषणे देत असतात. प्राध्यापक म्हणतात, मुले बेशिस्त आहेत, ऐकत नाहीत, तर विद्यार्थी सांगतात की आमच्या सरांना काहीच येत नाही. आधुनिक समाजाचे निरीक्षण केल्यास असे आढळते की, सर्वत्र अधिकारश्रेणीचे गट (हायार्की) तयार झाले असून, त्यात विशेषत: वरच्या थरात नालायक लोकांनी घुसून सगळ्या गोष्टींचा विचका मांडला आहे. पीटर यांनी या प्रकरणावरून एक तत्त्व मांडले. 'कुठल्याही अधिकारश्रेणीच्या गटात प्रत्येक माणसाची वरच्या जागेवर चढताना आपली नालायकीची पातळी गाठण्याकडे प्रवृत्ती असते.'

हे गट यंत्रासारखी कामे करतात. त्यांना उद्दिष्टापेक्षा कार्यपद्धती महत्त्वाची वाटते. त्यात फॉर्म भरणे हा प्रकार येतो. लोकांच्या उपयोगी पडावे असे कुणालाही वाटत नाही. त्यांची लायकी ठरवणाऱ्या वरिष्ठांनी स्वत:ची लायकीची पातळी गाठलेलीच असते. रजिस्टरे व फॉर्म नीट भरलेत का नाही असल्या फालतु गोष्टी पाहून कनिष्ठांची लायकी ठरवणार. याला एखादाच अपवाद असतो, हे यांत्रिक काम करणारे लोक आज्ञा पाळतात; पण निर्णय घेऊ शकत नाहीत. नंतर जेथे निर्णय घ्यावा लागतो अशा जागी चढल्यावर नालायकीची पातळी गाठून स्थिरावतात. मग गोंधळ घालीत बसतात.

## लाथ मारून वर फेकणे

चुकून एकदा नालायक माणूस आणखी वर जातो. या प्रकाराला लाथ मारून वर फेकणे (किकिंग अप्) म्हणतात. काही वेळा अशी बढती देणे बहुतेकांना हितावह असते. त्यांना धीर येतो. इतका नालायक माणूस वर जातो तर मीही जाईन, असे प्रत्येकाला वाटते. त्यांचा गट अभिन्न राहतो हे महत्त्वाचे असते.

गटागटात जाती व वर्ग असतात. प्रत्येक वर्ग आपल्याभोवती भिंत बांधतो व खालच्या वर्गाबरोबर मिसळत नाही. वरच्या जागेवर बाहेरून माणसे आणली जातात. त्यामुळे खालच्या लोकांना वर चढता येत नाही व ते नाराज असतात; पण नालायकीची पातळी गाठण्याची संधी न मिळाल्याने त्यांच्यात थोडीफार कार्यक्षमता असते. एकंदर संख्या व नालायकीची पातळी न गाठलेल्या लोकांची संख्या यांच्या प्रमाणावर संस्थेची कार्यक्षमता अवलंबून राहते. सगळेच नालायक झाले की समाजयंत्र कोसळेल. वरच्या जागी बसण्यास किंवा बढती मिळण्यास आश्रयदाता शोधावा लागतो. एखाद्याला मदत करण्यास आश्रयदात्याचा फायदा किंवा मदत न करण्यात त्याचा तोटा असावा लागतो.

या रचनेमुळे सर्व गटाच्या वरच्या थराची फुगण्याकडे प्रवृत्ती होते. संस्था वाढते तसे वर ठोकळे गोळा होतात. एका कंपनीने २३ उपाध्यक्ष नेमले. सुधारणा करावयाची म्हणजे प्रथम जागा वाढवायच्या हा खाक्या असतो.

## मार्क्स लोकशाही व गट

मार्क्सला वाटले की, गट फक्त भांडवलशाहीत होतात. ही कल्पना चुकीची आहे. हे सर्वव्यापी गट लोकशाहीतही भरपूर असतात. विधिमंडळात, पक्षात, लष्करात व अन्य खात्यात सर्वत्र गट असतात. पूर्वी साधारण माणूस वैयक्तिक गुणावर निवडून येऊ शके. आता हे काम इतके खर्चाचे झाले आहे की, व्यक्तीला ते शक्य नाही. पक्षामार्फत उभे रहावे लागते. पक्षातही नालायक लोकांच्या हातात सूत्रे असतात. अशा परिस्थितीत पुढारी निर्माण न होता आज्ञाधारक पण संधीसाधू अनुयायी तेवढे निर्माण होतात. प्रत्येकजण वरून आदेश मागतो. वर एकादा ठोकळा बसवला तरी चालेल अशी स्थिती आली आहे. कोणी जर नेतृत्वाचे गुण दाखवील किंवा गटापेक्षा निराळे वर्तन करील तर त्याची हकालपट्टी होईल.

वरच्या जागेवर बसून आपली जबाबदारी टाळण्याचा एक मार्ग तज्ज्ञांच्या नेमणुका करणे हा असतो. हे तज्ज्ञही नालायक व अभ्यासाशिवाय थातुरमातुर करून पैसे घेऊन जातात. कार्यक्षमता मात्र खालीच जात असते. गणकयंत्रांना माहिती देणारे कार्यक्षम नसले, यंत्रांच्या कुवतीबाहेर काम दिले तर तेही नालायकीची पातळी गाठतात व मोठमोठ्या चुका करू लागतात.

## विकृत्या

अधिकार श्रेणीतल्या वरिष्ठांना नाना विकृत्या होतात. कुणाला खूप टेलिफोन्स्, कुणाला लाऊडस्पीकर्स इ. संच बाळगावेसे वाटतात. कोणी खोलीत तक्ते टांगतात, कुणी योजनात गर्क होतात, कुणी इमारत बांधणी सुरू करतात, तर कुणी नवीन जागा निर्माण करून त्यावर कोणाला नेमायचे ते पहात बसतात. पुष्कळांना ठोकळेबाज व्याख्याने झोडण्याची हौस असते. कामाचे काय हे पाहाण्यास मात्र कुणालाच वेळ नसतो.

## समाजाचे भवितव्य

पुष्कळ नालायक लोकांना आपण नालायक आहोत हे समजते. मग ते जास्त कामे निर्माण करतात, घरी फायली नेतात व आपण खूप काम करतो असे मानतात. दुष्काळ पडला की, हे प्रथम अभ्यास करणार. दुष्काळ संपला तरी अभ्यास चालू. काहीजण सार्वजनिक कार्यात मग्न होऊन इतक्या ठिकाणी अध्यक्ष वा सभासद होतात की, स्वत:चे काम पाहाणे अशक्य होते. हे सर्व ओळखून एखाद्याने वरची जागा नाकारली तर ? घरीदारी मोठा गोंधळ माजेल व बातमी षटकर्णी होईल; पण असे होणे फार कठीण असते. मग या समाजाचे भवितव्य काय हा प्रश्न उभा राहतो.

## विकसनशील राष्ट्रात

पीटरनी विकसनशील राष्ट्रांचा विचार केलेला नाही. तिथे निरनिराळ्या देशात निरनिराळी अवस्था आहे. त्यातल्यात्यात सुधारलेले म्हणवणाऱ्या देशाकडे पाहिले तर तिथे नालायक व्यक्ती नुसत्याच वर जात असतात. इंग्लंडमध्ये फुल्टन कमिटीने राज्यकारभारातल्या जाती काढून टाकण्याची शिफारस केली; पण या दुसऱ्या राष्ट्रात त्या जाती वाढत आहेत. लोकप्रतिनिधी, विद्वान, इत्यादिकांची बौद्धिक पातळी भयानक असते. वर आणखी कळस म्हणजे एकादा माणूस एखाद्या उच्चपदावर नेमला गेला की, तो नालायक असला तरीही वर्तमानपत्रात त्याचा फोटो येतो व उदोउदो होतो. असे हे समाज अराजकतेकडेच वाटचाल करतात. □

('जगाचे ओझरते दर्शन — काल, आज, उद्या' या पुस्तकातून साभार उद्धृत)

# भोपाळ : अपघात तर होऊन गेला पण सुरक्षा व्यवस्था व नुकसानभरपाईचे काय ?

विनायक गोखले

भोपाळमधील दुर्घटना होऊन पंधरवडा उलटला. सरकारी आकडेवारी जरी मृतांची संख्या दोन–अडीच हजार दर्शवत असली तरी प्रत्यक्षात हा आकडा दहा हजाराच्या घरात असण्याची शक्यता आहे. या अपघातामुळे इजा पोहचलेल्यांची संख्या तर पाउणलाखाच्या घरात आहे व त्यातले अनेक अजून गंभीर अवस्थेत आहेत. त्यामुळे या अपघातामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या याहून वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या अपघातामुळे काही प्रश्न निर्माण होत आहेत. त्यातले महत्त्वाचे दोन म्हणजे नुकसानभरपाई व अशा तऱ्हेचे अपघात टाळण्याकरता करावयाचे प्रयत्न.

नुकसानभरपाई म्हणून १५ बिलीयन डॉलर्सचा दावा ! वीस बिलियन डॉलर्सचा दावा ! यासारखे काल्पनिक वाटणारे दावे युनियन कार्बाईडवर काही भारतीयांनी अमेरिकेत दाखल केले आहेत. अमेरिकेत या दावेकऱ्यांना नुकसानभरपाई किती मिळेल हा प्रश्न सध्या गौण आहे. परंतु एवढे नक्की की अमेरिकेत माणसांची किंमत जास्त आहे. त्यामुळे तेथे निष्काळजीपणाची तशीच जबर किंमत पडते; परंतु भारतात नुकसान भरपाई दिली जाते म्हणजे निर्दोष माणसांची अक्षरशः लाज काढली जाते.

भोपाळच्या दुर्घटनेमुळे तेथील निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे आणि याच काळात ही दुर्घटना हळूहळू राजकीय स्वार्थाकरता वापरली जाण्याची शक्यता आहे. त्याचं एक उदाहरण म्हणजे भोपाळमधील नगरसेवकांचे प्रताप ! जखमींना मिळणाऱ्या नुकसानभरपाईकडे लक्ष ठेऊन हॉस्पिटलच्या कारभारात हस्तक्षेप करणाऱ्या या नगरसेवकाने शेवटी डॉक्टरांना संप करण्यास भाग पाडले. जखमींना, मृतांना नुकसानभरपाई ही मिळालीच पाहिजे व त्याबरोबर कंपनीला दंडसुद्धा झाला पाहिजे. पण हे करताना सरकारने संयम राखणे जरुरीचे आहे. निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून जर सरकारने नुकसानभरपाई म्हणून अवाच्यासवा रकमेची मागणी केली तर आज ना उद्या त्यांना ते भोवल्याशिवाय राहणार नाही.

मृतांना दिल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईची रक्कम ही काय असेल यासंबंधी सरकारने अधिकृत असे काही जाहीर केले नाहीये; परंतु ५० हजार ते ५ लाख यापर्यंतच्या रकमेच्या अफवा किंवा बातम्या ऐकिवात आहेत. एरवी यावर विश्वास बसला नसता. परंतु भोपाळ दुर्घटनेत शिरलेले राजकारण, यावर विश्वास बसावा इतके वाईट आहे. मूळ कंपनीचे अध्यक्ष अँडरसन इथपासून ते महेंद्र व गोखले यांच्या अटकेसारखे राजकीय स्टंट व निवडणूक यामुळे नुकसानभरपाई म्हणून भरपूर रक्कम उकलून सवंग लोकप्रियता मिळवायला म. प्रदेश सरकार पुढे मागे पाहणार नाही.

## माणसांची किंमत तेवढीच !

भारतात अपघात काही कमी होत नाहीत ! आणि अपघातांमध्ये मरणाऱ्यांची संख्याही काही कमी नसते. यात निर्दोष नागरिकांचाही समावेश असतो. तर जेव्हा असे अपघात घडतात आणि सरकारला नुकसानभरपाई द्यायची वेळ येते किंवा सरकारवर अपघाताची जबाबदारी असते तेव्हा सरकार काय करते ? पाहण्यासारखे आहे.

उदाहरण म्हणून रेल्वेचा अपघात घेऊ, एखादा रेल्वेचा अपघात घडला की संबंधित मंत्र्यांपासून, ते स्टेशनमास्तर यांच्या भेटीचा आणि शोक व्यक्त करण्याचा कार्यक्रम, एखाद दुसऱ्या सचिव किंवा अधिकाऱ्यांच्या बदल्या, मृतांना १० हजार तर जखमींना ५०० ते १००० रुपये नुकसानभरपाई, मग विरोधकांची न्यायालयीन चौकशीची मागणी मान्य केली जाते. सरकार अपघाताचे खापर परकीय शक्तीपासून ते ड्रायव्हर, सिग्नल यंत्रणा इथपर्यंत सोईचे असेल त्यांच्यावर फोडते आणि एक दोन दिवस चर्चेचा असलेला मामला खतम करते. हा झाला रेल्वे अपघातानंतरचा आदर्श साचा ! आजवर कधी, अशा अपघाताला अनुसरून रेल्वेमंत्री किंवा सचिवांना अटक झाली आहे ? न्यायालयीन चौकशी समितीने रेल्वेवर नुकसानभरपाईची मागणी करणारे दावे लावले आहेत ? त्यांच्या मते आधीच दिली गेलेली नुकसानभरपाई पुरेशी असेल ! एवढे कशाला ज्या कारणास्तव अपघात घडला ती सदोष यंत्रणा ताब्यात घेऊन त्यावर कडक उपाय योजना करण्याचा प्रयत्न केल्याचे कोणाच्या पाहण्यात आले आहे ? वरील प्रश्नांना नाही शिवाय दुसरे उत्तर नाही.

सरकारवर जेव्हा अशा प्रकारची जबाबदारी येते तेव्हा घडलेल्या प्रकरणाची आवराआवर करण्यातच सर्व शक्ती खर्च केली जाते. कारखान्यात मग तो सरकारी असो वा खाजगी, तेथे जेव्हा अपघात घडतो तेव्हा निर्दोष मृतांना ७,२०० पासून ३०,००० रुपयांपर्यंत त्यांच्या दर्जानुसार नुकसानभरपाई दिली जाते. आणि ती सुद्धा कामगारांच्या न्यायालयात निर्णय झाल्यावर ! त्यामुळे मनुष्यहानीची किंमत भारत सरकारने दहा हजार ते वीस हजार ठरवली आहे. सत्तर कोटी लोकसंख्येच्या देशात माणसांची किंमत ही इतपतच आहे, मग जखमींची तर गोष्टच सोडा !

युनियन कार्बाईडसंबंधी लोकांच्या मनात निर्माण झालेला राग हातात असलेली सत्ता व निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून जर आवाच्यासवा नुकसानभरपाई, अर्थात सरकार जी नुकसानभरपाई देते त्या संदर्भात, मागितली तर ते दुटप्पी धोरण ठरेल व कालांतराने बुमरँगसारखे उलटेल. कारण अपघात जो सरकारी क्षेत्रात होतो त्या ठिकाणीसुद्धा तेच संदर्भ लावले जाण्याच्या मागणीस प्रारंभ होईल.

नुकसानभरपाई ही किती द्यायची याच बरोबर ती कोणाकोणाला द्यायची ? व कोणाकडून वसूल करायची हे सुद्धा प्रश्नच आहेत. अपघातामुळे मृत पावलेले कोण ? अपघातामुळे इजा पोहचलेले कोण ? हे ठरवणे फार अवघड आहे; परंतु इष्ट आहे. या दुर्घटनेत झोपडपट्टीतील अनेक नागरीक बळी पडले आहेत व त्या गोंधळात, 'डेथ सर्टीफिकीटस्' किंवा 'डॉक्टरांचे सर्टीफिकिट' जे मृत व्यक्ती ही दुर्घटनेचा बळी आहे असे दाखवू शकेल ते किती जणांकडे असेल ह्या बद्दल शंका आहे.

दवाखान्यांमध्ये औषध उपचार होत असणारे जखमी व त्यांना मिळणारी नुकसानभरपाई ही सुद्धा समस्याच आहे. जेव्हा या लोकांना नुकसानभरपाई दिली जाईल तेव्हा त्यासाठी वेगळे केन्द्र उघडावे लागेल. 'संजय गांधी निराधार योजना' किंवा 'ग्रामीण विकास योजना' या सारख्या योजना राबवल्या जाताना होणारे हस्तक्षेप ज्याप्रमाणे योजनांच्या पाठीमागची भूमिका गढूळ करतात त्या सारखेच इथेसुद्धा घडण्याची शक्यता आहे. जखमी कोण ? मृत कोण ? हे ठरवण्यापासून नुकसानभरपाई वाटपापर्यंत अशा अनेक जागा असतील जिथे मूळ रकमेला वाट फुटेल. त्यामुळे सामान्यांच्या हातात या प्रसंगानंतर काय पडेल याबाबत शंकाच आहे.

## बेजबाबदारपणावर पांघरूण

नुकसानभरपाई युनियन कार्बाईड इंडिया यांच्याकडून वसूल करावी का युनियन कार्बाईड अमेरिका यांच्याकडून याबाबत मतभेद दिसतात. काहींच्या मते दुर्घटना घडलेली कंपनी ही भारतात रजिस्टर्ड झाली असल्याने त्यांच्यावर हा दावा लावला जाईल. तर काहींच्या मते त्या कंपनीचे रजिस्ट्रेशन जरी भारतात झाले असले तरी या कंपनीचे अर्ध्यापेक्षा अधिक भागभांडवल मूळ कंपनीकडेच आहे. त्यामुळे दावा त्यांच्यावर लावला जाईल; परंतु मूळ कंपनीचे अध्यक्ष अँडरसन यांनी या दुर्घटनेमुळे दिलेली भारत भेट व त्यांची अटक हा दावा युनियन कार्बाईड अमेरिका यावर लावला जाणार असे दर्शवते.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा जो अजूनही आपल्याकडे गौण मानला जातो तो म्हणजे सुरक्षिततेसाठीच्या उपाय योजना.

जागतीक आरोग्य परिषदेने विकसनशील राष्ट्रांकरता काही जाणीवा दिल्या होत्या. त्यात जे देश किटक नाशक किंवा तत्सम उत्पादने करतात त्यांची उत्पादन पद्धती, वाहतूक व साठवणूक धोकादायक पद्धतीने होत असल्याची जाणीव करून दिली होती. बहुराष्ट्रीय उद्योगांना विकसनशील राष्ट्रे धंदा करण्यास जणू काही मोकळी राने आहे त्यामुळे अशा प्रकारच्या उद्योगात अतिशय काळजी घेणे नुसते जरुरीचे नाही तर कायदेशीर तरतुदी करणे आवश्यक आहे असे सुद्धा या परिषदेने मत व्यक्त केले होते.

## कडक धोरणच हवे

परंतु याचा परिणाम म्हणून अमेरिकेने कीटक नाशकं बनवण्याच्या काही पद्धती व किटक नाशके यावर बंदी आणली. यात DBCP, केपॉन मिरेक्स, डाइल्ड्रीन 2,4,5-T या सारखी किटक नाशकं अति विषारी समजली जाणारी होती. 'Circle at Poison' या नावाखाली गरीब राष्ट्रांतील नागरिकांना किटकनाशकांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली आहे. DBCP आणि फॉसविल या सारख्या उत्पादनांमुळे कामगारांच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम होतो. युरोप व अमेरिकेत या उत्पादनांवर बंदी घालण्यात आली आहे परंतु अजून आपण ती उत्पादनं करतो व त्याची निर्यात सुद्धा करतो. भारत सरकारला अशा तऱ्हेच्या उत्पादनांतील असुरक्षिततेची जाणीव नाही अशातला भाग नाही. तरी पण १९६८ मध्ये १०० टक्के निर्यात करणाऱ्यांकरता दिल्या जाणाऱ्या facilities च्या नावाखाली त्यावर पांघरूण घालण्यात येत आहे.


किटकनाशकांच्या उत्पादनांसंबंधीचा कायदा लोकसभेने १९६८ मध्ये संमत केला. यात १९७१ मध्ये काही सूचना करण्यात आल्या व त्यानुसार १९७२ मध्ये त्यात बदल करण्यात आला; परंतु त्याच्या अंमलबजावणी बाबतचा निष्काळजीपणा अनेकदा दिसून आला आहे.

किटकनाशकेच नव्हे तर एकूणच रासायनिक उद्योगात सुरक्षिततेचे उपाय योजण्याबाबत कडक धोरण ठेवणे आवश्यक आहे. आता मुंबईचेच उदाहरण घ्यायचे झाले तर भर वस्तीत असलेले चेंबूर मधले कारखाने. यामुळे चेंबूर भाग हा 'Gas chamber' झाला आहे असे इकॉनॉमिक टाइम्स म्हणतो. ज्या फॉसजीन वायूमुळे भोपाळ दुर्घटना घडली तो वायू युनियन कार्बाईडच्या चेंबूर प्रकल्पातसुद्धा बनतो एवढेच नव्हे तर फोम बनवणाऱ्या सर्व उद्योगात तो आवश्यक आहे. दरवर्षी भारतात पन्नास कोटी किलो फॉसजीनचा वापर केला जातो. मुंबईतील अनेक कारखाने मिळून रोज २०० टन सल्फर डाय ऑक्साईड हवेत सोडत असतात. भारत पेट्रोलियम व हिंदुस्थान या सारख्या तेल शुद्धीकरण संस्था प्रचंड प्रमाणात कार्बनडाय ऑक्साईड हवेत सोडतात. याच बरोबर नाईट्रोजनची ऑक्साईडस्, कार्बन मोनॉक्साईड, अमोनिया या सारखे वायू रोजी हवेत सोडले जातात. मुंबईत रोज १४०० टन इतर वायू हवेत मिसळल्याने प्रदूषण वाढते व त्यात एकट्या चेंबूर मधून ३४० टन. या बरोबर अमोनिया सारख्या वायुची प्रचंड साठवणूक ही सुद्धा सुरक्षिततेच्या अभावी अपायकारक ठरू शकते. अनेक उद्योग रंगापासून ते विषारी पाण्यापर्यंत अनेक टाकाऊ रसायने पाण्यात सोडतात.

हवेतील प्रदुषणे, पाण्यातील प्रदुषणे ही सुद्धा निरुपद्रवी लोकांना इजा पोहचवत असतात. ज्या ठिकाणी आजूबाजूची वस्ती हलवणे शक्य नसते तिथे तर सुरक्षिततेचे उपाय वरच्यावर पडताळून पाहिले गेले पाहिजेत. याशिवाय भर वस्तीत अशा तऱ्हेच्या प्रकल्पांना परवानगी न देणे व वस्तीबाहेरील प्रकल्पांभोवती वस्ती वाढू न देणे या गोष्टींकडे दक्षतापूर्वक पाहिले गेले तर अपघात टळू शकतील.

प्रगत राष्ट्रात ज्या उत्पादनांना परवानगी नाही त्या उत्पादनांना भारतात परवानगी देणाऱ्या सरकारने किमान अमेरिकेत किटक नाशके बनवताना केल्या जाणाऱ्या सुरक्षा यंत्रणेचा अवलंब करावा. नाहीतर नुकसान भरपाई अमेरिकन पद्धतीची तर उत्पादन यंत्रणा 'आपल्या' पद्धतीची ! □

# शर्यत



**मूळ लेखक : जेफ्री आर्चर**
**रूपांतर : विष्णु जयदेव**

आठव्या लोकसभेची निवडणूक दारावर येऊन ठेपली आहे. हा मजकूर वाचकांच्या हाती पडेल तेव्हा निवडणूक प्रचार शिगेला पोचला असेल. छत्तीस कोटी मतदार आपल्या पसंतीच्या पक्षावर शिक्कामोर्तब करतील. नवा भिडू, नवं राज्य सुरू होईल किंवा जुन्या भिडूलाच पुन्हा एकदा 'टेक-ऑफ'चा सिग्नल मिळेल. राष्ट्रपती भवनच्या दरबार हॉलमध्ये झुंबरांच्या लखलखाटात नवा पंतप्रधान शपथ ग्रहण करील. सत्तेची नवी खेळी सुरू होईल. साऊथ ब्लॉकच्या प्रशस्त, वातानुकूलित कक्षांतून राग दरबारी छेडला जाईल. 'पॉवर गेम इज द रियल गेम.' निवडणुका हा या खेळातला केवळ एक भाग आहे.

पूर्वी, नेहरू-पर्वाच्या संधिकालात, राजकारण्यांना निवडणुकांचं महत्त्व वाटत होतं. जनताजनार्दनाचा हा कौल आपल्याला मिळावा यासाठी प्रत्येकाची खटपट असे. गटबाजीचं राजकारण होतं. काळ्या पैशाचा ओघ सुरू झाला होता. सत्तेचा मोह होता. नाही असं नाही; पण जनमताची चाड होती. सत्तेचं राजकारणही डिग्निटीने खेळलं जात असे. आजच्यासारखी सरसकट लांडगेतोड नव्हती.

स्वातंत्र्यपूर्वकालात राजकारणाला ध्येयवादाची डूब होती. आंग्लविद्याविभूषित, एकोणिसाव्या शतकातल्या उदारमतवादाने भारावलेले तरुण स्वातंत्र्यप्राप्तीच्या ईर्षेने राष्ट्रीय महासभेत येत. तंटे-बखेडे होत असत; पण ध्येय-निष्ठेचा कस तसूभरही कमी नव्हता. जहाल-मवाळ वाद असो, स्वराज्य की सुराज्य वाद असो, किंवा महात्माजींच्या एकूण कार्यपद्धतीविषयी वेळोवेळी उफाळून आलेले मतभेद असोत, काँग्रेस पक्षाचं राजकारण हे चळवळीचं राजकारण राहिलं. स्वातंत्र्य चळवळ किंवा सामाजिक चळवळ. डॉ. आंबेडकरांचं नेतृत्वही झळाळून निघालं ते चवदार तळ्याच्या चळवळीमुळेच. या चळवळींमुळे वादावादी होणं अपरिहार्य होतं; पण म्हणून त्या मतभेदापायी चळवळ निष्प्रभ होत नव्हती. व्यक्तीव्यक्तीत मतभेद होते; पण या मतभेदाभोवती राजकारण खेळलं जात नव्हतं. मुख्य ध्येयाची कास सुटत नव्हती. मुख्य प्रवाहापासून अनेकजण अलग पडले; पण म्हणून ध्येयप्राप्तीच्या प्रयत्नात कसूर पडली नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात चळवळींचं दुसरं पर्व मूळ धरू लागलं. फोफावलं. गुजरात-महाराष्ट्रातली सहकार चळवळ, उत्तर भारतातली, बिहारमधली शेत-मजुरांची, भू-सुधारणेची, चळवळ, नक्षलवाद्यांची आंध्र-श्रीकाकुलममधली चळवळ ही काही ठळक उदाहरणं सांगता येतील.

या चळवळींचा सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे यामुळे राजकारण गावागावात पोचलं. बहुजनसमाजापर्यंत झिरपलं. बहुजनसमाज राजकीयदृष्ट्या आर्टिक्युलेट झाला; पण याचा अर्थ प्रगल्भ सुजाण वगैरे नव्हे. आपण निवडणुकीचं राजकारण खेळू शकतो, सत्तेत आपलाही वाटा असावा, आपली राजकारणात इंट्रिन्झिक व्हॅल्यू आहे याची

बहुजनसमाजाला पहिलीवहिली जाणीव झाली. चळवळीच्या नेतृत्वालाही या राजकीय आकांक्षा फलद्रुप करण्यात विशेष गोडी वाटली. चळवळ बाजूला राहिली. निवडणुकांचं राजकारण सुरू झालं.

निवडणुकांचं राजकारण म्हणजेच गटबाजीचं, काळधा पैशाचं, अंतर्गत कलहाचं राजकारण. सत्तेची सट्टेबाजी सिंडिकेटने नेहरू हयात असतानाच सुरू केली होती. या पार्श्वभूमीवर १९६९ चं कॉंग्रेसचं विभाजन पहायला हवं. 'हू वील्डज द रियल पॉवर' हाच सगळा झगडा होता. ह्या झगड्यात इंदिरा गांधी जिंकल्या.

निर्जलिंगप्पा, मोरारजी, अतुल्य घोष, सदोबा पाटील या सत्तालंपट चौकडीच्या तावडीतून श्रीमती गांधी सुटल्या आणि १९८० नंतर अंतुले, गुंडुराव, जगन्नाथ मिश्रा, भजनलाल यांच्या तडाख्यात सापडल्या. सत्तेच्या राजकारणात श्रीमती गांधींना देवराज अरस, यशवंतराव चव्हाण हे जुन्या पठडीतले भिडू नको होते. हे भिडू कसलेले होते, आपापल्या प्रांतात आब राखून होते. इंदिराजींना अंतुले–मिश्रासारखे चेलेचपाटे हवे होते. त्यांना स्वतःचं नेतृत्व नव्हतं; पण 'न्यूसन्स वॅल्यू' भरपूर होती. या 'न्यूसन्स वॅल्यू' नेच इंदिरा गांधी हतवल झाल्या. निर्जलिंगप्पा, अतुल्य घोषना 'डिग्निटी' होती. गांधीवादी मूल्यांचा तोंडदेखला का होईना; पण मंत्रजागर ही माणसं करत होती. अंतुले–मिश्रा आदि ऐंशीनंतरचे नेते 'ब्रेझन' होते. अन् निवडणुकीच्या राजकारणातला हा बेमुर्वतपणा पुचाट, ढोंगी, कर्मकांडी गांधीवादावर जमालगोटा होता.

आज मॅनेजमेंटवालं नवं नेतृत्व आहे. राजीव गांधींना पंतप्रधानपदी विराजमान करण्यात जे चौघेजण विशेष कार्यरत होते ( अरुण नेहरू, अरुणसिंग, व्ही. एस. त्रिवेदी, माखनलाल फोतेदार ) त्यांच्याविरुद्ध अंतुले, रामचंद्र रथ, घोटे वगैरे बंडखोर मंडळी आवाज उठवतायेत. प्रश्न आजही तोच आहे : 'हू वील्डज द रियल पॉवर ?'

या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर विख्यात इंग्रजी कादंबरीकार जेफ्री आर्चर यांची 'फर्स्ट अमंग इक्वल्स' ही नवी कादंबरी उद्बोधक वाटते. याही कादंबरीतली चार पात्रे पंतप्रधानकीची स्वप्ने पाहतात अन् त्या स्वप्नांच्या पूर्ततेच्या दृष्टीने त्यांचा प्रवास कसा होतो याचा भेदक आलेख या पुस्तकात आहे.

इंग्लंडमध्ये आपल्यासारखे अगणित पक्ष नाहीत. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत काही विशिष्ट तत्त्व प्रणाली घेऊन, कॉंग्रेसचा जन्म झाला पण गेल्या पस्तीत वर्षांत ही तत्त्वे गळून पडली आणि कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेस, निर्जलिंगप्पा कॉंग्रेस, कॉंग्रेस अरस, जगजीवनराम कॉंग्रेस, शरद पवार कॉंग्रेस असा प्रवास करत करत आता चक्क अंतुल्यांची इंदिरावादी कॉंग्रेसही स्थापन झाली आहे. ह्या सगळ्या कॉंग्रेसमध्ये मूळ कॉंग्रेसचा आत्मा 'रीडिफ्युजनला' तरी गवसला आहे की नाही याची वृत्तपत्रांतील जाहिराती पाहून शंका वाटते.

ब्रिटिश लोकशाहीतील पक्ष अजूनही तत्त्वाधिष्ठित आहेत. आपल्यासारखे व्यक्तिनिष्ठ नाहीत.

कॉन्झर्व्हेटिव्ह (हुजूर) आणि लेबर (मजूर) हे ब्रिटनचे दोन प्रमुख पक्ष. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष हा पूर्वीचा टोरी पक्ष. त्याला कॉन्झर्व्हेटिव्ह हे नाव १८३० च्या सुमारास मिळाले. इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याच्या कारकीर्दीत (१६६०–१६८५) 'व्हिग'आणि 'टोरी' ह्या दोन पक्षांची निर्मिती झाली. पक्ष ह्या संकल्पनेच्या आजच्या अर्थाने व्हिग आणि टोरी हे एकमेकांचे विरोधी पक्ष नसले तरी मध्यमवर्ग आणि व्यापारीवर्ग यांचा पाठिंबा व्हिग पार्टीला होता तर जमीनदार आणि अमीर उमराव यांचा कल टोरी पार्टीकडे होता.

गंमत म्हणजे व्हिग आणि टोरी ही दोन्ही नावे खरे पहाता टीकात्मक स्वरूपाची होती; पण कालांतराने ह्या दोन्ही पक्षांनी या नावांचा स्वीकार केला. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत व्हिग आणि टोरी पक्षाच्या बांधलेल्या अशा पक्ष–संघटना नव्हत्या.

अठराशे तीसच्या सुमारास व्हिग पक्षाचे लिबरल पक्ष असे नामकरण झाले आणि टोरी पक्षाऐवजी 'कॉन्झर्व्हेटिव्ह' पक्ष असे नाव प्रचलित झाले.

सोळाशे शहाण्णवच्या सुमारास ब्रिटनचा राजा तिसरा विल्यम आणि राणी मेरी ह्यांना असे जाणवले की, व्हिग आणि टोरी ह्या दोन्ही पक्षांचे संमिश्र मंत्रिमंडळ सुरळीत चालणे कठीण होत आहे. या दोन्ही पक्षांची मूलभूत तत्त्वे वेगवेगळी असल्याने मंत्रिमंडळातील सदस्यांचे प्रत्येक निर्णयाबद्दल खटके उडू लागले.

व्हिग पार्टीच्या सदस्यांना राजाच्या हक्कांवर बंधन घातले जावे असे वाटत होते. धार्मिक स्वातंत्र्य प्रॉटेस्टंट लोकांनाही दिले जावे असे त्यांचे मत होते हे विचार टोरी पार्टीच्या सभासदांना रुचणारे नव्हते.

तिसऱ्या विल्यमने अखेरीस ह्या दोन्ही पक्षांपैकी ज्यांचे हाउस ऑफ कॉमन्समध्ये बहुमत आहे, त्या पक्षाचे मंत्रिमंडळ बनविण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे प्रथमच १६९६ मध्ये एकाच पक्षाचे मंत्रिमंडळ बनविण्यात आले. ह्या मंत्रिमंडळाला ज्युंटो (Junto) असे म्हटले जात असे. ह्या मंत्रिमंडळातील निवडक मंत्र्यांची वेगळी बैठक भरत असे. यातूनच 'कॅबिनेट' ह्या संकल्पनेचा जन्म झाला.

विल्यम नंतरच्या पहिल्या जॉर्जला (१७१४–१७२७) इंग्रजी व्यवस्थित बोलता येत नसे त्यामुळे तो मंत्रिमंडळाच्या बैठकींना यायचे टाळत असे. यातूनच राजाच्या अनुपस्थितीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रमुख म्हणून बसण्यासाठी पंतप्रधान ह्या पदाची निर्मिती झाली. व्हिग पक्षाचा रॉबर्ट वालपोल (१६७६–१७४५) हा १७२१ मध्ये पहिला पंतप्रधान झाला. ग्लॅडस्टनच्या काळात (१८०९ ते १८९८) लिबरल पार्टीचा उदय झाला हे खरे असले तरी १८८६ मध्ये आयर्लंडच्या प्रश्नावरून लिबरल पार्टीत फूट पडली आणि 'लिबरल युनियनिस्ट' या नावाने एक गट कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीमध्ये

विलीन झाला. लिबरल पार्टीमध्ये पुढे विसाव्या शतकाच्या सुरुवातीस 'नॅशनल लिबरल्स' आणि 'इंडिपेंडंट लिबरल्स' असे दोन तट पडले.

ह्या फुटीचा परिणाम निवडणुकांमध्ये दिसू लागला. एकोणिसशे एकोणतीसच्या सार्वत्रिक निवडणुकीत लिबरल पार्टीचे केवळ ५९ सभासद हाउस ऑफ कॉमन्समध्ये निवडून आले. एकोणिसशे पंचेचाळीसच्या निवडणुकीत ही संख्या बारावर आली. तर एकोणिसशे पन्नासच्या निवडणुकीत लिबरल पार्टीचे फक्त नऊ उमेदवार विजयी झाले. एकोणिसशे एकूणसाठच्या निवडणुकीपर्यंत ही संख्या सहापर्यंत घसरली.

आधी सांगितल्याप्रमाणे व्हिग पार्टीचे लिबरल पार्टी असे नामांतर झाले. त्याच वेळेला टोरी पार्टीचे कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी असे नाव पडले. या नावाचा पहिला वापर जे डब्ल्यू क्रोकर ह्यांनी केला. राष्ट्रीय संस्थांचे संरक्षण–त्यांची उन्नती हे टोरी पार्टीचे प्रमुख तत्त्व होते. त्याला अनुसरूनच 'कॉन्झर्व्हेटिव्ह' हे नवे नाव दिले होते. विसाव्या शतकात इंग्लंडमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्याच हातात अधिक काळ सत्ता राहिली आहे. सध्याचे मार्गारेट थॅचर यांचे सरकारही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे आहे.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या राजकीय विचारप्रणालीला एडमंड बर्क (१७२९ ते १७९७) आणि बेंजामिन डिझरेली (१८०४ ते १८८१) ह्यांनी निश्चित स्वरूप दिले. श्रीमंत आणि गरीब यांच्यातली दरी भरून काढण्यासाठी डिझरेलीने टप्प्या टप्प्याने करावयाच्या सामाजिक सुधारणांची (Progressive social reform) कल्पना मांडली. राष्ट्रीय संपत्तीचे समाजात शक्य तेवढे समान वाटप व्हावे, अशी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची सध्याची विचारसरणी आहे. औद्योगिक क्षेत्रात सुसूत्रिकरणाची या पक्षाला गरज वाटते; पण त्याचबरोबर खाजगी उद्योगधंद्यांना वाव देण्याची आवश्यकताही पक्षाच्या नेतृत्वाला जाणवत आलेली आहे. ह्या तत्त्वप्रणालीला 'वेल्फेअर कॅपिटालिझम्' असे म्हणतात. एकोणिसशे चौसष्ठ साली कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा सार्वत्रिक निवडणुकांत पराभव झाला आणि जवळजवळ तेरा वर्षांनी प्रथम लेबर पार्टी सत्तेवर आली ह्याच पार्श्वभूमीवर जेफ्री आर्चर यांच्या 'फर्स्ट अमंग इक्वल्स' ह्या कादंबरीची सुरुवात झाली आहे.

आपल्याकडील कांग्रेस पक्षासारखाच इंग्लंडमधील 'लेबर' हा शंभर वर्षांचा जुना पक्ष आहे. सुरुवातीस बराच काळ या पक्षाने संसदीय राजकारणात भाग घेतला नाही. लिबरल आणि टोरी हेच संसदेतील प्रमुख पक्ष होते. सुरुवातीस केवळ कामगारच या पक्षाचे सभासद असत; पण पुढे हे सभासदत्व अधिक विस्तृत बनत गेले. अठराशे चौतीसमध्ये रॉबर्ट ओवेन ह्या समाज सुधारकाने न्यू लानार्क येथे 'व्हिलेज ऑफ को-ऑपरेशन' स्थापन केले, तेथूनच या पक्षाची सुरुवात झाली. ह्या पक्षाची बांधणी समाजवादी तत्त्वांवर झाली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस तीन महत्त्वाच्या समाजवादी संघटनांची निर्मिती झाली, सोशल डेमोक्रॅटिक फेडरेशन (१८८१), फेबियन सोसायटी (१८८३) आणि इंडिपेंडंट लेबर पार्टी (१८९३).

याच सुमारास (१८७१) कायद्याने इंग्लंडमधील कामगार संघटनांना मान्यता देण्यात आली होती. या सर्व संघटनांचा पाठिंबा लेबर पार्टीला होता. सिडने, बियट्रिस वेब्, ग्रॅहम वाल्स, एच. जी. वेल्स आणि जॉर्ज बर्नार्ड शॉ अशा थोर विचारवंतांनी स्थापन केलेल्या फेबियन सोसायटीचा प्रभाव लेबर पार्टीच्या विचारप्रणालीवर पडला, याच काळात लेबर पार्टीचा पाया अधिकाधिक विस्तृत होत गेला.

फेबियन सोसायटीची अशी धारणा होती की, सामाजिक बदल हे संसदीय मार्गानेच घडवून आणता येतील. याच विचारांच्या प्रभावाखाली लेबर पार्टीने पुढे सार्वत्रिक निवडणुकांत भाग घेण्याचे ठरविले.

ब्रिटिश लेबर पार्टीची विचारसरणी शांततामय संसदीय मार्गाने समाजवादाची वाटचाल करणारी आहे. ह्या पक्षाला राष्ट्रीय संपत्तीचे नियोजन आणि काही महत्त्वाच्या उद्योग-धंद्यांचे राष्ट्रीयीकरण आवश्यक वाटते.

एकोणिसशे पंचेचाळीस ते एकोणिसशे एकावन्न ह्या काळात जेव्हा लेबर पार्टी सत्तेवर आली तेव्हा उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा पहिला प्रयोग केला गेला.

थोडक्यात सांगायचे तर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची तत्त्वप्रणाली जशी 'वेल्फेअर कॅपिटालिझमची' आहे त्याप्रमाणे लेबर पार्टीची तत्त्वप्रणाली 'वेल्फेअर स्टेट'ची आहे. अठराशे ब्याण्णव साली पहिल्यांदा लेबर पार्टीने सार्वत्रिक निवडणुकांत भाग घेतला. त्यावेळी त्या पक्षाने केवळ सत्तावीस मतदार संघातून निवडणूक लढविली होती. अठराशे पंच्याण्णवच्या निवडणुकीत लेबर पार्टीचे एकूण बारा उमेदवार हाउस ऑफ कॉमन्समध्ये निवडून आले. एकोणिसशे अठरा मध्ये ७४ उमेदवार विजयी झाले तर १९२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत २८७ उमेदवार निवडून आले आणि पहिले लेबर गव्हर्नमेंट सत्तारूढ झाले.

दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे १९४५ च्या निवडणुकीत लेबर पार्टीचे ३९६ सदस्य जिंकून आले. एकोणिसशे चौसष्टमध्ये जवळजवळ तेरा वर्षं कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी सत्तेवर राहिल्यानंतर चौसष्ठच्या निवडणुकीत लेबर पार्टीचा विजय झाला आणि हॅरॉल्ड विल्सन पंतप्रधान झाले. येथून पुढचा काळ जेफ्री आर्चर यांनी त्यांच्या कादंबरीच्या पार्श्वभूमीसाठी वापरला आहे. सध्या इंग्लंडमधील लेबर पार्टीचे प्रमुख मायकेल फूट हे आहेत.

हाऊस ऑफ कॉमन्समधील सत्तेचा खरा संघर्ष फक्त कॉन्झर्व्हेटिव्ह आणि लेबर पार्टीमध्येच आहे. बाकी जे लहान–सहान पक्ष आहेत त्यांपैकी लिबरल पार्टीबद्दल आधी सांगितलेच आहे. उरलेले दोन पक्ष म्हणजे स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टी आणि वेल्श नॅशनॅलिस्ट पार्टी. स्कॉटिश

नॅशनॅलिस्ट पार्टीची स्थापना १९२८ मध्ये झाली तर वेल्श नॅशनॅलिस्ट पार्टीची स्थापना १९२५ मध्ये. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये या पक्षांचे पाच आणि दहाच्या वर सभासद कधी निवडून आले नाहीत.

आपल्या लोकसभेच्या जशा ५४७ सीटस् आहेत त्याप्रमाणे इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सच्या एकूण ६३५ सीटस् आहेत. त्यांपैकी इंग्लंडमधील मतदारसंघ ५१६, वेल्समधले ३६, स्कॉटलंडमध्ये ७१ आणि उत्तर आयर्लंडमध्ये १२. दक्षिण आयर्लंड हे स्वतंत्र राष्ट्र आहे.

आपल्याकडे सहा ते सात लाख मतदारांचा एक लोकसभा मतदारसंघ बनतो तर ब्रिटनमध्ये एका मतदारसंघात साधारणतः साठ ते सत्तर हजार मतदार असतात.

ढोबळ मानाने ६३५ पैकी निम्मे मतदार संघ हे शहरातले (बरोज) असून निम्मे खेड्यातले (काऊंटीज्) आहेत. अशा या पार्श्वभूमीवर १९६४ ते १९९१ हा संसदीय काळ जेफ्री आर्चर यांनी 'फर्स्ट अमंग इक्वल्स्' साठी निवडला आहे. प्रत्यक्ष अस्तित्वात असलेली आणि काल्पनिक अशी पात्रे घेऊन कादंबरी लिहिण्याचा प्रघात आपल्याकडे नाही. त्यातून संसदीय राजकारणावर कादंबरी लिहिण्याचा प्रकार तर नाहीच नाही. (राजकीय पार्श्वभूमीवर मात्र अरुण साधूंच्या मुंबई दिनांक आणि सिंहासन ह्या दोन कादंबऱ्या आहेत.)

'फर्स्ट अमंग इक्वल्स्' ही आर्चर यांची १९८४ मध्ये प्रसिद्ध झालेली नवी कोरी कादंबरी. ह्या आधीच्या त्यांच्या पाच कादंबऱ्या बेस्ट सेलर लिस्टवर आल्या आहेत. वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी आर्चर पहिल्यांदा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकीटावर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडून आले. एकोणिसशे चौऱ्याहत्तरपर्यंत त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद म्हणून काम पाहिले. 'नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस' ही त्यांची पहिली यशस्वी कादंबरी आणि 'फर्स्ट अमंग इक्वल्स्' तर त्यांच्या अनुभवातून उतरलेली.

आर्चर हे अलेक्झांडर ड्युमा आणि गालसवर्दी यांच्या तोडीचे कादंबरीकार मानले जातात. 'फर्स्ट अमंग इक्वल्स्' मध्ये वाचकांचे औत्सुक्य अगदी शेवटच्या परिच्छेदापर्यंत कायम राहते.

या कादंबरीतील प्रमुख पात्रे चार. चारही हाऊस ऑफ कॉमन्सचे सभासद. चार्ल्स सेमूर आणि सायमन कस्लेक कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तर अँड्र्यू फ्रासर आणि रेमंड गोल्ड लेबर पार्टीचे सभासद.

चार्ल्स हा अर्ल ऑफ ब्रिजवॉटरचा दुसरा मुलगा. त्याचा विवाह त्याच्या सारख्याच उमराव घराण्यातल्या फिओनाशी झालेला. फिओना ही फालकिर्कच्या ड्युकची एकुलती एक मुलगी. चार्ल्सइतकीच तिलाही राजकारणाची जाण असते. सायमन कस्लेकचे वकिली पेशातले वडील तो लहान असतानाच वारले. त्यामुळे स्वतःच्या हिंमतीवर सायमनने त्याचे आयुष्य घडविलेले. त्याची पत्नी एलिझाबेथ 'सेंट मेरीज' हॉस्पिटलमध्ये डॉक्टर म्हणून काम करते आहे. आपली करीअर सांभाळून एलिझाबेथ सायमनला त्याच्या पोलिटीकल करीअरसाठी मदत करते आहे.

अँड्र्यूचे वडील सर डंकन फ्रासर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सभासद. आपल्या एकुलत्या एक मुलाला त्यांनी उत्तम शिक्षण देऊन वाढविलेले; पण अँड्र्यू मात्र लेबर पार्टीच्या तिकीटावर निवडणूक लढवितो. अँड्र्यूची बायको लुईस. तिला राजकारणात फारसा रस नाही; पण अँड्र्यूच्या सगळ्या महत्त्वाकांक्षांना तिची साथ आहे.

रेमंड गोल्ड लीडस्‌मध्ये एका खाटकाच्या कुटुंबात जन्माला आला. आयुष्यातले सारे यश त्याने स्वतःच्या प्रयत्नावर मिळविलेले. रेमंडची बायको जॉईस लग्नाआधी लीडस जनरल हॉस्पिटलमध्ये काम करते. पत्नी म्हणून जॉईस रेमंडला कधीच आवडली नाही; पण त्याच्या मतदारसंघात आणि कामगार संघटनांच्या पुढाऱ्यात जॉईस इतकी प्रिय आहे की, तिच्या प्रयत्नांनी त्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना आकार येतो.

एकोणिसशे चौसष्ठच्या सार्वत्रिक निवडणुकीत हे चौघेही हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडून येतात. चौघांचेही आयुष्य वेगवेगळे; पण महत्त्वाकांक्षा जबरदस्त. चौघांचेही ध्येय एक– सत्ता! एकोणिसशे चौसष्ठपासून मती गुंग करणारी ही शर्यत सुरू होते ती १९९१ पर्यंत आपल्याला खिळवून ठेवते. संसदीय राजकारणाच्या वेगवेगळ्या डावपेचांतून, चढ उतारातून त्यांच्यापैकी एकच इंग्लंडचा पंतप्रधान बनतो– 'फर्स्ट अमंग इक्वल्स्'– तो कोण? चार्ल्स की सायमन? अँड्र्यू की रेमंड? अशी ही शर्यत. सो ओव्हर टू जेफ्री आर्चर– □

**चा**र्ल्स गुर्नी सेमूर जर नऊ मिनिटे आधी जन्माला आला असता तर अर्ल ही पदवी इंग्रजी रिवाजाप्रमाणे त्याच्याकडे आपोआपच चालत आली असती. ह्या खेरीज स्कॉटलंडमधला राजवाडा, सॉमरसेटमधील घराण्याच्या मालकीची बावीस हजार एकर जमीन आणि लंडन-मधील सर्वात जुनी मर्चंट बँक त्याच्या वाट्याला आली असती.

आयुष्याच्या ह्या पहिल्या शर्यतीत दुसरा येण्याचे परिणाम इतक्या वर्षांनी त्याला पूर्णपणे जाणवायला लागले होते; पण चार्ल्सला पाहिल्यानंतर मात्र कुणालाही असेच वाटायचे की तोच घराण्याचा पहिला वारस आहे. त्याचा जुळा भाऊ रूपर्ट लहानपणापासूनच अति-शय नाजुक प्रकृतीचा. त्यातून त्याला मेनिंजाइटिस, डिप्थेरिया ते स्कार्लेट फीवरपर्यंतचे सगळे रोग होऊन गेलेले. चार्ल्स मात्र प्रकृतीने धडधाकट आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो रूपर्टपेक्षा कित्येक पटीने अधिक महत्त्वाकांक्षी होता.

ऑक्सफर्डच्या प्रेप स्कूलमध्ये पहिल्याच महिन्यात मुलांनी चार्ल्सला कॅप्टन म्हणून निवडले आणि वयाच्या बाराव्या वर्षीच तो नेता झाला इटॉमच्या शाळेत अभ्यास आणि खेळ ह्या दोन्हीतही चार्ल्स रूपर्टच्या पुढे असे.

त्या दोघांचे आजोबा ब्रिजवॉटरचे तेरावे 'अर्ल' एकोणिसशे सत्तेचाळीस साली मृत्यू पावले आणि वारसा हक्कानुसार सोळा



**चार्ल्स – आयुष्याच्या पहिल्याच शर्यतीत दुसरा**

¤

वर्षाचा रूपर्ट 'व्हायकाऊंट' झाला. अगदी अनोळखी व्यक्तीसुद्धा त्याच्याशी बोलताना 'माय लॉर्ड' म्हणायची आणि चार्ल्सची मात्र पदवी होती 'ऑनररी चार्ल्स सेमूर."

अठराव्या वर्षी शिक्षण सोडून रूपर्ट घराण्याच्या मालमत्तेकडे लक्ष द्यायला परतला त्या वेळी चार्ल्स ऑक्सफर्डला इतिहास हा प्रमुख विषय घेऊन शिकत होता. रूपर्टची अर्थशास्त्रातली गती पाहता सेमूर घराण्याच्या बँकेचे सर्व कामधाम शेवटी चार्ल्सलाच पाहावे लागणार होते. त्यामुळे एकदा त्याचे ऑक्सफर्डमधील शिक्षण संपले की वडिलांच्या हाताखाली त्याने ह्या बँकेत डायरेक्टर म्हणून सुरुवात करायची आणि कालांतराने चेअरमन व्हायचे अशी योजना होती. बँकेच्या शेअर्सची मालकी मात्र रूपर्टकडे राहाणार होती.

स्वतःमधल्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेची पहिली जाणीव चार्ल्सला ऑक्सफर्डमधील वादविवाद सभेत झालेले पंतप्रधान चर्चिल यांचे भाषण ऐकताना झाली वादाचा विषय होता– 'आय वुड बी अ कॉमनर दॅन लॉर्ड'– 'लॉर्ड बनण्यापेक्षा मी सामान्य मनुष्य होणे पसंत करीन.' पंतप्रधानांचे भाषण ऐकण्याची प्रत्येकाला उत्सुकता होती. हॉल गच्च भरला होता. चार्ल्स मागे उभा होता. चर्चिलच्या भाषणातला शब्द न् शब्द त्याला जागेत खिळवून ठेवीत होता. इतके प्रभावी व्यक्तिमत्त्व त्याने पूर्वी कधीच अनुभवले नव्हते. त्याच्या मनात क्षणभर विचार आला– चर्चिलही धाकटा भाऊ म्हणून जन्माला आल्याने 'नाइन्थ ड्युक ऑफ मालबरो' ही पदवी त्यांच्या नशिबी आली नाही; पण त्यांनी ह्या सगळ्या अनुवंशिक पदांचा त्याग केला आणि केवळ कर्तृत्वाच्या बळावर जगाचे राजकारण तीस वर्षे गाजवले.

त्या दिवसापासून चार्ल्सने कुणालाही त्याला 'ऑनररी चार्ल्स सेमूर' म्हणून संबोधू दिले नाही. त्याची महत्त्वाकांक्षा आता ह्या पदव्यांच्याही पलिकडे जाऊन पोहोचली होती.

चर्चिलचे त्या दिवशीचे भाषण दुसऱ्याही एका विद्यार्थ्याच्या मनावर ठसले होते; पण इतर मुलांसारखा घोळक्यांत-गर्दीत तो बसलेला नव्हता. सायमन कसलेक ऑक्सफर्ड युनियनचा प्रेसिडेंट होता. त्यामुळे व्यासपीठावर त्याच्यासाठी खास जागा करण्यात आलेली होती.

चार्ल्ससारखा सायमन आयुष्याच्या पहिल्या शर्यतीत दुसरा आलेला नव्हता; पण एकुलता एक असला तरी चार्ल्ससारखे त्याचे घराणे गर्भ श्रीमंतीचे नव्हते. त्याचे वडील वकील होते. प्रॅक्टिस सर्वसाधारण, आईवडिलांनी काटकसर करून सायमनला पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेण्याची संधी दिली. लान्सिंग कॉलेजमध्ये शेवटच्या वर्षाला असताना सायमनचे वडील अचानक वारले. आठवडाभरातच होते नव्हते तेवढे विकून त्याच्या आईने त्याच्या ऑक्सफर्डच्या शिक्षणाची सोय केली.

अगदी चालायला यायला लागले तेव्हापासूनच सायमनला आपण इतरांच्या सतत पुढे जावे अशी इच्छा असे. अमेरिकन लोकांनी अशा माणसाला कदाचित 'अचिव्हर' म्हटले असते; पण सायमनच्या बरोबरीच्या मुलांना तो 'पुशी–नेहमीच स्वतःचे घोडे पुढे दामटणारा' वाटायचा. काहींना तर तो उद्धटही वाटत असे.

शेवटच्या वर्षाची परीक्षा झाल्यावर सायमनने ऑक्सफर्डला प्रवेशासाठी अर्ज केला तेव्हा त्याला कळविण्यात आले की त्याला हव्या त्या विषयांसाठी अॅडमिशन मिळणे अशक्य आहे. सायमनच्या स्वभावाला हा निर्णय पचविणे जड होते.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे पत्र आले त्याच दिवशी डरहॅम युनिव्हर्सिटीने त्याला पाहिजे असलेल्या विषयात स्कॉलरशिप देऊ केली होती; पण त्याने डरहॅमची ऑफर नाकारली.

'ह्या देशाचे पंतप्रधान ऑक्सफर्ड मधूनच बाहेर पडलेले आहेत,' त्याने आईला सांगितले.

आईला त्याच्या हट्टीपणाची सवय झाली होती. घासून झालेली भांडी बाजूला सारत ती म्हणाली, 'मग केंब्रिजला का नाही जात ?'

'ऑक्सफर्ड सारखी केंब्रिजला राजकीय परंपरा नाही.'

'पण जर अॅडमिशन मिळण्याची शक्यताच नसेल...'

'म्हणूनच मी ऑक्सफर्डला अंडरग्रॅज्युएट म्हणून प्रवेश घेणार आहे.'

अठरा वर्षांच्या अनुभवाने सायमनच्या आईला ठाऊक होते, हा मुलगा आपल्या सांगण्याने काही बधणार नाही.

ऑक्सफर्ड मधली टर्म सुरू होण्याआधी जवळजवळ चौदा दिवस सायमनने एका छोट्या गेस्टहाऊसमध्ये खोली घेतली. तेथे बसून त्याने ऑक्सफर्डमधल्या सगळ्या कॉलेजांची एक यादी तयार केली. आणि सकाळ संध्याकाळ तीन–तीन कॉलेजेसना भेटी द्यायचे ठरविले. तेथल्या सगळ्या ट्युटरना त्याला एकच प्रश्न विचारायचा होता–

'तुम्ही अॅडमिशन दिल्यानंतरही ज्याला येता येणे शक्य नाही असा विद्यार्थी तुमच्या पटावर आहे का ?'

चार दिवस या शोधात गेले. शेवटी केंब्रिजला जाण्याशिवाय गत्यंतर नाही अशा विचारातच सायमन ऑक्सफर्डच्या वर्सेस्टर कॉलेजमध्ये शिरला. कॉलेजचे ट्युटर अॅलन ब्राऊन म्हणाले, 'नॉटिंगहॅम हायस्कूलच्या एका विद्यार्थ्याला प्रवेश देण्यात आला होता; पण तो

गेल्याच महिन्यात मोटर सायकलच्या अपघातात मरण पावला. ती जागा रिकामी आहे.'

सायमनला एकदम हायसे वाटले; पण अजून कोणत्या कोर्ससाठी ही जागा आहे ते ठाऊक नव्हते. त्याने मनातल्या मनात प्रार्थना केली 'देव करो आणि केमिस्ट्री, आंथ्रापॉलॉजी आणि क्लासिक्ससाठी ही जागा नसू दे.'

'व्हॉट कोर्स?' त्याने चाचरत ब्राऊनना विचारले. ब्राऊनना आता सायमनची गंमत वाटायला लागली होती. चष्मा नाकावर बरोबर बसवित त्यांनी टेबलावरची डायरी चाळून पाहिली. मग सायमनकडे पहात म्हणाले, 'हिस्ट्री–इतिहास!'

सायमनला त्याच्या हृदयाची धडधड अगदी स्पष्ट ऐकू येत होती.

'मागदालिन कॉलेजला माझी पॉलिटिक्स, फिलॉसॉफी आणि इकॉनॉमिक्सची जागा थोडक्याकरता गेली. मला तुम्ही ह्या जागेकरता प्रवेश द्याल का?'

ब्राऊनना आता हसू आवरेना. गेल्या चोवीस वर्षात त्यांना असा प्रश्न कोणी विचारला नव्हता.

त्यांनी चष्मा बाजूला काढून ठेवला आणि मग गंभीरपणे विचारले,

'संपूर्ण नाव?'

'सायमन जॉन कस्लेक.'

डॉ. ब्राऊननी फोन उचलला आणि डायरीतला एक नंबर फिरविला.

'निगेल? मी ब्राऊन. सायमन कस्लेक या नावाच्या कुणी विद्यार्थ्याने तुझ्या कॉलेजला ॲप्लिकेशन केलं होतं का?'

सायमनला ॲडमिशन मिळून वर्षभरात तो ऑक्सफर्ड युनियनचा प्रेसिडेंटही झाला; पण त्याच्या आईला त्याचे आश्चर्य वाटले नाही.

'ही फक्त पहिली पायरी आहे. इंग्लंडचे सगळे पंतप्रधान याच मार्गाने गेले आहेत.' सायमनची थट्टा करत ती म्हणाली, 'ग्लॅडस्टोन, ॲक्विथ आणि आता कस्लेक.'

रेमंड गोल्डचा जन्म लिड्समधल्या एका लहानशा घरात झाला. वरच्या मजल्यावरील त्या खोलीला एकही खिडकी नव्हती. तळमजल्यावर त्याच्या वडिलांचे मटनाचे एक दुकान होते. रेमंडचा जन्म झाला त्या खोलीत त्याची आजी रहात होती. रेमंड नऊ वर्षांचा झाला तेव्हा आजी वारली. मरते वेळी तिचे वय होते एकसष्ठ वर्षे.

रेमंडच्या आजोबांना पहिल्या महायुद्धात इंग्लंडसाठी लढताना मृत्यू आला होता. आजी त्याला नेहमी युद्धाच्या गोष्टी सांगायची. आजोबांच्या पराक्रमाची वर्णने ऐकताना रेमंड थरारून जायचा. खाकी पोषाखातले आजोबा त्याच्या डोळ्यांपुढे यायचे. आजीने तो पोषाख घडी घालून काळजीपूर्वक ट्रंकेच्या तळाशी ठेवला होता. तो नेहमी काढून ती 'रे'ला दाखवायची. आजोबांचा एक जुना फोटोही तिने जपून ठेवला होता. तो नेहमी तिच्या उशाखाली ठेवलेला असे.

रेमंड जसजसा मोठा होत चालला तसतसा आजीच्या गोष्टी ऐकताना त्याचे काळीज गलबलून यायचे. आजीला विधवा होऊन तीस वर्षे लोटली होती. ती कोंदट खोली आणि रेमंड ह्या पलिकडे तिला जग उरले नव्हते. नवरा देशासाठी लढताना मारला गेला म्हणून तिला पाचशे वॉर बॉंडस् देण्यात आले होते. त्या बदल्यात एकही पैसा तिला मिळालेला नव्हता. आजी मेली तेव्हा तिने काही मृत्यूपत्र करून ठेवलेले नव्हते. एकच काय ती खोली. ती आता रेमंडची अभ्यासाची जागा बनली.

रेमंड त्या खोलीत अहोरात्र वाचत बसायचा. तो जवळजवळ पुस्तकातला किडाच होत चालला होता. दर तिमाहीनंतर येणारे रेमंडचे प्रगती पुस्तक पाहून त्याच्या वडिलांची खात्री पटत चालली हा काही बापाचा धंदा पुढे चालवत नाही.

अकरा वर्षांचा असताना रेमंड स्कॉलरशिपच्या परीक्षेत पहिला आला. आईने साठविलेल्या पैशांतून त्याला पहिली लाँग पॅंट आणून दिली. पॅंटमध्ये तो आईपेक्षाही उंच दिसायला लागला. त्याची ती हडकुळी शरीरयष्टी, जाड भिंगांचा चष्मा आणि लालसर कुरळे केस पाहून आईला नेहमी काळजी वाटायची की शाळेतील मुले त्याची थट्टा करतील–सतावतील.

पहिली टर्म संपता संपता हेडमास्तरांच्या लक्षात आले की, रेमंडने संपूर्ण वर्षाचा अभ्यास उरकला होता. त्यांनी त्याला वरच्या वर्गात बसविले. त्या वर्गातही वार्षिक परीक्षेत रेमंड तिसरा आला. लॅटिन आणि इंग्लिशमध्ये त्याला सर्वात जास्त मार्कस् पडले. खेळ हाच काय तो रेमंडचा वीकपॉइंट होता. त्याच एका विषयात त्याला कमी मार्कस् पडायचे.

याच वर्षी रेमंडला शाळेच्या निबंध स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले. बक्षीस मिळालेल्या इतर मुलात तो वयाने सर्वात लहान होता.

पहिल्या क्रमांकाचा निबंध दरवर्षी शाळेच्या समारंभात वाचून दाखविला जात असे. स्पर्धेचा निकाल लागायच्या आतच रेमंडने निबंध वाचायची प्रॅक्टिस खोलीत केली होती. न जाणो बक्षीस मिळाले आणि प्रॅक्टिसला वेळ मिळाला नाही तर?

स्पर्धेच्या सुरुवातीस हेडमास्तरांनी मुलांना सांगितले होते की, त्यांच्या अनुभवातूनच त्यांनी निबंधाचा विषय निवडावा. एकूण ३७ मुलांनी भाग घेतला. रेमंडने त्याच्या आजीबद्दल लिहिलेला निबंध वाचताना हेडमास्तरांना त्याच्या अनुभवातली–लिखाणातली ताकद जाणवली. कुणाला पहिले बक्षीस द्यावे असा प्रश्न त्यांच्या पुढे पडला नाही. त्यांना फक्त रेमंडच्या निबंधाचे नाव आवडले नाही. पहिले बक्षीस दिल्याबद्दल रेमंडने त्यांचे आभार मानले; पण नाव काही बदलले नाही.

समारंभाच्या दिवशी सातशे मुले आणि त्यांचे पालक हॉलमध्ये भाषण ऐकण्यासाठी जमले होते. हेडमास्तरांनी त्यांच्या भाषणाच्या शेवटी निकाल जाहीर केला– 'रेमंड गोल्ड'

रेमंडचे आईवडीलही समारंभाला आले होते. रेमंड आई शेजारून उठून स्टेजवर जाऊन उभा राहिला. बाहेरून त्याने कितीही धीटपणा दाखविला तरी आतून धडधड चालूच होती. त्याने निबंधाचे नाव जाहीर केले तसे समोर बसलेली मुले हसायला लागली. त्यामुळे त्याने पहिल्या काही ओळी अडखळत वाचल्या; पण तो शेवटच्या परिच्छेदापर्यंत पोहोचेस्तोवर सभागृहात शांतता पसरली. त्याने शेवटची ओळ वाचून संपवली आणि मुलांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. रेमंडच्या आयुष्यातले हे पहिले भाषण. रेमंडचे वय तेव्हा बारा वर्षांचे होते.

रेमंड जेव्हा स्टेजवरून जागेवर गेला तेव्हा त्याच्या वडिलांचा चेहरा अभिमानाने फुलला होता आणि आईच्या डोळ्यात अश्रू उभे होते. रेमंड खाली बसेपर्यंत टाळ्या चालूच होत्या. निबंधाचा कागद रेमंडने मुठीत घट्ट पकडला होता. त्याने परत एकदा निबंधाचे नाव पाहिले– ' द फर्स्ट चेंजेस आय वील मेक व्हेन आय बिकम प्राइम मिनीस्टर– पंतप्रधान झाल्यावर मी कोणता बदल प्रथम करेन.'

एक वर्षाचा असताना अँड्र्यू फ्रासर हा पहिल्या राजकीय सभेला हजर राहिला. स्टेजवरती त्याचे आईवडील बसले होते आणि हॉलच्या एका कोपऱ्यात बाबागाडीत अँड्र्यूला बसविण्यात आले होते. त्याला भाषणातले काही कळले नाही; पण टाळ्यांचा आवाज मात्र समजला.

अँड्र्यूचे वडील स्कॉटलंडमधील सर्वांत उत्तम फुटबॉलपटू होते आणि त्यावर्षी प्रथमच ते एडिंबरो कार्लेटनच्या महापालिकेची निवडणूक लढवित होते. डंकन फ्रासर फुटबॉल उत्तम खेळतात खरे; पण त्यांना राजकारण कितपत जमेल याची सर्वांनाच शंका होती आणि तसेच झाले. कॉन्झर्व्हेटिव्हच्या तिकीटावर ते निवडणूक तीनशे मतांनी हरले.

अँड्र्यू चार वर्षांचा झाला तेव्हा त्यांनी पहिल्यांदा निवडणूक जिंकली. निवडणुकीच्या सगळ्या भाषणांना आईबरोबर त्याचीही हजेरी असे. डंकन फ्रासर दोनशेसात मतांनी विजयी झाले. यानंतरची नऊ वर्षे सतत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने सीट ताब्यात ठेवली. अँड्र्यू तेव्हा तेरा वर्षांचा झाला होता. प्रचाराच्या साऱ्या खुणा त्याला उत्तम अवगत झाल्या होत्या. एडिंबरो कार्लेटन आता कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा बालेकिल्ला बनला होता.

एडिंबरोच्या अकादमीत अँड्र्यू शाळेच्या डिबेट टीमचा कॅप्टन झाला. भाषण द्यायची त्याला इतकी सवय होती की, त्याच्या कॅप्टनसी खाली शाळेने वादविवाद स्पर्धेत पहिल्यांदाच ट्रॉफी जिंकली.

अँड्र्यू चेहऱ्याने वडिलांवर गेलेला. उंची पाच फूट नऊ इंच. चेहऱ्यावर कायम मिस्किल हास्य. वडिलांसारखाच तो उत्तम फुटबॉल खेळत असे.

मॅट्रिक झाल्यावर एडिंबरो युनिव्हर्सिटीत त्याने पॉलिटिक्स ह्या विषयाकरता नाव नोंदविले. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षापर्यंत तो कॉलेजच्या फुटबॉल टीमचा कॅप्टन बनला.

डंकन फ्रासर यांना जेव्हा ' लॉर्ड प्रोव्होस्ट ' ही पदवी बहाल करण्यात आली तेव्हा समारंभासाठी अँड्र्यू आईवडिलांबरोबर लंडनला गेला. बकिंगहॅम पॅलेसमध्ये त्याने पाहिलेला तो पहिला समारंभ.

समारंभ उरकल्यावर ' सर ' डंकन फ्रासर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये एडिंबरो कार्लेटनच्या कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्याला—इन्सले मन्रोला भेटण्यासाठी गेले. मन्रोने जेवताना त्यांना सांगितले की ह्या पुढे त्यांना निवडणूक लढवायची इच्छा नाही. त्यामुळे नवा उमेदवार शोधणे जरूरीचे होते. सर डंकनची साहजिकच इच्छा होती की, उमेदवारी आपल्या मुलाला मिळावी.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षात अँड्र्यूने त्याचा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या इतिहासावरील प्रबंध पूर्ण केला; पण ह्या संशोधनाचे फलित काही त्याने वडिलांना सांगितले नाही. मन्रोने राजिनामा जाहीर केला तेव्हाच त्याने वडिलांना आपल्याला निवडणूक लढवायची इच्छा असल्याचे सांगितले.

अँड्र्यूने निवडणूक लढवायचा निर्णय जाहीर केला त्या दिवशी एडिंबरो इव्हिनिंग न्यूजची हेडलाईन होती ' लाईक फादर, लाईक सन ' वडिलांच्या पुण्याईवर अँड्र्यू निवडणूक जिंकेल यात कुणालाच शंका नव्हती. सर डंकनना मात्र थोडी भीती वाटत होती. इतक्या लहान वयात पार्टी त्याला कदाचित तिकीट देणार नाही. सिलेक्शन कमिटीच्या सदस्यांना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत आठ स्कॉटिश पंतप्रधान झाले आणि ते सगळे वयाची तीस वर्षे पुरी व्हायच्या आत हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडून गेले होते. फारशी चर्चा न होताच अँड्र्यूला कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तिकीट द्यायचे ठरले.

सर डंकन खुशीत घरी परतले आणि अँड्र्यूला फोन करून त्यांनी न्यू क्लबमध्ये जेवायला बोलाविले. मुलाच्या पहिल्या निवडणुकीसाठी प्रचाराची योजना त्यांना आखायची होती.

' एडिंबरो कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे ' सर डंकन म्हणाले.

' आणि लेबर पार्टीचाही ' अँड्र्यू मिस्किल हसत म्हणाला.

' तुला काय म्हणायचे आहे मला कळले नाही ?'

' मी निवडणूक लढविणार आहे पण कॉन्झर्व्हेटिव्हच्या तिकिटावर नाही, लेबर पार्टीच्या तिकिटावर !'

सर डंकनना धक्काच बसला ! अँड्र्यू काय बोलतो आहे ह्यावर त्यांचा क्षणभर विश्वासच बसला नाही.

कॉलेजमधल्या प्रबंधाचे हेच फलित होते म्हणायचे तर !!

# द बॅक बेंचर्स

पंतप्रधानांना प्रश्न विचारायची वेळ संपली आणि सभापतींना हायसे वाटले. दुपारी पावणेतीन ते साडेतीन ह्या प्रश्नोत्तराच्या काळात सभागृहात शांतता राखणे फार जिकिरीचे काम असते. कार्यक्रम पत्रिकेवरील पुढचा आयटम आता नवीन सदस्यांच्या शपथविधीचा होता.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या वातावरणाचे दडपण नव्या सदस्यांवर असायचे आणि त्यात शपथविधीच्या सोहळ्यात सभागृहात तीस–चाळीस वर्षे काढलेले जवळपास तीस–चारशे सदस्य आपल्याकडे ' बेबी ऑफ द हाऊस ' म्हणून पाहात आहेत ह्या भावनेमुळे त्यांना अधिकच बावचळल्यासारखे व्हायचे.

टोरी पार्टीच्या चिटणीसाने चार्ल्सकडून ह्या सगळ्या सोहळ्याची भरपूर तालीम करून घेतली होती. प्रेक्षकांच्या गॅलरीत त्याची बायको फिओना; वडील–ब्रिजवॉटरचे चौदावे अर्ल आणि व्हिसकाउंट रूपर्ट सेमूर बसले होते. ही निवडणूक चार्ल्सच्या राजकीय जीवनाची पहिली पायरी.

दोन महिन्यांपूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत चार्ल्सला साऊथ वेल्समधून कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तिकीट मिळाले होते. हा भाग खाण कामगारांचा. त्यामुळे लेबर पार्टीचे वर्चस्व अधिक. 'सीट जिंकली नाही तरी हरकत नाही. निदान तुला निवडणुकीचा अनुभव तरी येईल' असे पार्टीच्या सेंट्रल ऑफिसमधून त्याला सांगण्यात आले होते आणि त्यांचे म्हणणे बरोबर ठरले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा २०,१०० मतांनी पराभव झाला. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट एवढीच की, मागच्या निवडणुकीत हा लीड २२,३०० मतांचा होता. चार्ल्सला वाटले आता पुढची पाच वर्षे तरी आपल्याला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रवेश नाही; परंतु निवडणुकीनंतर महिन्याभरातच ससेक्स डाऊन्समधून निवडून आलेले सर एरिक कूपस् हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले. 'बाय–इलेक्शन'साठी पार्टीने चार्ल्सला पुन्हा उभे केले. यावेळेस मात्र तो २०,००० मतांची आघाडी मिळवून निवडून आला.

हाऊसमधली दोन–चार भाषणे ऐकल्यानंतर चार्ल्स पाय मोकळे करण्यासाठी लॉबीमध्ये आला तेव्हा त्याची अँड्र्यूशी पहिली भेट झाली. चार्ल्सचा हाउस ऑफ कॉमन्समधला पहिला दिवस होता तर अँड्र्यूला हाऊसमध्ये येऊन दोन महिने झाले होते. तो जितक्या आत्मविश्वासाने हाउसमध्ये वावरत होता त्यावरून त्याला कुणी नवशिका म्हटले नसते. अँड्र्यू एडिंबरो कार्लेटनमधून लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडून आला. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या उमेदवारापेक्षा त्याला ३४१९ मते अधिक मिळाली.

निवडून आल्याबद्दल चार्ल्सचे अभिनंदन करून अँड्र्यूने स्वतःची ओळख करून दिली आणि पहिला प्रश्न विचारला,

'आय होप यु हॅव नॉट यट् फाऊंड युअरसेल्फ अ पेअर ?'

'पेअरचे सोडा पहिल्या दिवशी हाऊस ऑफ कॉमन्स सापडले हेच नशीब समजा' चार्ल्स म्हणाला.

सभागृहाच्या सदस्यांना अत्यावश्यक कामासाठी हाऊस सोडून बाहेर जाणे गैरसोयीचे पडू नये म्हणून पेअरिंगची पद्धती अस्तित्वात आली.

ब्रिटिश पार्लमेंट संपूर्ण वर्ष चालू असते. सोमवार ते गुरुवार दुपारी अडीचला सेशन सुरू होते ते रात्री साडेदहाला तहकूब केले जाते. महत्त्वाच्या बिलावर चर्चा चालू असेल तर मतदान होईस्तोवर मीटिंग रात्री अडीच तीनपर्यंतही चालते. शुक्रवारी मात्र सभा अकरा वाजता भरते आणि दुपारी साडेचारला संपते. शनिवारी आणि रविवारी पार्लमेंटला सुट्टी असते. ह्या वेळात सभासदांना त्यांच्या मतदारसंघात जाणे शक्य होते. ख्रिसमस आणि इतर सुट्ट्या जमेस धरता वर्षभरात पार्लमेंटच्या सर्वसाधारणतः एकशे साठ मीटिंगस् होतात.

आपापल्या पार्टीच्या सदस्यांच्या पार्लमेंटमधील कामकाजात सुसूत्रता राखण्यासाठी प्रत्येक पार्टी चीफ व्हिप (पार्लमेंटरी ऑर्गनायझिंग सेक्रेटरी) नेमते. व्हिपच्या कार्यालयातून कामकाजाबद्दल दिलेले आदेश तीन प्रकारचे असतात– वन लाईन टू लाईन आणि थ्री लाईन व्हिप. थ्री लाईन व्हिप असेल तेव्हा सभासदांची हाऊसमधल्या मतदानास उपस्थिती अत्यावश्यक असते. वन लाईन किंवा टू लाईन व्हिप असेल तेव्हा सदस्यांना मतदान टाळून घरी लवकर परतणे शक्य असते. ह्यासाठीच पेअरिंगची पद्धती अस्तित्वात आली.



रेमंड–बुद्धिमत्तेचा प्रभाव जाणवू लागला

ह्या पद्धतीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा एक सदस्य आणि लेबर पार्टीचा एक सदस्य ह्यांची जोडी असते. सभासदाला काही खाजगी कारणासाठी रात्री उशिरापर्यंत हजर राहणे अशक्य असेल तर विरोधी पार्टीच्या जोडीदाराला तो तसे कळवितो आणि दोन्ही सदस्य त्यांच्या चीफ व्हिपच्या संमतीने मतदानात भाग घेत नाहीत. त्यामुळे सभासदाच्या अनुपस्थितीचा प्रत्यक्ष मतदानावर परिणाम होत नाही. चार्ल्सशी स्वतः होऊन ओळख करून घेण्यात अँड्र्यूची खरी गरज पेअरिंगची होती.

'आयम् डिलायटेड टु पेअर विथ् यू' चार्ल्स अँड्र्यूला म्हणाला, 'त्यासाठी काही ऑफिशिअल अॅग्रिमेंटची आवश्यकता आहे का ?'

'छे छे, फक्त तुम्हाला जेथे जेथे काँटॅक्ट करता येईल ते सर्व फोन नंबर्स मला देऊन ठेवा. माझे फोन नंबर्स मी तुम्हाला देतो. तुम्हाला हाऊसमध्ये थांबायचे नसेल त्या दिवशी फक्त मला कळवा.'

चार्ल्सला ही व्यवस्था पसंत पडली. त्याला सोडून अँड्र्यू लेबर पार्टीच्या पार्लमेंटरी विंगच्या मीटिंगसाठी दुसऱ्या मजल्यावर निघाला तोवर चार्ल्सचा ताबा अलेक् पिम्किनने घेतला. पिम्किनने तीस वर्षे कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा सदस्य म्हणून हाऊसमध्ये काम केले होते. ड्रिंक घेण्यासाठी ते चार्ल्सला स्मोकिंग रूममध्ये घेऊन गेले.

'आइल् टेल् यू हाउ धिस ब्लडी प्लेस वर्कस्', ते म्हणाले.

अँड्र्यू मीटिंगला आला तेव्हा नाकावरचा चष्मा सावरत रेमंड आधीच जागेवर येऊन बसलेला होता. निवडून आल्यानंतर पाच-सहा आठवड्यातच रेमंडच्या बुद्धिमत्तेचा प्रभाव लेबर पार्टीच्या सदस्यांना जाणवायला लागला होता. काही मोजक्या जुन्या सदस्यांना वाटले हा उत्साह फार काळ टिकायचा नाही; पण बऱ्याच सभासदांना वाटू लागले होते की, रेमंडला लवकरच पुढच्या बाकावर प्रमोशन मिळेल. रेमंड लीडस् मतदार संघातून दहा हजार मतांची आघाडी घेऊन निवडून आला होता.

एकूण सदतीस उमेदवारांमधून लीडस् नॉर्थच्या लेबर पार्टीने

रेमंडची निवड केली होती. कामगार चळवळ आणि समाजवादावरील त्याचे ज्ञान पाहून निवड समितीचे लोक थक्क झाले. आणखी एक गोष्ट रेमंडच्या बाजूची ठरली. ती म्हणजे केंब्रिज युनिव्हर्सिटीची शिष्यवृत्ती मिळूनही त्याने लीड्स् युनिव्हर्सिटीत शिक्षण घेणे पसंत केले होते.

लीड्स् युनिव्हर्सिटीत त्याने कायद्याची पदवी घेतली आणि बॅरिस्टर होण्यासाठी तो लंडनला आला. लंडनमध्ये ज्या लोकात तो वावरायला लागला तेथे वडिलांच्या व्यवसायाचा उल्लेख त्याने प्रयत्नपूर्वक टाळला. कोणी 'रे' म्हणून हाक मारलेलीही त्याला आवडायचे नाही. त्याचे हाऊसमधले भाषण ऐकण्यासाठी त्याची बायको जॉइस् प्रेक्षकांच्या कक्षात आली तेव्हा तिने खाली त्याला चिठ्ठी पाठवली.

'रे, आयव्ह कम्' रेमंडने चिठ्ठीकडे एक नजर टाकली आणि कागद चुरगाळून केराच्या टोपलीत टाकला.

चार्लसप्रमाणे सायमनही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकिटावर निवडून आला होता; पण चार्लस इतकी मते काही त्याला पडली नाहीत. जेमतेम नऊशे अटरा मतांची आघाडी त्याला मिळाली. त्यामुळे लेबर पार्टीच्या सरकारने मुदतपूर्व निवडणुका घ्यायचे ठरविले तर त्याला पुन्हा निवडून येण्याची शक्यता वाटत नव्हती.

ऑक्सफर्डची पदवी घेतल्यानंतर सायमनने ससेक्स लाईट इन्फंट्रीत दोन वर्षे काढली. तेथे सेकंड लेफ्टनंट म्हणून बढती मिळाल्यानंतर तो सैन्यातली नोकरी सोडून बीबीसीमध्ये ट्रेनी म्हणून कामाला लागला. तेथे ड्रामा, स्पोर्टस्, करंट अफेअर्स अशा विविध विभागात काम करीत तो 'पॅनोरमा' ह्या कार्यक्रमाचा निर्माता झाला.

ह्या सगळ्या धडपडीच्या काळात लंडनमध्ये एक छोटासा फ्लॅट भाड्याने घेऊन तो राहत होता आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा मेंबर म्हणून फावल्या वेळात कामही करीत होता. पार्टीच्या छोट्यामोठ्या सभा भरविण्यापासून ते पत्रके तयार करणे, भाषणे देणे अशी सारी कामे तो करायचा. एकोणिसशे एकूणसाठच्या निवडणुकीत पार्टीच्या सेंट्रल ऑफिसमध्ये चेअरमनचा पर्सनल असिस्टंट म्हणून त्याची नेमणूक झाली.

बीबीसीत काम करीत असतानाच सायमनची एलिझाबेथ हॅरूमंडशी ओळख झाली. 'पॅनोरमा' मध्ये नॅशनल हेल्थ सर्व्हिसवर एक कार्यक्रम करण्यात आला होता त्यात एलिझाबेथला भाग घेण्यासाठी निमंत्रण देण्यात आले होते.

कार्यक्रमापूर्वी गप्पा मारताना एलिझाबेथने सायमनला स्पष्टपणे सांगितले होते की, तिचा पत्रकारांवर काडीचाही विश्वास नव्हता आणि राजकारणी लोकांचा तर तिला तिटकारा होता. एक वर्षानी एलिझाबेथने सायमनशी लग्न केले. पुढच्या दोन वर्षात त्यांना २ मुलेही झाली. मुले झाली म्हणून एलिझाबेथने नोकरी मात्र सोडली नाही. एकोणिसशे चौसष्टच्या निवडणुकीत कोव्हेंट्री सेंट्रलच्या मतदार संघातून कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तिकीट मिळाल्यावर सायमनने तावडतोब बीबीसीच्या नोकरीचा राजिनामा दिला.

पेअरिंगमुळे आज हाऊसमधून लवकर बाहेर पडणे सायमनला शक्य झाले. गाडी सेंट मेरीज् हॉस्पिटलच्या आवारात उभी करून त्याने घड्याळ पाहिले. डॉक्टर एलिझाबेथ कसलेक् काम आटोपून बाहेर पडायला अजून पाच मिनिटे अवकाश होता.

सकाळी घरी चहा घेता घेता रेमंडने परत एकदा निमंत्रण पाहिले. नंबर टेन डाउनिंग स्ट्रीट– इंग्लंडच्या पंतप्रधानांचे निवासस्थान. टेन डाउनिंग स्ट्रीट आतून पाहण्याची त्याला मिळालेली ही पहिलीच संधी. तेरा वर्षानंतर प्रथम लेबर पार्टीचे सरकार बनले होते. चहा पिता पिता रेमंडने ते निमंत्रण जॉइस्‌कडे दिले.

'मी रवीवारू की, जमणार नाही म्हणून सांगू?' जॉइस् म्हणाली.

लंडनमधल्या वास्तव्याचा जॉइस्‌वर काही एक परिणाम झालेला नव्हता. तिच्या आवाजातला यॉर्कशायरचा ढंग अगदी सहज ओळखू यायचा. एक जॉइस् सोडली तर दुसरे कोणीही त्याला 'रे' म्हणून हाक मारायचे नाही. जॉइस्‌च्या प्रश्नातला विनोद रेमंडला मुळीच आवडला नाही. पुन्हा एकदा त्याच्या मनात विचार आला. 'जॉइस्‌शी लग्न करून आपण फसलोच.'

लीड्स् जनरल हॉस्पिटलच्या परिचारिकांनी आयोजित केलेल्या एका डान्स पार्टीमध्ये त्याची जॉइस्‌शी पहिली भेट झाली होती. खरं पाहता त्याला पार्टीला जायची इच्छा नव्हती; पण कॉलेजच्या मित्राने आग्रह धरला म्हणून तो गेला.

रेमंडला लोकांत मिसळायची सवय नव्हती. त्यातून मुलींशी कसे वागायचे हा त्याच्यापुढे प्रश्नच असायचा. शेवटी पार्टीला गेला तेव्हा इतर सर्वांना जोडीदार मिळाले, तरी रेमंड आपला कोपऱ्यात बसून होता. आपण येथे येण्यात चूकच केली या विचारात तो लवकरात लवकर निसटण्याचा मार्ग शोधायला लागला त्याच वेळी जॉइस् त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. तिनेच पुढाकार घेऊन त्याला जोडीदार म्हणून नृत्याला बोलाविले. मुलींबरोबर नृत्य करण्याचा रेमंडचा हा पहिला अनुभव.

दोन्ही हातांनी तिचे खांदे धरल्यावर रेमंडने तिला निरखून पाहिले. वाटले तेवढी वाईट नव्हती. जवळ जवळ पाच फूट सात इंच उंची. केसांची पोनीटल, करड्या रंगाचे डोळे. मेकप जरा जास्तच. पायाच्या पोटऱ्या मात्र रेखीव होत्या. मध्यरात्रीपर्यंत पार्टी संपली आणि रेमंड एकटाच त्याच्या खोलीकडे परतला. आपण जन्मभर ब्रह्मचारी रहाणार अशी भीती त्याला वाटत होती ती तेवढी काही खरी नव्हती.

पुढच्या रविवारी जॉइसला त्याने बोटिंगसाठी बोलाविले; पण मुलींच्या सहवासात त्याला इतके बुजल्यासारखे व्हायचे की, जॉइस आपल्याला हसते आहे असेच त्याला वाटत राहिले. जॉइस सर्व वेळ तिच्या घराबद्दल बोलत राहिली.

निघण्यापूर्वी तिने रेमंडला खोलीवर चहाला बोलाविले. तेथे त्याने जॉइसचे पहिले चुंबन घेतले. रेमंडला तो अनुभव तितकासा रोमांचकारक वाटला नाही.

'इट विल बी इझिअर नेक्स्ट टाइम.' जॉइस किंचित लाजत म्हणाली आणि ते खरं होतं. हळूहळू रे–रेमंड गोल्ड लीडस जनरल हॉस्पिटलच्या ह्या नर्समध्ये अडकत गेला. आता तिच्या ओठावर ओठ ठेवले तरी ती डोळे मिटून घेत नसे.

पण सहा महिन्यात रेमंड तिला कंटाळला. आपल्याला आता या प्रेमप्रकरणात रस उरलेला नाही हे सांगून टाकायला रेमंडला धीर होत नव्हता आणि जॉइस तर पुढच्या आयुष्याची चर्चाही करायला

लागली होती. त्यातच तिने त्याला सांगितले ती प्रेग्नंट आहे. चला, म्हणजे सगळेच संपले. आता गर्भपाताचा विषय काढला तर रेमंडच्या वडिलांनी मटण कापायचा सुराच काढला असता. जॉइस यॉर्कशायरची आहे हे ऐकून रेमंडच्या आईला हायसे वाटले. आपली सून आपल्यासारखीच यॉर्कशायरची असावी एवढीच तिची माफक अपेक्षा होती.

लग्न सेंट मेरीजच्या चर्चमध्ये लागले. रेमंडला आपल्या लग्नातला कुठलाही फोटो आवडला नाही. जॉइस मात्र अगदी खुशीत दिसत होती. रेमंडला वाटले फोटोत ती दोघं नवरा बायकोऐवजी बापलेकच वाटत होती.

हनिमूनसाठी दोघेही पॅरीसला गेले. हनिमूनच्या दुसऱ्या रात्रीच जॉइसचा गर्भपात झाला. ते तातडीने घरी परतले. इतके सगळे झाल्यानंतर रेमंडला दुसरे मूल होऊ देण्यात इंटरेस्ट नव्हता. जॉइसला घरी सोडून तो बॅरिस्टर होण्यासाठी लंडनला आला. जॉइसपासून मरेपर्यंत सुटका नाही याची त्याला आता खात्री पटली होती. जॉइसचे वय बत्तीस होते; पण एका बाळंतपणातच तिच्या पोटरीतला रेखीवपणा साफ नष्ट झाला होता. आपण काय ही घोडचूक करून बसलो असे रेमंडला वाटायला लागले. घटस्फोट घेता आला असता; पण तसे केले की त्याचे राजकीय जीवनच संपुष्टात आले असते. यॉर्कशायरचे लोक विचाराने इतके मागासलेले होते की, त्यांनी घटस्फोट घेतलेल्या उमेदवाराला निवडून दिले नसते. त्यातल्या त्यात एकच समाधानाची गोष्ट होती ती म्हणजे आसपासच्या लोकात जॉइस फार प्रिय होती. ट्रेड युनियनच्या लोकांमध्ये ती अगदी सहजपणे मिसळत असे. रेमंडच्या आईवडिलांनाही मुलाइतकाच सुनेचाही अभिमान होता. तिच्या लोकसंग्रहामुळेच त्याला दहाहजार मतांची आघाडी घेऊन जिंकणे शक्य झाले होते. जॉइस इतक्या सिन्सिअरली लोकांशी कशी वागू शकते ह्याचे रेमंडला नवल वाटायचे; पण ही सिन्सेरिटी तिच्या स्वभावातच आहे हे त्याला कधीच उमगले नाही.

'पंतप्रधानांचे बोलावणे आहे. तू नवीन ड्रेस का नाही विकत घेत?' रेमंडने चहा पिऊन उठता उठता विचारले. जॉइस हसली. बऱ्याच वर्षात रेमंडने असा प्रश्न विचारला नव्हता. रेमंडच्या आपल्याबद्दल काय भावना आहेत याची तिला पूर्ण कल्पना होती.

संध्याकाळी ते पार्टीला निघाले तेव्हा रेमंडने सगळ्या लेबर पार्टीच्या मंत्र्यांची नावे तिच्याकडून गाडीत परत परत वदवून घेतली. तिचा नवा ड्रेस रेमंडला तितकासा काही आवडला नव्हता.

गाडी थोडीशी दूरच उभी करून रेमंड जॉइसबरोबर पंतप्रधानांच्या बंगल्यापर्यंत चालत आला. खालच्या हॉलमधून वरच्या मजल्याकडे जिन्यावरून चढताना रेमंडने आधीच्या पंतप्रधानांच्या तसबिरी पाहिल्या. चेंबर्लेन, चर्चिल, एडन, मॅकमिलन, होमस... सगळे येरी ( कॉन्झर्व्हेटिव्ह ) फक्त ॲटली हाच काय तो अपवाद.

हॉलच्या दारातच पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन तोंडात पाईप धरून पार्टीच्या सदस्यांचे स्वागत करण्यास उभे होते.

रेमंड बायकोची ओळख करून देणार तेवढ्यात पंतप्रधान म्हणाले 'वा जॉइस, तू वेळात वेळ काढून आलीस हे छान झाले.'

'वेळात वेळ काढून? अहो, मी सगळा आठवडा याचीच वाट पाहात होते. रेमंडने माझी भरपूर तालीम करून घेतली आहे.'

जॉइसचा हा मोकळेपणा पाहून रेमंडला धक्काच बसला; पण तिचे उत्तर ऐकून हॅरॉल्ड विल्सन हसायला लागले ह्याकडे त्याचे लक्षच गेले नाही.

रेमंड पंतप्रधानांच्या पत्नीशी इंग्लंडमध्ये कवितासंग्रह प्रसिद्ध करणे कसे कठीण काम आहे ह्याची चर्चा करीत असताना जॉइस कामगार संघटनांच्या पुढाऱ्यांशी आणि त्यांच्या बायकांशी गप्पा मारण्यात दंग झाली होती.

पंतप्रधानांच्या पत्नीने काढता पाय घेतल्यावर रेमंड अमेरिकेच्या राजदूताकडे गेला. राजदूत डेव्हिड ब्रूस अँड्र्यू फ्रासरशी एडिंबरोच्या सणाबद्दल गप्पा मारीत होता. ब्रूस हा आपला अगदी जुना मित्र असल्यासारखी अँड्र्यूने त्याची रेमंडशी ओळख करून दिली. रेमंडने हस्तांदोलन करण्यापूर्वी हात पँटला पुसले. गरिबीतून वर आलेल्या माणसात जो न्यूनगंड असतो, तसा न्यूनगंड अजूनही रेमंडमध्ये होता. रेमंड ब्रूसशी प्रेसिडेंट जॉन्सनच्या व्हिएतनाम पॉलिसीवर चर्चा सुरू करण्याआधी अँड्र्यू स्कॉटलंडचे स्टेट मिनिस्टर, ह्यूग मॅकेंझीकडे गेला.

मॅकेंझीपेक्षाही अँड्र्यूला त्यांच्या मुलीमध्ये जास्त इंटरेस्ट होता. त्यांनी स्वतःहून ॲलिसनची अँड्र्यूशी ओळख करून दिली.

'मला ठाऊक आहे हे कोण आहेत ते' ॲलिसन म्हणाली, 'द टोरीज सिक्रेट मोल.' अँड्र्यू हसायला लागला.

'आज रात्री जेवायला तू कोठे जाणार आहेस का?' अँड्र्यूने तिला विचारले.

अँड्र्यूचा प्रश्न ऐकून तिला आश्चर्य वाटले.

'पंतप्रधानांच्या घरच्या पार्टीत अजूनपर्यंत माझ्याशी कुणी डेटींग केले नव्हते.'

'मी नेहमीच परंपरा मोडीत आलेलो आहे.' अँड्र्यू म्हणाला.


ॲलिसनने मान हलवून होकार दिला.

'आपण पंधरा-वीस मिनिटात निघूया. तोवर मी लोकांना भेटून घेतो.' असे म्हणून अँन्ड्र्यू पार्टीतील महत्त्वाचे लोक कोठे असतील ते पाहायला लागला. सगळे मंत्री आणि कामगार संघटनांच्या पुढाऱ्यांना भेटून अँन्ड्र्यू परतला तोवर ॲलिसन रेमंडशी बोलण्यात गुंतली होती. रेमंड तिला अमेरिकन निवडणुकांबद्दल सांगत होता.

'तू ह्या मुलीला पळविण्याच्या बेतात आहेस काय?' अँड्र्यूने इतक्या सहजपणे प्रश्न विचारला की, रेमंड चटकन् लाजला आणि गोंधळला. ॲलिसनचा हात धरून अँन्ड्र्यू पार्टीतून बाहेर पडला. रेमंडला वाटले इतक्या मोकळेपणे आपल्याला कधीच वावरता येणार नाही. त्याने इकडे तिकडे जॉइससाठी पाहिले. सगळे निघायच्या आत आपण निघालेले बरे.

अँन्ड्र्यू अगदी कॅबिनेट मिनिस्टर असल्यासारखे सिगीज क्लबमधले वेटर त्याच्या अवतीभोवती फिरत होते. अँन्ड्र्यू फ्रासरबद्दल ॲलिसन बरेच काही ऐकून होती. आता प्रत्यक्ष भेट झाल्यावर ती त्याच्यावर फारच खूष होती. जेवण झाल्यावर अँन्ड्र्यू तिला नृत्यासाठी घेऊन गेला. पहाटे जवळजवळ दोन वाजता अँड्र्यूने तिला तिच्या फ्लॅटवर सोडले.

'आज राहणार का इकडेच?'— तिने अगदी सहजपणे विचारले.



**अँड्र्यू—वडलांच्या पावलावर पाय**

¤

'छे, उद्या हाऊसमध्ये माझे पहिले भाषण आहे.'

'म्हणून आज हा पहिला अनुभव नको ?' डोळे मिचकावत म्हणून ॲलिसनने दार लोटून घेतले.

संध्याकाळी पाचच्या सुमारास अँड्र्यू भाषणाला उभा राहिला तेव्हा सभागृहातली उपस्थिती चांगली होती. स्कॉटलंड हा स्वतंत्र विभाग न राहता इंग्लंडचा भाग म्हणूनच राहिला पाहिजे हा अँड्र्यूचा भाषणाचा मुद्दा होता. हाऊस ऑफ कॉमन्सच्या रिवाजाप्रमाणे नवीन सदस्य ज्या वेळी पहिले भाषण करतो तेव्हा विरोधी पक्षाचे सदस्य भाषणात अडथळा आणीत नाहीत.

अँड्र्यूनं इतकी व्यवस्थित तयारी केली होती की त्याला एकदाही नोटस् पहायची गरज भासली नाही. तो भाषण संपवून खाली बसला तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी टाळ्या वाजविल्या. अँड्र्यूने वर पाहिले. प्रेक्षकांच्या गॅलरीत स्टु डंकन फ्रासरनी त्याचा शब्द न् शब्द ऐकला होता. आणि त्याच्या आईच्यासमोर ॲलिसन बसली होती, अँड्र्यूने पाहताच तिने हसून भाषण उत्तम झाल्याची पावती दिली.

पुढची दोन-तीन भाषणे झाल्यावर ॲलिसनला पाहायला अँड्र्यू हाऊसमधून बाहेर पडला; पण तोवर ती घरी निघून गेली होती. त्याने प्रेक्षकांच्या कक्षामधून आईवडिलांना चहासाठी बोलावणे पाठविले. बऱ्याचशा सदस्यांनी येऊन अँड्र्यूचे अभिनंदन केले. पण ॲलिसनचा पत्ता नव्हता.

संध्याकाळचे शेवटचे विमान पकडून अँड्र्यूचे आई वडील एडिंबरोला परतले. सरकारच्या वतीने शेवटचे भाषण ॲलिसनच्या वडिलांचे होते. ह्यूग मॅकेंझीनी अँड्र्यूच्या भाषणाची स्तुती केली. 'त्याचे हाऊसमधले पहिले भाषण असले तरी नवाशिक्याचे भाषण नव्हते.' ते म्हणाले.

डिबेट संपले आणि नेहमीसारखे रात्री दहाला मतदान झाले. निम्मे सभागृह टी रूमकडे निघाले. अँड्र्यूला हाऊस ऑफ कॉमन्स मधले पदार्थ कधीच आवडले नव्हते. त्याने फक्त कॉफी मागवली.

टी रूमच्या एका कोपऱ्यात रेमंड न्यू स्टेटस्मन वाचत बसला होता. लेबर पार्टीचे सदस्य अँड्र्यूचे अभिनंदन करताना त्याने पाहिले. त्याला गेल्या आठवड्यातल्या आपल्या भाषणाची आठवण झाली. युद्धात ज्यांचे पती मारले गेले अशा विधवांच्या पेन्शनचा प्रश्न त्याने मांडला होता; पण अँड्र्यूइतका त्याच्या भाषणाला प्रतिसाद मिळाला नव्हता. कदाचित आपण भाषण वाचून दाखविले म्हणून असेल असे त्याला वाटले.

कॉफी एका घोटात संपवून अँड्र्यू टेलिफोनशी गेला. खिशातल्या डायरीत नंबर पाहून फोन लावला. ॲलिसन तेव्हा नुकतीच आंघोळ आटोपून केस पुसत होती.

'मी पोहोचेपर्यंत वाळतील का ?' त्याने विचारले.

'नाही. वेळ लागेल.' ॲलिसन हसत म्हणाली.

'मग मी गाडी थोडी हळू चालवित येतो.'

अँड्र्यू दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता ॲलिसनच्या फ्लॅट मधून बाहेर पडला. आज रात्रीही ॲलिसनकडेच थांबायचे त्याने नक्की केले होते. आंघोळ करून न्याहारी घेता घेता त्याने आलेले टपाल चाळले. बऱ्याचशा अभिनंदनाच्या तारा होत्या. त्यात एक ह्यूग मॅकेंझींची होती. टाइम्स आणि गार्डियनमधले रिपोर्ट छोटेच होते; पण दोन्ही पेपरांनी त्याच्या भाषणाची नोंद घेतली होती.

हाऊस ऑफ कॉमन्सकडे निघण्यापूर्वी त्याने कमिटीपुढे आलेल्या बिलात जी सुधारणा सुचवायची होती तिचा मजकूर वाचून पाहिला. गाडी काढून तो वेस्टमिनिस्टरकडे निघाला.

पार्टीची मीटिंग साडेदहाला सुरू होणार होती. अँड्र्यू पाच-दहा मिनिटे आधीच पोहोचला. सभागृहाच्या टेलिप्रिंटरभोवती कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सभासद गोळा झालेले त्याने पाहिले. त्या घोळक्यात त्याचा 'पेअर' चार्ल्सही होता.

'काही विशेष ?' चार्ल्सच्या पाठीवर थाप मारत त्याने विचारले.

'सर अलेक्नी राजिनामा दिला आहे, आता टोरी पार्टीच्या नव्या नेत्याची निवडणूक घेतली जाईल.

'मग तुम्ही जिंकेल अशाच घोड्यावर पैसे लावा नाहीतर उगाच संकटात सापडाल' अँड्र्यू म्हणाला.

चार्ल्स फक्त हसला. त्यालाही माहीत होते चुकीच्या उमेदवाराला पाठिंबा दिला तर त्याच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होणार होता.

हाऊसमधून निघाल्यावर चार्ल्स सेमूर आपली डिमलर गाडी घेऊन वडिलांच्या बँकेत आला. गेल्या दोन पिढ्या ही बँक सेमूर कुटुंबियांच्या ताब्यात असली तरी प्रत्यक्षात त्यांच्याकडे फक्त दोन टक्केच शेअर्स होते. रूपर्टला बँकेच्या कामात कामात काही एक रस नव्हता आणि त्यामळे बँकेच्या बोर्डावर चार्ल्सची डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली होती. हाऊस ऑफ कॉमन्सचा सदस्य म्हणून चार्ल्सचा पगार वर्षाला एक हजार सातशे पन्नास पौंड होता. तेवढ्या पैशात त्याचे भागण्यासारखे नव्हते.

पहिल्या दिवसापासूनच बँकेचा चेअरमन डेरेक स्पेन्सर चार्ल्सच्या विरोधात होता. त्याला रूपर्टनेच डायरेक्टर व्हावे असे वाटत होते. त्याने तसे प्रयत्नही केले; पण चार्ल्सने त्याचे सगळे डाव हाणून

पाडले होते. चार्ल्स जेव्हा कॉन्झर्व्हेटिव्हच्या तिकीटावर निवडून आला तेव्हा स्पेन्सरने तो आता कॉमन्सचा सदस्य झाल्याने त्याला दोन्ही कामे सांभाळणे कठीण जाईल म्हणून त्याने संचालकपदाचा राजिनामा द्यावा असा आग्रह धरला; पण चार्ल्सने इतर संचालकांना पटवून दिले की, मंडळापैकी एक तरी संचालक कॉमन्सचा सदस्य असणे बँकेच्या हिताचे आहे. शिवाय तो म्हणाला की त्याला जर मंत्रीपद मिळाले तर तो संचालकपदाचा तात्काळ राजिनामा देईल.

चार्ल्स त्याच्या बँकेतल्या केबिनमध्ये बसला तरी त्याच्या डोक्यात विचार नेत्याच्या निवडणुकीचेच होते. त्याने सगळ्या नावांचा काळजीपूर्वक विचार केला. शेवटी त्याच्यापुढे रेगिनाल्ड माउडलिंग आणि एडवर्ड हीथ हीच दोन नावे राहिली. बँकेच्या संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये त्याला आता काडीचाही रस रस नव्हता. त्याचे सगळे लक्ष आता निवडणुकीकडे लागले होते.

मीटींगमध्ये मेक्सिको आणि पोलंड ह्या दोन्ही देशांच्या सरकारने मागितलेल्या कर्जाचा विषय कार्यक्रम पत्रिकेवर होता. फक्त एकाच देशाला कर्ज द्यावे ह्या मताचे संचालक मंडळ होते. दोन्ही देशांच्या कर्ज फेडण्याच्या ऐपतीबद्दल चर्चा झाल्यावर स्पेन्सरने प्रश्न केला—

'कोणत्या देशाकडे तुमचा कल आहे ?'

'हीथ' चार्ल्स म्हणाला.

तो काय बोलतो आहे हेच स्पेन्सरला कळेना. हाऊसमध्ये परतल्यावर चार्ल्स सरळ स्मोकिंग रूममध्ये गेला. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या सदस्यांमध्ये फक्त नव्या उमेदवाराबद्दल चर्चा चालू होती. अलेक् पिपकिनचे म्हणणे होते की, हीथ शॅडो चॅन्सेलर* असल्याने फायनान्स बिलाची चर्चा जेव्हा हाऊसमध्ये सुरू होईल तेव्हा सभासदांचे जास्तीत जास्त लक्ष हीथच्या भाषणाकडे राहील, याचा त्याला निवडणुकीत निश्चित फायदा मिळेल. हाऊसमध्ये परत आल्यावर चार्ल्सने हीथ आणि त्याच्या शॅडो टीमकडे लक्ष देण्याचे ठरविले.

फायनान्स बिलावरच्या एका सुधारणेवर रेमंडचे भाषण झाले. रेमंडकडे वक्तृत्व कला नसली तरी त्याचे मुद्दे तर्कशुद्ध होते. त्यामुळे त्याच्या भाषणाला चांगला प्रतिसाद मिळाला; पण चार्ल्सचे त्याच्याकडे लक्ष नव्हते.

इटॉन स्क्वेअरमधल्या आपल्या घरी तो परतला तेव्हा फिओना पलंगावर पडून वाचत होती. चार्ल्स इतका लवकर परतलेला पाहून तिला आश्चर्य वाटले. आंघोळीला जाण्यापूर्वी चार्ल्सने तिला दिवसाभरातल्या सगळ्या घटना सांगितल्या.

फिओना फालकिर्कच्या ड्युकची एकुलती एक मुलगी. अगदी लहानपणीच त्यांचे लग्न ठरलेले होते. मोठा झाल्यावर चार्ल्सचे बऱ्याच मुलींशी संबंध आले तरी विवाह फिओनाशीच होणार हे तो गृहीत धरून चालला होता. रूपर्टला मूलबाळ नव्हते. त्यामुळे ब्रिटिश रिवाजाप्रमाणे आपल्या मुलाकडे 'अर्ल' ही पदवी येणार याची फिओनाला खात्री होती; पण तरीही अजून त्यांना मुलगा काही झालेला नव्हता. फिओनाने स्वतःला डॉक्टरकडून तपासून घेतले होते. तिच्यात काहीच दोष नव्हता. डॉक्टरांनी तिला चार्ल्सलाही घेऊन यायला सांगितले; पण चार्ल्सने हे सगळे मूर्खपणाचे म्हणून उडवून लावले असते, त्यामुळे ती गप्प बसली.

ड्युकची एकुलती एक मुलगी फिओना दिसायला अतिशय सुंदर होती. चार्ल्स त्याच्या करिअरमध्ये इतका गुंतला होता की, बायकोसाठी त्याला फारच कमी वेळ असायचा. इतरांसारखे वैवाहिक सुख आपल्या वाट्याला नाही याची फिओनाला जाणीव होती. त्यामुळे चार्ल्सच्या ससेक्स डाऊन मतदारसंघातच तिचा जास्तीतजास्त वेळ जायचा. चार्ल्सची मतदारसंघातली सगळी कामे ती सांभाळायची.

चार्ल्स आंघोळ करून परत आला, तोवर फिओना कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या निवडणुकीबद्दलच विचार करीत होती.

'कुणाला पाठिंबा द्यायचे ठरविले आहेस तू ?' तिने विचारले.

'सर अलेक् होमस्नीच पार्टीचे प्रमुख रहावे असे मला वाटते. होमस् घराण्याशी आपल्या घराण्याचे जवळजवळ चारशे वर्षांचे संबंध आहेत.'

'ते ठीक आहे, पण सर अलेक् आता निवडणूक लढविणार नाहीत हे सगळ्यांनाच ठाऊक आहे.'

'तोच तर खरा प्रश्न आहे. सगळी दुपार मी याच विचारात घालवली. माउडलिंग आणि हीथ आपणहूनच रिंगणात उतरले आहेत; पण त्या दोघांशीही पाच मिनिटांपेक्षा जास्त माझे बोलणे कधी झाले नाही.'

'मग त्याचाच आपल्याला फायदा नाही का घेता येणार ?'

'तुला काय म्हणायचे आहे ?'

फिओनाने चार्ल्सला सगळा प्लॅन समजावून दिला. तिचे म्हणणे पडले की, ह्या दोघांमध्ये जर हीथच जिंकण्याची शक्यता जास्त असेल तर आधीच चार्ल्सने हीथसाठी सपोर्ट मिळविण्यास सुरवात करावी. नवीन निवडून आलेल्या टोरी सदस्यांना त्याने हीथच्या बाजूला वळविले तर हीथ जेव्हा शॅडो कॅबिनेट बनवील तेव्हा नवे मेंबर घेताना चार्ल्सचा विचार त्याला करावाच लागेल. फिओनाच्या एकूण बुद्धीचे चार्ल्सला कौतुक वाटले.

फिओनाने चार्ल्सला हीथसाठी पत्र लिहायला मदत केली. दुसऱ्या दिवशी सकाळी हीथने चार्ल्सला चहाला बोलाविले. तासभर हीथशी चर्चा झाल्यावर सौदा ठरला.

फिओनाने सगळ्या नव्या सदस्यांची यादी टाईप करून तयार ठेवली. पुढच्या आठ आठवड्यात त्यांनी त्यातल्या प्रत्येकाला इटॉन स्क्वेअरच्या घरी पार्टीला बोलाविले. ह्या निमंत्रणामागे काही विशेष हेतू

---

*शॅडो कॅबिनेट :— निवडणुकीमध्ये ज्या पक्षाचा विजय होतो त्याच्या नेत्याला राणीकडून मंत्रिमंडळ बनविण्यासाठी निमंत्रित करण्यात येते. मंत्रिमंडळाचे सदस्य ह्या नेता पार्टीचे हाऊस ऑफ कॉमन्समधील समीक्षक किंवा हाऊस ऑफ लॉर्ड्समधील सदस्य यांच्यातून निवडू शकतो. पराभूत झालेला पक्ष विरोधी पक्ष म्हणून सभागृहात बसतो. ह्या विरोधी पक्षाचा नेता पार्टीच्या हाऊस ऑफ कॉमन्समधील कामात सुसूत्रता यावी म्हणून जे मंत्रिमंडळ बनवितो त्याला 'शॅडो कॅबिनेट' असे म्हणतात. अशा पद्धतीमुळे सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांचा अभ्यास करून त्यावर टीका करणे शक्य होते. पुढे सरकार बनविण्याची संधी आली तर याच 'शॅडो कॅबिनेट'मधून प्रत्यक्ष मंत्रिमंडळ बनवणे पक्षनेत्याला शक्य होते. शॅडो चॅन्सेलर म्हणजे शॅडो फायनान्स मिनिस्टर, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये फायनान्स मिनिस्टरला चॅन्सेलर ऑफ एक्सचेकर असे म्हणतात.



**सायमन – महत्त्वाकांक्षी की 'पुशी'?**

आहे हे जाणवू नये, ह्याची तिने काळजी बाळगली होती. फायनान्स बिलाची चर्चा चालू असतानाही वेळात वेळ काढून हीथ चार्ल्सच्या घरी पार्टीत भाग घेत असे. सर अॅलेक् डग्लस होमसृच्या राजिनाम्याचा दिवस जसजसा जवळ येत गेला तसतसे चार्ल्सच्या लक्षात आले की, ह्या निवडणुकीच्या निकालावर हीथ इतकेच आपलेही भवितव्य अवलंबून आहे.

चार्ल्स आणि फिओनाची दुसरी पार्टी अटेंड केलेल्या सदस्यांपैकी एकाच्या लक्षात चार्ल्सचा डाव आला. केवळ आपल्या विषयीच्या प्रेमामुळे चार्ल्सने आपल्याला बोलावणे पाठविले आहे असे सायमन कसलेक्ला मुळीच वाटले नाही. सायमनला हीथ जिंकण्याची शक्यता वाटत नव्हती. एक तर माउडलिंग शॅडो फॉरेन सेक्रेटरी होते, शिवाय हीथपेक्षा ते पार्टीत अधिक काळ होते. फारसा महत्त्वाचा नसला तरी आणखी एक मुद्दा म्हणजे माउडलिंग विवाहित होते आणि हीथ अविवाहित. टोरी सदस्य अविवाहित माणसाला नेता म्हणून स्वीकारतील असे सायमनला वाटत नव्हते.

पार्टीतून निघाल्यावर सायमन तडक टॅक्सी करून हाऊस ऑफ कॉमन्समध्ये आला. माउडलिंगशी त्याची पुरेशी ओळखही नव्हती आणि माउडलिंगला ह्या नव्या सदस्याचे नावही धड आठवत नव्हते; पण त्याने सायमनचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घेतले. सायमनचे बोलणे त्याला पटले. शेवटी दोघांमध्ये असे ठरले की, सायमनने माउडलिंगसाठी नव्या सदस्यांकडून पाठिंबा मिळवायचा.

पण चार्ल्सपेक्षा सायमनची परिस्थिती वेगळी होती. हाऊस ऑफ कॉमन्स म्हणजे काही ऑक्सफर्ड युनियन नव्हे. चार्ल्स सेमूरसारखे त्याच्याकडे प्रशस्त घर नव्हते. फिओना डचुकची मुलगी त्यामुळे ग्लॅमरस होती. तर सायमनची बायको एलिझाबेथ सेन्ट मेरीज् हॉस्पिटलमध्ये डॉक्टर. सायमनच्या महत्त्वाकांक्षांना एलिझाबेथचा पूर्ण पाठिंबा असे पण तरीही तिला स्वतःची करिअर होतीच. सायमनलाही फिओनासारखी बायको आवडली नसती. एलिझाबेथचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व त्याला अधिक आकर्षक वाटायचे.

दुसऱ्या दिवशी सायमनने सगळ्या नव्या कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांची यादी तयार केली. त्यातून हीथ आणि माउडलिंगला मते देतील असे सदस्य वेगळे केले. एकूण सोळा सदस्य कुणाला मत देतील हे निश्चित नव्हते. आतापर्यंत इनॉक् पॉवेल म्हणून एका तिसऱ्या सदस्यानेही आपली उमेदवारी जाहीर केली होती.

चार्ल्सप्रमाणे सायमनला ह्या सदस्यांना पार्टीला बोलावणे शक्य नव्हते. एलिझाबेथला नोकरी सांभाळून ते शक्यही झाले नसते. त्याने माउडलिंगबरोबर निवडक सदस्यांच्या मतदारसंघाला भेट द्यायचे ठरविले. बोडमीन् ते ग्लॅसगो आणि पेनरिथ् ते ग्रेट यरमाउथपर्यंतच्या सगळ्या मतदारसंघात तो माउडलिंगला घेऊन गेला.

हळूहळू सगळ्या सभासदांच्या लक्षात आले की, चार्ल्स हा हीथचा तर सायमन हा माउडलिंगचा शिलेदार आहे. काही जुन्या सदस्यांना ह्या अशा प्रकारे हीथ आणि माउडलिंगने सदस्यांचा पाठिंबा मिळवायचा प्रयत्न करावा हे आवडले नाही. एलिझाबेथला माउडलिंग जिंकेल की नाही, याची शंका होती. तिने सायमनला तसे बोलूनही दाखविले.

सर अलेकनी बावीस जुलै एकोणिसशे पासष्ठला राजिनामा सादर केला. त्यानंतर पाच दिवसात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या नव्या नेत्याची निवड करायचे ठरले. सायमन आणि चार्ल्सला रात्रंदिवस काम करावे लागत होते. निवडणुकीचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतसे कोण निवडून येईल याची खात्री देणे कठीण झाले. वृत्तपत्रांची संपादकिये, ओपिनिअन पोल्स् आणि पोलिटिकल कॉलम्स् ह्यातून फक्त एकच गोष्ट स्पष्ट होत होती ती म्हणजे पॉवेल ह्या शर्यतीत तिसरा येईल. चार्ल्स आणि सायमन एकमेकांच्या समोरासमोर येण्याचेही टाळीत. फिओना प्रथम सायमनला खाजगीत आणि आता उघड उघड 'पुशी सेलफमेड मॅन' म्हणून उल्लेख करू लागली.

निवडणुकीच्या दिवशी चार्ल्स आणि सायमन दोघांनीही हाऊसच्या कॉरीडॉरमध्ये चकरा मारण्यात सगळी सकाळ घालविली.

पक्षाच्या नेत्याची निवड गुप्त मतदान पद्धतीने होते. मोजणी संपल्यावर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या सर्व सभासदांना कमिटी रूममध्ये बोलविण्यात आले. सर विल्यम ग्रे ह्यांनी निकाल जाहीर केला.

| | |
|---|---|
| एडवर्ड हीथ | १५० मते |
| रेगिनाल्ड माउडलिंग | १३३ मते |
| इनॉक पॉवेल | १५ मते |

निकालानंतर तासाभरातच माउडलिंगने हीथला फोन करून कळविले की, पार्टीचा डेप्युटी लीडर म्हणून हीथच्या हाताखाली काम करायची त्याची तयारी आहे.

सतत दीड महिन्यांच्या परिश्रमाला फळ आले होते. चार्ल्स आणि फिओनाने घरी शॅंपेनची बाटली उघडली सायमन एलिझाबेथला घेऊन नाटक पहायला गेला. नाटक सुरू झाल्यावर त्याला जी झोप लागली ती ते थेट तिसरा अंक झाल्यावर एलिझाबेथने त्याला उठविले.

दोन आठवड्यात एडवर्ड हीथने त्याची शॅडो टीम जाहीर केली. माउडलिंग डेप्युटी लीडर झाला. पॉवेलकडे संरक्षण खाते देण्यात आले आणि चार्ल्सला एनव्हॉयर्नमेंट टीममध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रवक्ता म्हणून बोलावणे गेले. नवीन सदस्यांमधून शॅडो टीममध्ये प्रवेश मिळविणारा चार्ल्स हा पहिला सदस्य.

सायमनला घरी पत्र मिळाले. रेगिनाल्ड माउडलिंगने स्वतःच्या अक्षरात पत्र लिहून सायमनचे आभार मानले होते. (क्रमशः)

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# एक साधी गोष्ट

लहानपणी एका मैत्रिणीकडे रहायला गेले असताना तिच्या आईनी तिच्या लहान भावाला उठवताना पायाला जोरात चिमटा घेतलेला पाहिला आणि मला मोठा धक्काच बसला. सकाळची सुंदर वेळ, डोळ्यांवरची गोड झापड लाडानी गळ्याला मिठी मारून बसलेल्या पोरासारखी लाडिकपणा करतीय् आणि कुणी तरी चिमटा काढणं ! करकचून.

आमच्याकडे पहाटे लवकर अभ्यासाला उठायची पद्धत होती. वडील उठून स्वतःचं सगळं शांतपणे कुणालाही त्रास न होता, धडपड, आवाज न करता आवरून आम्हा मुलांना उठवायचे. आवाज मृदू, कर्कशपणा नाही, राग नाही. त्यांचं ऐकून आमच्या घरातला पोपटही ऊठ ऊठ ऊठ ऊठ असं गोड आवाजात म्हणायचा.

आम्ही मुलं भर अभ्यासाच्या दिवसात रात्री सांगूनच झोपायचो–जाग आली नाही तर तोंडावर पाणी शिंपडून उठवा. मग सकाळी वडील विचारायचे 'पाणी शिंपडू का?' मी झोपेतच मान हलवून हो म्हणायची.

वडील कधी गावाला गेले आणि आईला सांगून ठेवलं सकाळी लवकर उठव म्हणून तरी ती उठवायची नाही. मग रागावून 'का ग नाही उठवलंस?' म्हटलं की म्हणायची, 'मला बाई जिवावर येतं झोपलेल्या मुलांना उठवायचं म्हणजे.'

अगदी लहानपणी तर आमच्या शेजारचे तात्या उठा उठा चिऊताई म्हणून हातात खाऊची पुडी देऊन उठवायचे. उठून बसल्यावर 'झाली का झोप?' म्हणून कौतुकानं आई वडलांनी विचारायचं मग आपण झोपून उठलो म्हणजे काही तरी फारच महत्त्वाचं सत्कृत्य केलंय असा अभिमान वाटायचा.

असा अभिमान माझ्या मोठ्या भावाला पण वाटायचा. त्याला कप भरून बशीत सांडून बशी भरून दूध लागायचं. दूध बशीत सांडलेलं नसलं तर तो फुरंगटून बसायचा आणि म्हणायचा 'मग? मी आता झोपून उठलोय मला बशीत सांडून दूध पाहिजे.'

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर सकाळी उठवताना कुणी आईनं तिच्या मुलाला करकचून चिमटा काढणं कसं सहन व्हावं ? पण आई झाल्यावर मात्र ते समजायला लागलं.

सकाळी उठून चहा, आंघोळी, केर, स्वयंपाक, डबे भरणं, मुलांचा अभ्यास सगळं उरकून साडेनऊ दहाला ऑफिससाठी बाहेर पडणं ही रोजची धावपळ असली की चार हाका मारून न उठणाऱ्या मुलाचा राग यायला लागतो. ऊठ राजा सहा वाजले इथपासून सुरुवात करून आठ वाजले. उठतोस का नाही आता ? उचलून मोरीत ठेवीन हं. इथपर्यंत उठवण्याचा सूर चढत जातो.

अनेक पालक सांगतात आम्हाला अगदी मुलांच्या कलानी घ्यायला आवडेल; पण घाई इतकी असते ना, की रागावल्याशिवाय चालतच नाही.

आपण आपापल्या मुलांना कसं उठवतो ? अगदी विचार करण्याजोगं आहे. आपण लांबून हाका मारून उठवतो का ? इतर काही टीकेची वडवड करत उठवतो का ? खडाखडा दार वाजवून उठवतो का ? उठवताना मुलाला प्रेमळ स्पर्श करतो का ? गदा गदा हलवतो का ? चिमटे काढून, खसकन् दिशी पांघरूण ओढून उठवतो का ? कसं उठवतो ? त्याच्या दिवसाची सुरुवात कशी करून देतो ?

काही घरांमध्ये सकाळी रेडिओ लावायची पद्धत असते. ते परिचित संगीत ऐकत मुलं उठतात. एका होस्टेलचे मुख्य एकदा सांगत होते प्रत्येक खोलीशी जाऊन दार खडखड करत उठा उठा म्हणून ओरडण्याची पद्धत होती, त्या होस्टेलमध्ये. पण यांनी ती बदलली. सकाळी प्रसन्न वाटेल अशा संगीताची एक टेप आणली. होस्टेलच्या व्हरांड्यात स्पीकर्स बसवले आणि रोज सकाळी ते संगीत फक्त सुरू करायचं. मुलं प्रसन्नपणे उठायला लागली आणि अनेकांनी सांगितलं की यामुळे दिवसभर कसं छान वाटतं !

आमचे एक काका सकाळी लवकर उठून चहा करायचे आणि काकूंना उठवायचे 'आता उठायचं बरं का. चहा झालाय बरं का' असं अतिशय सौम्यपणे म्हणायचे. त्यांची इतर नातेवाईक चेष्टा करायचे. पण मला ते फार आवडायचं ऐकायला. ह्या काकूंच्या दिवसभरातल्या कष्टांना हे सकाळचं उठवणं शक्ती पुरवत असावं असं वाटायचं.

रात्रीच्या गाढ झोपेत आपलं मन कुठे असतं कुणास ठाऊक ! कुठल्या अज्ञात प्रांतांमध्ये सफरी करत असतं. देहभान नसतं. हा अज्ञानातला प्रवास म्हणजे अखेरच्या अज्ञातातल्या प्रवासाचं छोटं स्वरूपच. मग ह्या प्रवासातून परत आल्यावर स्वागत प्रसन्नपणे नको व्हायला ?

शाळेत असताना कुणीतरी सांगितलं होतं की, रात्री म्हणे आपण झोपलो तरी आपला आत्मा उठून पाणी पिऊन येतो. तो पाणी पीत असताना कुणी पाण्याच्या भांड्यावर झाकण ठेवलं तर आपण मरतो. मला किती तरी दिवस हे खरं वाटायचं. मग झोपताना मी काही दिवस माठावरचं झाकण काढून ठेवत होते, ते आईनं पाहिलं आणि जाम झापलं. उंदीर, झुरळं, पाली माठात शिरतील वगैरे सांगितलं, तेव्हा मी कारण सांगितलं त्यावर घरातली सगळी ते येईल जाईल त्याला सांगून खो खो हसत होती. मग मी दुसरा मार्ग काढला. प्रत्येकाच्या आत्म्यासाठी एकेक भांडं भरून मी स्वैपाकाच्या ओट्यावर ठेवत असे. हे वेड मग नंतर गेलं; पण भांडी ठेवूनही मला प्रत्येकाच्या आत्म्याला आपापलं भांडं सापडेल कसं ही चिंता तेव्हा असायची. अशा कुणीतरी सांगितलेल्या गोष्टी लहान मुलं किती गंभीरपणे खऱ्या मानतात, ते लक्षात आलं की, गंमत वाटते.

कित्येकदा उठून आपण काय करणार यावरही उठतानाची प्रसन्नता अवलंबून असते. तरुणपणी गेलेल्या माझ्या भावाची बायको सांगत होती, 'उठावंसंच वाटत नाही हो. काय करायचं उठून ? त्यांना चहा करून

द्यायचा नाही का डबा भरून द्यायचा नाही. ज्याच्यासाठी उत्साहानं उठायची, करायची सवय तीच गेल्यावर कसं उठावसं वाटेल ?

उठल्यावर काही छान करायचंय् अशी खात्री असली की, माणूस उत्साहानं उठतं. सकाळी लवकर उठायचा कंटाळा असलेल्या मुलीला जेव्हा सांगितलं होतं की, तुझं अंघोळीचं गरम गरम पाणी मी काढून ठेवीन आणि तुला हाक मारीन, मग उठशील पटकन् ? ती हो म्हणाली, आणि त्या अमिषानी लवकर उठायला लागली. पोहायला जाणं सुरू केलं आणि तिला लवकर उठण्यात रस निर्माण झाला. एरवीसुद्धा तिच्या मैत्रिणी रहायला आल्या की, ती लवकर उठते. सुट्टीच्या दिवशी हमखास लौकर उठते. सहलीला जायचं असलं की, आपण होऊन, लवकर उठते. तिनी मनानी ठरवलं की, ती लवकर उठते; पण सकाळी उठून अभ्यासालाच बसायचंय् म्हटलं की, तिचा उठण्यातला रस संपतो.

हा उठण्यातला रस निर्माण करण्यासाठी आपण पालक काय करू शकू ? मग चिमटे काढावे लागणार नाहीत. पांघरूण ओढावं लागणार नाही आणि उठवतानाच्या मारामाऱ्याही होणार नाहीत. उठवण्याची रोजची साधी क्रिया प्रसन्न, सुंदर काव्यमय, प्रेमळ करता येईल का आपल्याला ? □

पुस्तके

## उलटलेली पाने

# पत्रकारितेचा निखळ अनुभव

'उलटलेली पाने' हे एका पत्रकाराच्या जीवनातील उल्लेखनीय प्रसंगांचे चित्रण करणारे पुस्तक आहे. व्यक्तिच्या आयुष्यात अनेक अविस्मरणीय अनुभव, आठवणी घर करून बसतात. प्रत्येक 'पान' सोनेरी अक्षरांनीच लिहिण्याजोगं नसेलही; तरीपण जीवनाच्या उत्तरार्धात या बऱ्या-वाईट अनुभवांची पुन्हा उजळणी करणं हा निश्चितच आनंदाचा भाग आहे. पत्रकार य. द. लोकुरकरांनी 'उलटलेल्या पानांमधून' वृत्रपत्रक्षेत्रातील आपल्या ५० वर्षांच्या वाटचालीचा मागोवा घेतला आहे.

पुस्तक वाचताना सुरुवातीलाच एक चांगली बाब जाणवली, ती म्हणजे 'आत्मचरित्र' या भारदस्त प्रकारापेक्षा 'मनमोकळ्या आठवणी' या स्वरूपात लेखकाने आपले अनुभव मांडले आहेत. संपूर्ण जीवन सांगण्यापेक्षा विशिष्ट क्षेत्रातील आठवणी वाचकाला बरेच काही सांगून जातात. त्यामुळे लोकुरकरांची 'व्यक्ती' म्हणून ओळख होतानाच एका 'पत्रकाराचे' दर्शनही या पुस्तकामधून घडते.

बातमीदाराचे जीवन किंवा एकंदरच पत्रकारितेचा व्यवसाय हा अनेकांच्या औत्सुक्याचा विषय आहे. बहुतेक राजकीय-सामाजिक घटना नित्यनेमाने वाचकांपुढे बातमीच्या माध्यमातून येत असतात; परंतु ती वाचकांच्यापर्यंत पोहोचविणाऱ्या पत्रकाराची कार्यपद्धती, त्या घटनांचं साक्षीदार होणं, त्या घटनांवरून वार्ता तयार करणे, ती सर्वांच्या आधी आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करणं, ह्याचीच एक 'वार्ता' तयार होते. लोकुरकरांचे हे पुस्तक म्हणजे अशा 'वार्तांचा' संग्रह आहे.

पत्रकार व्हायचे असेल तर अमुक-अमुक गुणांची आवश्यकता आहे, पत्रकार हे विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचे असतात असे आपण बरेच वेळा ऐकतो. इथे मात्र लेखकाने सुरुवातीलाच 'प्रचंड हौस' हे एक महत्त्वाचे 'क्वालिफिकेशन' सांगून टाकले आहे. लोकुरकरांचा या क्षेत्रातील प्रवेश हा हौसेपोटीच झालेला आहे आपण लिहिलेला मजकूर प्रसिद्ध होणं यासारखा दुसरा आनंद नाही. शाळेत असताना गुरुजींना दिलेल्या निरोप समारंभाची बातमी लेखक एका नियतकालिकाला पाठवतो आणि तीन-चार ओळीत का होईना ती छापूनही येते. त्यावेळेला झालेला आनंद हीच लोकुरकरांच्या पत्रकारितेच्या जीवनाची सुरुवात. हा आनंद आणि विनाविलंब वार्ता वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे समाधान याच्या जोरावरच मी वृत्रपत्र व्यवसायातील आजवरचा प्रवास केला असे त्यांनी सांगितले आहे. आणखी एक प्रसंग लेखकाने इथे सांगितला आहे की, ज्यामुळे त्यांना या क्षेत्रात पडावेसे वाटले. पुण्याच्या तुरुगातून गुप्तपणे गांधीजींची मुक्तता केली जात असताना, एका वार्ताहराने मागच्या मोटारीत बसून त्यांचा पाठलाग कसा केला व स्टेशनवर त्यांची भेट कशी घेतली, याचे वर्णन 'ज्ञानप्रकाश' मध्ये छापून आले व सर्वांच्या आधी बातमी मिळवून ती वृत्तपत्र वाचकाला विनाविलंब देण्यात केवढे मोठे समाधान असते याची चुणूक मला त्यात दिसली असे लोकुरकरांनी म्हटले आहे.

अशा एकेक आठवणी लिहिताना लोकुरकरांनी पत्रकारितेच्या व्यवसायाचे अनेक पैलू आपल्याला उलगडून दाखविले आहेत. या क्षेत्रात दिवसेंदिवस वाढत जाणारी स्पर्धा पत्रकाराच्या जीवनातील अस्थिरता, अनेक ठिकाणी भ्रमण करण्याची मिळत असलेली संधी आणि महत्त्वाच्या घटनांचा 'आँखो देखा हाल' सांगण्याचे भाग्य अशा अनेक गोष्टी स्वानुभवावरून सांगितल्या आहेत. शिवाय त्यातून तत्कालीन राजकारण व इतर पत्रकारांचे व्यक्तिदर्शनही लेखक घडवितो.

पुण्याचे त्यावेळचे प्रसिद्ध दैनिक 'ज्ञानप्रकाश'. लोकुरकरांच्या कारकिर्दीला याच दैनिकातून सुरुवात झाली. संपादक काकासाहेब लिमयांनी आपल्याला प्रोत्साहन कसे दिले व त्यामुळे पत्रकारितेचे प्रारंभीचे धडे आपण कसे गिरवले याचे वर्णन लोकुरकरांनी केले आहे. त्यानंतर टाईम्समध्ये लोकुरकरांचा प्रवेश झाला. मराठी दैनिकातून इंग्रजी दैनिकात गेल्यानंतर वाटलेला बदलही लेखकाने स्पष्ट केला आहे. त्यावरून त्यावेळच्या वृत्तपत्रसृष्टीची एकंदर कल्पना येऊ शकते.

तत्कालीन राजकारणाचेही बरेच संदर्भ लेखकाने दिलेले आहेत. कांग्रेसची ठिकठिकाणची अधिवेशने, संस्थाने विलिनीकरणाचा प्रश्न, विभक्त मतदारसंघांना विरोध करण्यासाठी गांधीजींना केलेले २१ दिवसाचे उपोषण अशा अनेक घटनांचे त्यांनी प्रत्यक्ष केलेले निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे पत्रकाराचे अनुभव वाचत असताना हा सगळा इतिहासही वाचायला मिळतो आणि एवढे करूनसुद्धा कुठल्याही राजकीय भूमिकेचा पुरस्कार लोकुरकरांनी केलेला नाही ही एक सुखद बाब. त्यामुळे निखळ पत्रकारिताच वाचल्याचा आनंद मिळतो.

### काही ठिकाणी मौन

इतर व्यवसाय आणि पत्रकारितेचा व्यवसाय यांच्यातील फरकही लेखकाने चांगल्या रितीने दाखवून दिलेला आहे. त्याचे एक गमतीदार उदाहरण द्यायचे झाले तर लोकुरकरांना आलेला एक अनुभव इथे सांगितला पाहिजे. मुंबईतली एक वार्ता घेण्यासाठी ते गेलेले असताना वाटेत त्यांना एका वेगळ्याच घटनेचा सुगावा लागला. चार जणांचे एक कुटुंब समुद्रात बुडून कसे विचित्रपणे मृत्यूच्या दाढेत ढकलले गेले याची ती वार्ता होती. लोकुरकरांनी ती 'टाईम्स'कडे पाठविली व त्याचे वर्णन दोन कॉलमी मथळ्यासह पहिल्या पानावर प्रसिद्ध झाले. इतर वृत्तपत्रांच्या आधी वार्ता पाठविल्याबद्दल टाईम्सचे खास १०० रुपयांचे बक्षिस त्यांना मिळाले. सामान्य लोकांच्या मनात जी कटु-स्मृती म्हणून एखादी गोष्ट राहते तीच पत्रकाराच्या जीवनातील सुस्मरणीय घटना होऊन बसते. पत्रकाराचं हे वेगळं जग या पुस्तकातून लोकुरकरांनी फार चांगल्या रितीने उभे केलं आहे.

एकंदरीतच हे पुस्तक खूपच वाचनीय झाले आहे तरीही एक अपुरेपणा पुस्तक वाचत असताना सारखा जाणवतो. अनेक राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार झालेल्या लोकुरकरांनी त्याबाबत आपली काहीच प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. राजकीय भूमिका न घेणं याचा अर्थ प्रतिक्रियाच व्यक्त न करणं असा होत नाही. गांधी व जीनांच्या वाटाघाटी चालू असताना वार्तेची प्रतिज्ञा करीत लोकुरकर व इतर पत्रकार चार दिवस त्या ठिकाणी थांबले होते पण शेवटी जेव्हा जीनांनी फक्त वाटाघाटी फिसकटल्याचे जाहीर केले तेव्हा एक पत्रकार म्हणून लोकुरकरांची त्यावेळी काय प्रतिक्रिया होती? हे वाचायला आपण उत्सुक असतो पण त्याबाबतीत त्यांनी मौनच पाळले आहे. वार्तापत्रे कोणत्या पद्धतीने किती वेळात पाठविली हे लिहीत असतानाच काही वार्तापत्रांचे नमुनेही द्यायला हरकत नव्हती. ऐतिहासिक घटना आणि पत्रकाराचे व्यावसायिक जीवन या दोन्ही गोष्टी समांतर वाटतात. ही एक उणीव हे पुस्तक वाचताना जाणवली.

वार्ताहराचे जीवन कसे असते याची कल्पना येण्यासाठी हे पुस्तक जरूर वाचले पाहिजे. जुन्या पत्रकारांच्या स्मृतींना उजाळा देणारं हे पुस्तक आहेच पण या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या नवोदितांसाठीही हे पुस्तक उद्‌बोधक आहे.

**— निरंजन आगाशे**

'उलटलेली पाने'<br>
य. द. लोकुरकर<br>
श्रीविद्या प्रकाशन<br>
पृष्ठे : १८९<br>
किंमत : रु. ३७-५०

---

## घर राहिले दूर

---

**डॉ.** मधुकर जावडेकरांची 'घर राहिले दूर!' ही कादंबरी वाचली व खूप आवडली.

चिंतामणी सखाराम टोणपे. गोत्र–मलमूत्र, घराण–फुटपाथ, शिक्षण–गरिबीतून एम. ए., नोकरी– ए. बी. सी. कंपनीत सी. डी. एस. ऑफिसर, पगार–चार आकडी. प्रशस्त फ्लॅट, रंभेसारखी बायको.

पण श्रीयुत टोणपे अस्वस्थ आहेत. एवढी सुखं हाताशी असतानाही मुंबईतले फुटपाथ, झोपडपट्टी बघून त्यांच्या मनावर एक 'टेन्शन' साठून राहिलंय. ते बुद्धीवादी आहेत. महत्त्वाकांक्षी पण, गरिबीतून ते ह्या पदावर आलेले आहेत.

वॉलपेपरने मढविलेल्या सुंदर बेडरूममध्ये रात्रभर मस्त बायकोला कुशीत घेऊन झोपल्यावर सकाळी जागं होताना डनलॉपची गुबगुबीत गादी त्याला हा साक्षात्कार घडवीत असे आणि मग दिवसभर बेचैनीत जाई.

डॉ. जावडेकरांनी 'चिंतामणी सखाराम टोणपे' प्रसंगातून, संवादातून उभा केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांचं अस्वस्थ मनोविश्व पण ते उभं करू शकलेले आहेत.

सुंदर फ्लॅट, खाली गाडी, सुंदर बायको, चार आकडी लठ्ठ पगार, उच्च मध्यमवर्गीय संस्कृतीचा हा प्रतिनिधी! पण कुठंतरी खुपतंय. अस्वस्थ वाटतंय. एकीकडे सुख उपभोगायचा हव्यास आहेच; पण अंतर्मख मन त्याच्यातल्या माणुसकीला सारखं खुणावतंय.

टोणपे असहाय्य आहे. दुःख बघून संतापण्याखेरीज, अस्वस्थ होण्याखेरीज त्याला उपाय नाहीय. एकीकडे सुख भोगण्याची लागलेली सवय! तो त्या वातावरणातून दूर जाऊ इच्छीत नाही. आपल्या ऐश्वर्याचा त्याग करू इच्छीत नाही. मग हे टेन्शन! दारू ही त्याची सखी बनते आणि दारूच्या कैफात मोकाट सुटलेलं त्याचं बंडखोर मन!

टोणपे भरल्यापोटी कविताही करतात. त्यांच्या मते कविता करणेही खोटं वाटायला लागतं. खोटं वाटणं ही मध्यमवर्गीय चैनच आहे.

डॉ. जावडेकर 'टोणपे'च व्यक्तिमत्त्व साकार करताना, उच्च मध्यमवर्गीयांची उथळ सामाजिक बांधिलकी, सुखासिन प्रवृत्तीमुळे आलेली भोगवृत्ती व आर्थिक सुबत्तेमुळे तुटलेली सामाजिक, धार्मिक नात्यांची बंधने व त्यातून मोकाट सुटलेलं मन. त्यालाच बंडखोर हे नाव देऊन समाधान मानावयाची वृत्ती यावर नकळत टीका करतात.

अशा परिस्थितीत राठोड गुरुजी टोणप्यांना भेटतात. महागाई वाढतेय, पेन्शन पुरत नाही, शरीर थकलंय, अशा परिस्थितीत गुरुजी त्याच्या मोठेपणाची स्तुती करत चाळीस रुपयांची मागणी करतात आणि मरायच्या आधी ते परतही करतात. डॉ. जावडेकरांनी राठोड गुरुजींच्या रूपानं कनिष्ठ मध्यमवर्गीयांची हलाखीची परि-

स्थिती; पण तेवढाच प्रामाणिकपणा या जगात शिल्लक आहे हे सूचित केलंय.

लेखक छोटचा छोटचा संवादातून व्यक्तिरेखा उभी करतो. तसेच संवादातूनच कादंबरीला वळणं देतो, ती वेगवान करतो.

उच्च संस्कृतीतील स्त्री व तिचे स्थान लेखक रमेच्या रूपानं जाताजाता उभं करून गेलाय.

वाहवा ! वाहवा ! बायको ही
सुंदर किती तरी खचीत खरी !
तर आता ती घेउनिया
आपुली आपण भोगू या !
आम्ही फेकू ! आम्ही झेलू !
आलिंगू ! आम्ही चुंबू !
आता थोडे दूर सरू
हो हो ! कपडे निट करू !
तर ही आपली बायको
अन् हे आपले घर.

कसे निवांत, सुशोभित, सुंदर याला कोणीही हात लावू शकत नाही. कारण कायदा ! आणि हाच कायदा पल्याड फुटपाथवरच्या झोपडया एका रात्रीत उस्तरून टाकतो. डॉ. जावडेकरांनी अशा प्रसंगातून सामाजिक विषमता विरोधाभास दाखववण्याचा प्रयत्न केलाय.

जाता जाता जावडेकर म्हणून जातात. रात्री मधेच तो जागा झाला. त्याच कैफात त्यानं बायकोला कवेत गोळा केलं. गरिबांचं कल्याण सकाळी उजाडल्यावर करता आलं असतं !

टोणप्यांच्या ऑफिसमधला सिंघवी काविळीनं गेला. त्याच्या शोकसभेत राजेबाईंना भाच्याच्या नोकरीचं आश्वासन देणारी टोणपेची बायको रमा वाचकाच्या डोळयासमोर नखशिखांत उभी राहते.

कादंबरीच्या शेवटी लेखकानं संवादातून मोठे वळण देऊन लगेच शेवटही केलाय.

'असं कसं हो झालं ?'

'काय ?'

'टोणप्यांचं ?'

'वय वाढलंय, टेन्शन वाढतंय अन् पिणही तेवढयाच प्रमाणात.'

'घरी कोण कोण आहेत ?'

'बायको तर असणार.'

'शोकसभा ?'

'आज संध्याकाळी आहे. पाच वाजता.'

कादंबरी संपते. साधे संवाद, साधे कथानक अगदी सोप्या शब्दात समर्थपणे उभी करण्यात लेखक निश्चितच यशस्वी झालाय.

**—भरत अवचट**

घर राहिले दूर !
डॉ. मधुकर जावडेकर
स्मिता प्रकाशन, पुणे
पृष्ठे : २६१
मूल्य : पन्नास रुपये

---

# आनंदयात्री बोरकर : एक श्रवणानुभव

**वि. भा. देशपांडे**

---

कविता भागायची नसते, भोगायची नसते असे नेहमी म्हटले जाते. खरे तर ती व्यक्तिगत पातळीवर आत्मसुखाय म्हणून भोगायची असते. हे जितके सत्य तितकेच ती समूहामध्येही तितकाच आनंद देऊ शकते असाही अनुभव असतो. ह्या अनुभव अलीकडच्या काळात पु. ल. देशपांडे आणि सुनीताबाई ह्या दोघांनी काही कविता वाचन—गायनाचे कार्यक्रम करून मोठया प्रमाणात दिला आहे.

नुकताच त्यांनी कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या कवितांवर आधारीत असलेला कार्यक्रम पेश करून त्यांना आदरांजली वाहिली. बोरकरांची कविता ही तुमची आमची कविता आहे. ही कविता वाचता—ऐकताना असे वाटते की, बोरकरांनी आपल्यासाठी निसर्ग भरून पाहिला. तो जितका पाहिला त्याच्या कितीतरी पटीने त्यांनी काव्यओंजळींतून तितक्याच आनंदाने आपल्यासाठी उधळला. त्यातले काही तुषारकण आपल्या अंगी झोंबले आणि आपण धन्य झालो. वाटले की, जणू आपणच बोरकरांच्या डोळयाने सारा निसर्ग पाहिलाय. बोरकरांनी या जगात येऊन निसर्ग आणि माणूस किती आणि केवढा पाहिला ह्याचे मोजमाप नाही. निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या गोव्यातच ते जन्मले, वाढले तेव्हा त्यांना निसर्ग-दर्शनासाठी वेगळे कोठे जाण्याची गरजच नव्हती. तशी गोव्यात हजारो माणसे जन्मली; पण सर्वांनाच प्रतिभेचे देणे नव्हते स्वतःला भावलेले शब्दात व्यक्त होण्याची किमया नव्हती. ती बोरकरांकडे होती !

अशा प्रतिभावान बोरकरांनी उदंड काव्यनिर्मिती केली. त्यातल्या निवडक कवितांचे वाचन—गायन पु. ल. आणि सुनीताबाई यांनी केले. ह्या कार्यक्रम पेश करीत असताना त्यांनी बोरकरांच्या कवितांचे कृत्रिमपणाने भाग पाडले नाहीत किंवा समोरच्या श्रोत्यांना काव्यातला काहीच गंध नाही असा पवित्रा घेऊन 'समजावून' सांगण्याचा आव आणला नाही. या उलट समोरच्या श्रोत्यांना संगतीला घेऊन, बोरकर आपल्याला कसेकसे भेटले, भावले, ते अगदी सहजपणाने सांगत गेले.

पु. लं. नी सुरुवातच अशी केली की, पन्नास वर्षांपूर्वी आपल्या आजोबांकडे पार्ल्याच्या घरी बोरकर कविता गुणगुणत कसे आले, तेव्हा ते आपल्याला कसे दिसले वगैरे. त्यावेळी त्यांनी म्हटलेली 'तेथे कर माझे जुळती' ही कविता म्हटल्यावर आपल्या आजोबांनी एक रचना कशी केली इत्यादी सारा तपशील अगदी काल—परवा घडल्यासारखा सर्वांसमोर समूर्त उभा केला. १९३४ ते १९८४ पर्यंतचा पन्नास वर्षांचा बोरकरांचा हा काव्यप्रवास. या काव्यप्रवासात श्री. सौ. पु. ल. आणि बोरकर असंख्य वेळा परस्परांना भेटले. अगदी शेवटच्या काळापर्यंत. प्रत्येक भेटीत काव्य हा मध्यवर्ती भाग. गप्पा कोणत्याही असोत कविता गायन हे असायचेच. ते कसे व्हायचे, कसे घडायचे ते पु. लं. नी अनेक आठवणींतून व्यक्त केले. या आठवणी बोरकरप्रेमाने चिंब झालेल्या होत्या. त्या आठवणीत स्वतःच्या मोठेपणापेक्षा बोरकरांच्या जीवनदृष्टीचे, जीवनानुभवाचे, प्रतिभेचे कौतुक अधिकतेने व्यक्त व्हायचे. तेच महत्त्वाचे होते. बोरकर कधी म्हणाले असतील— 'चालसी किती मुसाफिरा ...एकटेचपणा तुझा असह्य हो चराचरा !' या एकटेपणाच्या प्रवासातच त्यांना वाटले असेल 'तापल्या आहेत तारा तोवरी गाऊन घे' तसे बोरकर अखेरपर्यंत गातच होते. त्या प्रवासातच त्यांना 'जपानी रमला' भेटली. तिच्या सहवासातली रात्र बोरकरांना जितकी सुखावणारी तितकीच अनुभूतीच्या

पातळीवर आपल्याला हवीहवीशी वाटणारी. या प्रवासात त्यांना वाटून गेले

ओळखीचे कुणी अनोळखी कुणी
नकळत अंतर मंतरणारे
भेटावे मज वळणावरती
उन्हात दवसे मावळणारे...

या भेटीच्या ओढीने ते निसर्गात हिंडत राहिले. तो निसर्ग त्यांच्या कानामनात सतत घुमत होता. ते निसर्गचिच झाले होते. मध्येच त्यांना 'गडद निळे, गडद निळे जलद भरूनि आले' हे कळायचे. मध्येच वाटायचे की 'हळद लावूनी आले ऊन' पुढे तर त्यांची अवस्था या निसर्गाच्या सान्निध्यात पंढरपूरच्या वाळवंटातील वारकऱ्यासारखी नामदेवासारखी झालेली असणार. सारे पांडुरंगमय व्हावे तसे बोरकर स्वतःच निसर्गाच्या सान्निध्यात तल्लीन होऊन नाचू लागले आणि त्याच समाधीस्थ अवस्थेत म्हणू लागले.

क्षितिजी आले भरते ग
घनात कुंकुम खिरते ग
झाले अंबर, झुलते झुंबर
हवेत अत्तर तरते ग ।।...

अशा बोरकरांना जीवन सर्वार्थाने आकळले होते. ते म्हणून गेले– 'जीवन त्यांना कळले हो, मीपण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो' असे जीवन ज्यांना नेमकेपणाने कळाले तो कवी जीवनाच्या अनेक अंगांचा आस्वाद घेण्यात मग्न राहणार. त्यांना लौकिकातला स्वार्थही कळला होता आणि परमार्थातील सत्त्वही ध्यानी आले होते. तरीही जीवनासक्ती कमी होत नव्हती. असा कवी केव्हाही म्हणणारच 'इतुक्या लौकर येई ना मरणा.' पण मरण अटळ होते. ते अखेरीस आलेच. ते येते आहे असे कळल्यावर हा कवी 'तमस्तोत्र' गायला लागला आणि ते गातागाताच आपली सफळ संपूर्ण यात्रा त्यांनी संपवली.

ही सारी जीवनयात्रा, काव्ययात्रा किंवा खरे तर आनंदयात्रा पु. ल.–सुनीताबाईंनी अवघ्या दोन–अडीच तासात श्रोत्यांना घडवली. ती घडवताना आवश्यक ती अलिप्तता आणि पुरेशी तन्मयता त्यामध्ये होती. काही गंभीर कवितांच्या वेळी बोरकरांच्या छायाचित्राकडे पाहून वातावरण अधिक गंभीर व्हायचे. त्या वातावरणात आपल्याला आतून गलबलल्यासारखे केव्हा झाले ते ध्यानातच यायचे नाही. पुन्हा एका वेगळ्याच भाववृत्तीत गेल्यावर ते दोघे जेव्हा म्हणायला लागायचे 'समुद्र बिलोरी आयना, सृष्टीला पाचवा महिना' किंवा 'सरीवर सरी आल्या ग' तेव्हा आपण मनात त्या ओळी गुणगुणायला केव्हा लागलो, हातापायांनी ताल कधी धरला हे ध्यानी यायचेच नाही. श्रोत्यांना समरसून टाकण्याची किमया या कार्यक्रमात होती. ह्या साऱ्या कविता केवळ मराठीतल्या नव्हत्या, तर कोकणी, पोर्तुगीज अशा वेगळ्या भाषेतल्याही होत्या. त्या त्या भाषेतला ढंग अस्सलपणाने पु. लं. नी पकडला.

ही आनंदयात्रा अनुभवून घरी परतताना अनेक विचार मनात गर्दी करीत होते. त्यात एक सूत्र होते की, हा नेहमीसारखा मनोरंजनाचा कार्यक्रम आपणही पाहिला नाही आणि पु.लं.नीही त्या दृष्टीने पेश केला नाही तर अशा कार्यक्रमांतून पु. ल. दोन गोष्टी साधीत आहेत. एक तर त्यांना आवडलेला कवी ते हजारोंना सहजपणाने उलगडून सांगत आहेत. त्यांच्या मनात खोलवर रूजवत आहेत. दुसरे म्हणजे आम्हा रसिकांची अभिरूची घडवीत आहेत. काय पाहावे, काय ऐकावे, काय वाचावे हे जे लोक आवर्जून, आनंदाने सांगतात तेच समाजाची अभिरूची घडवीत असतात. हे एक फार मोठे सांस्कृतिक कार्य उभयता करीत आहेत. अगदी निरपेक्षपणाने, विनम्रपणाने. आपल्याला भावलेला अनुभव शब्दांतून व्यक्त करण्याचे काम जसे सर्वांसाठी बोरकरांनी केले, तसेच पु. ल. आणि सुनीताबाई आपल्याला मिळालेला आनंद आम्हा सर्वांपर्यंत पोहोचवीत आहेत. अशा कार्यक्रमांचे मोल फार, फार असते म्हणून मनःपूर्वक धन्यवाद ! □

चित्रपट

# प्रतिभा हरवलेला 'प्रतिभा'

अंजना सक्सेना (रामेश्वरी) ही एक संशोधक. अभिजीत खन्ना (बेंजामिन गिलानी) तिचा संशोधक मित्र. दोघांचं प्रेम. अंजनाच्या वडलांची लग्नाला मान्यता. अभिजीतच्या आईवडलांबाबत काही उल्लेख नाहीत. बहुतेक त्याला कुणी नसावंच. त्यामुळे हॉवर्ड विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळालेले अंजना आणि अभिजीत तिकडे जाऊन बरोबरीनं संशोधन करण्याची स्वप्नं बिनघोर रंगवत असतात. तेवढ्यात अंजनाची आत्या 'खानदानकी इज्जत' चा झेंडा फडकवत येते. मुलीचं लग्न बिरादरीतच करा नाहीतर बिरादरीवाले फाडून खातील, असा भावाला धाक घालते. त्याप्रमाणे अंजनाला यतीन भटनागर (दिलीप धवन) नामक एका बिरादरीतल्या युवकाला दाखवण्याचा कार्यक्रम होतो. अंजनाची आपल्याला ओळख होते ती सालस, आईवडलांचा प्रत्येक शब्द झेलणारी मुलगी म्हणून. तेव्हा संशोधक असलेली, स्वतःचा स्वतःचा विचार करायची हिंमत असलेली आणि अभिजीतबरोबर स्वतःचं स्वतः लग्न ठरवलेली अंजना दुसऱ्या मुलाबरोबर लग्न करण्याचं नाकारू शकत नाही, हे आपण गृहीत धरायचं. एकीकडे 'सगळं ठीक होईल' (म्हणजे अभिजीतशीच अंजनाचं लग्न होईल) असा अंजनाला धीर देणाऱ्या वडलांचा मुलगी यतीनला दाखवण्यामागं काय हेतू तेही कळत नाही. असो, दरम्यानच्या काळात वडलांना अपघात होतो आणि त्यातच ते मरतात. त्यामुळं घरची जबाबदारी अंगावर येऊन पडलेली अंजना आपल्या शिष्यवृत्तीची मुदत वाढवून घेते आणि अभिजीत एकटाच पुढं जातो. इकडं सगळं स्थिरस्थावर झाल्यावर अंजना शिष्यवृत्तीची मुदत संपायच्या आत परदेशी जायचं ठरवते; पण मुलीच्या निर्णयावर नाराज असलेली आई हाय खाते आणि तिला हार्ट अॅटॅक येतो. तेव्हा अंजना जायचंच रद्द करते. म्हणून अभिजीतही परत भारतात यायचं ठरवतो. आईच्या मनासारखं व्हावं आणि

संशोधन अर्धवट सोडून अभिजीतनं भारतात परत येऊ नये म्हणून अंजनापुढं एकच पर्याय-यतीनशी लग्न करणं. ती दोन अटी घालते— लग्नानंतर आई तिच्याकडे राहील आणि ती नोकरी करणार नाही. त्याप्रमाणे शादी होते; पण लग्नानंतर यतीनचं खरं स्वरूप बाहेर येतं आणि अंजना मजबूरन नोकरी करत राहते. अंजनाच्या वाढत्या प्रसिद्धीनं यतीन-मध्ये न्यूनगंड निर्माण होतो. त्याचा परिणाम लैंगिक जीवनावर. हे दाखवण्यासाठी नंतर बराच वेळ रात्रीच्या एका ठराविक वेळेला येणारी शयनदृश्य, यतीनला 'ताईचा सल्ला' देणारी डॉक्टरीणबाई आणि यतीन-अंजनाची भांडणं— या त्याच त्याच दृश्यांवर चित्रपट रेकॉर्ड अडवल्यागत फिरत राहतो. दरम्यानच्या काळात अभिजीत परत येणं, यतीननं अंजनाच्या चारित्र्याचा संशय घेणं, यतीनचा डाव यतीनवरच उलटवण्याचा अंजनाचा यशस्वी प्रयत्न वगैरे घोळ होतात. शेवटी यतीन–अंजनाला दोघांचंही चुकल्याचं कळतं आणि ते एकमेकांचा स्वीकार करतात.

'प्रतिभा' या नीलायम चित्रपटगृहात मॅटिनीला दाखल झालेल्या चित्रपटाची ही कथा इतक्या विस्तृतपणं देण्याचं कारण म्हणजे हा चित्रपट कुठल्या सदरात मोडतो, हे प्रेक्षकांनीच ठरवायचं आहे. म्हणजे जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे ही फक्त एका करियरीस्ट स्त्रीची मानसिक कुतरओढ आहे, हा एका कर्तृत्ववान स्त्रीच्या यशस्वी वाटचालीचा आलेख आहे, हा एका वेगळ्या चौकटीतला प्रेमाचा त्रिकोण आहे, पती–पत्नीतील ताणलेल्या संबंधाची कहाणी आहे की, पतीपेक्षा पत्नी कर्तृत्ववान झाल्यानं कौटुंबिक जीवनावर आलेल्या सावटाचं चित्रण आहे. करियरीस्ट स्त्रीची कुतरओढ दाखवणारा 'सुबह' जसा विषयाशी प्रामाणिक राहिल्यानं प्रभावी ठरतो, तो प्रामाणिकपणा 'प्रतिभा' च्या कथेत नाही. पतीपेक्षा पत्नीचं कर्तृत्व श्रेष्ठ ठरलं म्हणजे पतीमधला पुरुषी अहंकार कसा उफाळून येतो आणि ह्यामुळं सारं कौटुंबिक जीवनच कसं उध्वस्त होतं या विचारांचे 'अभिमान', 'हमकदम' सारखे वास्तववादी चित्रपट इतिहास निर्माण करून गेले; पण या चित्रपटांमधून हा वेगळा विषय ज्या बांधीवपणे हाताळला गेला, तो बांधीवपणा 'प्रतिभा' त औषधालाही नाही. कर्तृत्ववान स्त्रीच्या यशस्वी वाटचालीचा आलेख 'श्रद्धांजली' त ज्या सहजसाध्या पद्धतीनं आखलाय, त्या सहजसाधेपणाचा या चित्रपटात मागमूसही नाही आणि पती पत्नीत अकारण निर्माण झालेले ताण तणाव 'आविष्कार' मध्ये ज्या संवेदनक्षमतेनं चित्रित केले आहेत, ती संवेदनक्षमताही नाही की 'प्रतिभा' म्हणजे नेहमीचा प्रेमाचा त्रिकोणही नाही. वास्तविक 'प्रतिभा' चा विषय वर्तमान-काळाशी खूपसा सुसंगत आणि म्हणूनच प्रेक्षकवर्ग मिळवू शकणारा; पण या प्रकारचे विषय हाताळण्यासाठी आवश्यक असा प्रामाणिकपणा, बांधीव कथासूत्र, संवेदनक्षमता या सर्वच बाबतीत हा चित्रपट कमी पडतो. त्यामुळं चित्रपटाचं नाव 'प्रतिभा' असलं तरी प्रत्यक्षात मात्र सगळा ठणठणाटच आहे.

## ठोकळेबाज चित्रण

वास्तविक वर दिलेल्या सगळ्या विषयांपेक्षा वेगळ्या अशा एका दृष्टीकोनाचं परिमाण या चित्रपटाला लाभलं होतं. तो म्हणजे पत्नीच्या कर्तृत्वानं दबून गेलेल्या पतीमध्ये कसा न्यूनगंड निर्माण होऊ शकतो आणि त्याचा परिणाम लैंगिक जीवनावर आणि पर्यायानं संपूर्ण कुटुंबसंस्थेवर कसा होऊ शकतो. भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीप्रमाणे पत्नी पतीच्या कर्तृत्वात रममाण होत असली तरी पती मात्र पत्नीच्या कर्तृत्वात सहभागी होऊ शकत नाही. तो तिच्याइतकाच कर्तृत्वान असेल तर त्याच्यातला पुरुषी अहंकार फणा काढेल आणि तिच्यापेक्षा खालच्या पातळीवर असेल तर न्यूनगंडानं पछाडेल. 'प्रतिभा' चा नायक दुसऱ्या सदरात मोडणारा. तेव्हा नायक नायिकेच्या संसारात अशी अढी आहे–हे दाखवायचं म्हणजे सारखी शयनदृश्यच दाखवायला हवीत का? एक शॉट शयनदृश्याचा की पुढचा शॉट डॉक्टरीणबाईकडचा— हे किती वेळा दाखवायचं? एखादी डॉक्युमेंटरी तर पाहात नाही नां— अशी शंका निर्माण होते. या ठिकाणी केवळ सूचकतेचा योग्य वापरही अधिक परिणामकारक ठरू शकला असता; पण दिग्दर्शकानं वीट येईपर्यंत तीच तीच दृश्यं दाखवण्याचा ढोबळपणा स्वीकारला आहे. बरं तर बरं, शयनदृश्य टाकण्याचा एवढा मोह होता, तर तिथं चित्रणात तरी काही कलात्मक आविष्कार असावा की नाही? ते ही नाही. ठराविकच एक–दोन कोन साधून केलेलं ठोकळेबाज चित्रण. मध्यंतरानंतरच्या अर्धा चित्रपटभर हेच दाखवायचं होतं तर आधीच्या अर्ध्या भागातल्या फापटपसाऱ्याची गरजच काय होती? सरळ या विषयापासूनच चित्रपटाला सुरुवात करून पुढं नीटसपणे फुलवत तरी न्यायचा होता आणि जर एका करियरीस्ट स्त्रीचा लढाच दाखवायचा तर नंतरची शयनदृश्यांची रेलचेल तरी कशासाठी? आणि चित्रपटाच्या पहिल्या अर्ध्या भागात जवळ जवळ दर पाच मिनिटाला एक या वेगानं घटना घडत राहतात तर पुढील अर्ध्या भागातील गती अगदीच संथ.

चित्रपटातले रामेश्वरी, दिलीप धवन आणि बेंजामिन गिलानी, तिघंही कलाकार अद्याप उमेदवारीच्या काळातून बाहेर न आलेले. वास्तविक रामेश्वरी ही एक गुणी कलाकार. 'दुल्हन वही जो पिया मन भाए' या पहिल्याच चित्रपटात ती चांगली छाप पाडून गेली; पण तिच्या अभिनयाला वाव देणारे चित्रपट मात्र नंतर तिला कधीच मिळाले नाहीत आणि अलीअलीकडे तर ती चित्रपटसृष्टीतून जवळ जवळ बाद झाल्यासारखीच होती. 'प्रतिभा' तील तिच्या अभिनयात 'दुल्हन' ची सहजसुंदर रामेश्वरी मुळीच सापडत नाही. संपूर्ण चित्रपटभर हिचा चेहरा आपला कायम एरंडेल प्यायल्यासारखा. बेंजामिन गिलानीला कामच मुळात थोडंच, त्यामुळं काम चांगलं करूनही प्रभाव पडत नाही. दिलीप धवनच्या अभिनयाबद्दल काही बोलायलाच नको. दिग्दर्शन कोण्या एका चिरंजीव धवननं केलय. त्याबद्दल आधी बरंच येऊन गेलं आहे.

तेव्हा चित्रपटाचं नाव 'प्रतिभा' असलं तरी चित्रपटात ना लेखनाच्या प्रतिभेचा आविष्कार, ना अभिनयाच्या प्रतिभेचा आविष्कार, ना दिग्दर्शनाच्या प्रतिभेचा आविष्कार!

–शुभदा रानडे

# अमिताभ गरीब व्हायला निघालाय!

'माझ्या समृद्ध जीवनाचा मला कंटाळा आलाय. म्हणूनच मला आता गरीबांसाठी काही करायचंय.' असं अमिताभनं म्हटलंय अमिताभ बच्चनने. तो लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभा राहिला त्यावेळच्या त्याच्या मुलाखतीतलं हे एक डोळ्यांपुढे सर्रकन लकाकलेलं वाक्य आणि शहारे आणणारंही!

अमिताभ माझा आदर्श होता असं नाही. पण एक सुविद्य अभिनेता म्हणून त्याला 'मानणं' भाग होतं. त्याचं समृद्ध जीवन त्यानं खऱ्या अर्थानं कमावलेलं होतं. अभिनेत्या बापाचा गोंडस पुत्र म्हणून प्रेक्षकांच्या माथी मारला गेलेला नट नव्हता तो.(सॉरी, रणधीर 'डब्बू') विश्वजीतच काय जॉय मुखर्जीसारखे चेहरे खपतात तर मी का खपू नये असला 'नवीन निश्चली' खाक्याही नव्हता त्याचा.

लंबू म्हणून हिणवला गेलेला, तशाच ताडमाडी चेहऱ्याचा, सौंदर्य सोडाच तसं मर्दानी सौष्ठवही नसलेला इच्छुक फक्त; पण अभिनयाचा बुलंद आत्मविश्वास, आवाजात असलेल्या किमयेची जाणीव आणि उसळती जिद्द या जोरावर हिंदी चित्रसृष्टीचा चेहरामोहरा पालटून टाकला त्यानं. आनंदमध्ये बनियनबाहेर टांगलेले त्याचे हाताचे सुळके पाहिलेल्या प्रेक्षकांनीच त्याला पुढे प्रसंगी 'हॅन्डसम' म्हणून स्वीकारला हे त्याचं कर्तृत्वच म्हटलं पाहिजे. जंजीरमध्ये तसा त्याचा अभिनय जुजबी होता; पण प्राणला विलक्षण आत्मविश्वासाने त्यानं दिलेली टक्कर प्रेक्षकांना भावली आणि त्याहूनही अधिक निर्मात्यांना.

मला व्यक्तिश: आवडला तो त्यानं बावर्चीला काटशाह दिला तो. पिचपिचे डोळे करीत, मान तिरकी करून सामान्य माणसाच्या जवळ जात नायक होण्याचं जे रसायन खन्नासाहेबांनी शोधलं होतं, त्याला हे सणसणीत उत्तर होतं. राजेश खन्ना सामान्य वाटतो- तुमच्या-आमच्यासारखाच-हे त्याच्या यशाचं रहस्य मानलं जायचं. कथानकांचा तुटवडा असलेल्या पण तरीही भरघोस वाढलेल्या चित्रपटसृष्टीनं नायकाच्या प्रतिमेबद्दल अशा वेळोवेळी अनेक गफलती केल्या आहेत. राजेशबद्दलची गफलत सर्वात मोठी ठरावी. पिटातल्या प्रेक्षकालाही त्याच्यासारखाच वाटेल, असा जर नायक असायला हवा तर प्रेक्षकांनी त्याच्यासाठी टाळ्या का द्याव्यात. जीव का टाकावा? वेगळेपण म्हणून काही चित्रपटांना प्रेक्षकांनी गर्दी करणं वेगळं आणि आता 'हीरो' एकदम सामान्य दाखवू या असा आगळा फॉर्म्युला निर्माण होणं वेगळं. मग 'हीरो' शब्दाचा अर्थ काय–? बसमध्ये माझ्या शेजारी बसणारा माणूस हा सहजगत्या हेमामालिनी गटवू शकतो हा त्या फॉर्म्युलाचा खरा अर्थ होतो की, जो अर्थातच फसवा असतो.

राजकपूरनं सामान्य हीरो उभा केला होता हे जर त्याच्या चित्रपटांचं खरं यश असतं तर असा सामान्य आदर्शाचा कळस गाठणारा त्याचा 'मेरा नाम जोकर' का पडला. हे कोडं न उलगडणारे ठरेल. प्रेक्षकांच्या दुर्दैवानं राजनं नंतर झीनत–पद्मिनी यांचा सौंदर्यस्थळं म्हणून जो प्रेक्षणाय उद्धार केला त्याचा उल्लेख न करणं बरं.

राजेश खन्ना एक कसदार अभिनेता म्हणून शोभला तो अमर प्रेममध्ये. तिथं त्याचं शरीर 'आडवं' आलं नाही उलट त्यानं हातच दिला; पण अमर प्रेमचा नवाबी रुबाब तोलण्याची शान राजेशनं दाखवली नाही. ती शान दाखवावी फक्त राजकुमारनं. म्हणूनच राजेशचा पार 'जनता हवालदार' झाला तरी राजकुमारचा भाव एका पैशानं कमी झाला नाही.

राजकुमार या नावानंच लेखणीही थोडी झुकतेच. हीरो असावा तर असा. ज्याच्या 'लाल पत्थर'मधल्या नुसत्या चालण्यानं श्वास रोखला जावा असा. ज्याचा दिल बहलावा म्हणून सारंगियानं संगीतालाही फर्मान काढावं असा. अमिताभच्या आवाजाला, त्याच्या त्रिशूलमधल्या एन्ट्रीला टाळ्या देणाऱ्या प्रेक्षकांनी टाळ्या नंतर आखडत्या घेतल्या कारण खरा रूबाब, खरी बुलंदी अमिताभनंच नंतर स्वस्त करून टाकली. त्याच्या अभिनयाचं खरं सामर्थ्य दिसलं ते दीवारमध्येच. फाटक्या कपड्यात काडी चघळणारा मजूर आणि पांढऱ्या सुटात परवीनपुढं पेश होणारा स्मगलर दोन्ही अभिनयाची, खंबीर रूपं आहेत.

अमिताभ सामान्य म्हणून समोर आला; पण वर गेला तो अन्यायाशी टक्कर देणारा म्हणून. राजेशसारखं सामान्यच राहण्यातलं सौंदर्य सांगत बसला नाही तो; पण प्रेक्षकांच्या प्रतिसादाचा अनावर मोह पडल्यानं मग अन्याय बाजूला राहिला अन् टक्कर देणंच महत्त्वाचं ठरलं. मग पॉप्युलर होण्यासाठी दादागिरी आली (आणि दुर्दैवाने त्या ताडमाड देहावर साडीही आली.) त्याचा 'मुकद्दर का सिकंदर' पाहताना स्पष्ट जाणवलं या अँग्री यंग मॅनलाही प्रेक्षकांच्या सहानुभूतीसाठी सगळं गमावून-संपत्ती–स्त्री–आयुष्य–पडद्यावर रक्त सांडावं लागतंय! इथं तथाकथित सिकंदर चक्क सहानुभूतीसाठी भणंग होतो.

अमिताभनं आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर, जिद्दीनं उभं केलेलं अभिनयाचं साम्राज्य गफलतीच्या मार्गावर नेऊन डबघाईला आणलंच होतं. प्रेक्षक डोक्यावर घेतात म्हणून त्यानं हातात फक्त पिस्तुल घेतलं, तानपुरा कोपऱ्यात टाकला. ( 'कभी कभी' मधलं त्याचं कवित्व लोकांना भरपूर रुचलं होतं हे तो स्वतःही विसरून गेला. ) लाल डोळे आणि गळ्यात रुमाल बांधताना आपल्यातला एक संवेदनशील आणि एक विनोदवीर असे दोन्ही 'अभिनेते–अमिताभ' आपण मारून टाकतोय हे त्याच्या ध्यानात यावं एवढा वेळ त्याच्याकडे नव्हताच.

म्हणूनच आपल्या 'नंबर वन'च्या जागेचा अर्थ त्यानंही अभिनयातलं सर्वोच्च पद असा लावला असावा कदाचित. त्यामुळंच शक्तीमध्ये दिलीपच्या अभिनयापुढं फिका पडलेला अमिताभ त्याच्या चाहत्यांनाही विलक्षण त्रास, एक अनपेक्षित फस्ट्रेशन–देऊन गेला. जे राज कपूरचं 'मेरा नाम' ने केलं तेच अमिताभचं 'महान'ने आणि शराबीने करून टाकलं.

अमोल पालेकरही सामान्य हीरो म्हणून पडद्यावर आला; पण त्याच्या मर्यादांमुळे आणि सामान्यच राहण्याच्या कयेमुळे तो चार

चित्रपटात संपला. अमिताभनं त्याच्या जबर सामर्थ्यामुळं एक युग खेचून धरलं. म्हणूनच आपण काही असलं तरी अमिताभला मानत होतो. त्याच्या समृद्ध जीवनाचं–त्यातल्या जयाच्या आणि रेखाच्या उपस्थितीतीसह आपल्याला एक आकर्षण होतं.

पण आज सगळी गफलत झालीय.

पडद्यावर गरीब म्हणून येऊन आलीशान महल उभारण्याचं कर्तृत्व दाखवणारा एक अभिनेता आज खरंखुरं, कष्टानं, टॅलेन्टनं उभारलेलं समृद्ध जीवन–सगळी तपस्याच कस्पटासारखी लेखून गरीब व्हायला निघालाय. समृद्धीचा कंटाळा आला म्हणून !

अमिताभ, तू हे काय करतोयस ?

–शिवराज गोल

# नाट्यपंढरी



## तयांचे प्रेम खरे !

पूर्वी पतीमागून सती जाण्याची चाल होती. काही मनोभावे आत्मार्पण करणाऱ्याही होत्या. पण बहुसंख्य स्त्रियांना मनात नसताही सती जाणे भाग पडे. भाग पाडले जाई. श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या मागे आपण जगूच शकणार नाही, या भावनेने आत्मार्पण करणाऱ्या रमाबाईचे सती जाणे मोठ्या कौतुकाचे ठरले.

पण बदलत्या जगरहाटीत, ज्यावेळी काही प्रेयसींनी आपल्या प्रियकराच्या मरणानंतर आत्मार्पण केले. ( लौकिकदृष्ट्या आत्महत्या ) त्यांचे कौतुक झाले नाही. उलट निंदाच झाली. कुत्सित टीकाही झाली. आपल्या नाट्यसृष्टीत अशा दोन घटना अगदी अलीकडच्या काळात घडल्या आहेत. त्या म्हणजे गंगाधरपंत लोंढे नि विमल पटवर्धन आणि नागेश जोशी नि नलिनी बर्वे.

### लोंढे–पटवर्धन

लोंढे हे भरदार देहयष्टीचे, स्वच्छ वाणीचे, गोड गळ्याचे गायक नट. गंधर्व–हिरो म्हणून गाजलेले. चित्रपटातलाही त्यांचा प्रवेश कीर्ती देऊन गेलेला. त्यांनी स्वतःची 'राजाराम संगीत मंडळी' सुरू केलेली. विमल पटवर्धन खानदान कुटुंबातली दृष्ट लागेल अशी तरुणी. शिवाय पदवीधर. लोंढ्यांनी तिचे कॉलेजच्या नाटकातले काम पाहिले नि तिचे रूप–वाणी–अभिनयावर निहायत खुष झाले. ही मुलगी आपल्याकडे काम करायला हवी असे त्यांच्या मनाने घेतले. त्यावेळी रंगभूमीवर स्त्रिया फारच कमी होत्या. प्रेक्षकांची अपेक्षा तर स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या अशीच होती. स्त्री पात्रांचा जमाना संपुष्टात येत होता. योग असा, विमलचे वडील नाटकाचे शोकी नि रसिक होते. त्यांनी लोंढ्यांच्या विनंतीला होकार दिला. विमल कंपनीत आली. गणपतराव बोडसांची तालीम मिळाली. ती 'सौभद्र' मध्ये रुक्मिणी नि 'संशयकल्लोळ' मध्ये कृत्तिका म्हणून उभी राहिली. 'ती आली, तिने पाहिले, नि तिने जिंकले' याच चालीवर तिने रसिकांची उदंड लोकप्रियता मिळविली. लोंढे–कृष्ण तर विमल–रुक्मिणी गणपतराव फाल्गुनराव, तर विमल कृत्तिका. सौभद्र, संशयकल्लोळची रंगत वाढली. गल्लाही वाढला. राजारामचे रसिक मालक म्हणून लोंढे–विमलचीही गट्टी जमली; पण लोंढे हृदयविकाराच्या झटक्याने अचानक गेले. विमल पटवर्धनला एकाकी वाटू लागले. नाटकाची रंगत संपली. त्या खऱ्या अर्थाने कृष्णमय झाल्या होत्या. लोंढ्यांवर त्यांचा जीव जडला होता. लोंढ्यांचे मरण त्यांना सहन होईना. जीव रमेना. त्यांनी दोन-तीन दिवसातच विषप्राशन करून आपली जीवनयात्रा संपविली. रंगभूमीवरची एक उगवती चांदणी निखळून पडली.

### नागेश–नलिनी

'बालमोहन' मधूनच 'कलाविकास' जन्माला आली. छोटा गंधर्व, नागेश जोशी, आपटे, कोरडे, सुमन मराठे, नलिनी बर्वे अशी कलाकारांची सुरेख प्रभावळ जमली होती. यातला प्रत्येक जण बालमोहनमध्ये गाजलेला होता. बुद्धिवान विनोदी नट म्हणून नागेश लोकप्रिय होताच. त्यात त्याच्या 'देवमाणूस' नाटकाला उदंड यश लाभलेले. कलाविकासमधले सततचे एकत्र रहाणे नि नागेशचे लोकांकडून होणारे वाढते कौतुक, यातूनच नलिनी–नागेशची जवळीक जडली. कालांतराने यशाचा पारा खाली उतरला. कलाविकास कोसळली. नागेश मद्याच्या आहारी गेला. संसार उधळला; पण तशा हलाखीच्या अवस्थेतही नलिनीने नागेशची साथ सोडली नाही. एक दिवस नाटकात काम करीत असताच नागेशच्या जीवन-नाट्यावर अखेरचा पडदा पडला. नलिनीच्या दृष्टीने सारेच आटोपले होते. दुसऱ्याच दिवशी तिने आत्महत्या केली. ती इतकी धीराची, की सांगून विश्वास बसणार नाही अशा तऱ्हेने ती मरणाच्या सामोरी गेली. कसब्यातली एकटीशी खोली. घरातले सर्व सामान भिंतीलगत नीट ठेवलेले. मध्यभागी मोकळ्या जागेत अंगावर रॉकेल ओतून घेऊन स्वतःला जाळून घेतले. हू की चू केले नाही. घरातून धुराचे लोट आल्याने शेजाऱ्यांनी दार फोडले, तो आत नलिनीचा कोळसा झालेला. एक चिठ्ठी लिहून ठेवली होती म्हणे ! 'नागेशशिवाय जगणं मला सहन होत नाही. शक्य नाही.'

विमल पटवर्धन नि नलिनी बर्वे या दोन अभिनेत्रींच्या आत्महत्येची–आत्मार्पणाची आठवण झाली की, एक वेडा विचार मनात येतो की, विमल किंवा नलिनी या अपघाताने व अकस्मिक आजाराने आधी गेल्या असत्या तर लोंढे किंवा नागेश जोशी यांच्या हातून हे धाडस झाले असते का ? का स्त्री नि पुरुषाच्या प्रेमात हा मूलभूत फरक आहे ? एक प्रीत ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाची नि दुसरी भ्रमराची !

## ' श्याम ' आणि ' राधा 'चा गौरव

नासिक येथील सार्वजनिक वाचनालय या संस्थेतर्फे यंदा आयोजित केल्या गेलेल्या कै. वि. मा. दी. पटवर्धन स्मृती पारितोषिक स्पर्धेत ' काही दिवस श्यामचे, काही राधाचे ' या फिरोज रानडे यांच्या विनोदी कथा-लेखसंग्रहास पारितोषिक मिळाल्याचे नुकतेच संस्थेकडून कळविण्यात आलेले आहे. लेखकाचे अभिनंदन.

राजहंस प्रकाशन
पुणे.


संचित ठेव योजना !

# काळ चालला पुढे, पुढे . . .

म्हणून " उद्या " चा विचार करा
अनोख्या ठेव्यात त्याचे
रूपांतर करा !

उद्याचा विचार आजच नको का करायला ?
नंतर पश्चात्ताप करून काय उपयोग ?

उद्याचे स्वप्न साकार करण्यासाठी
आमच्या संचित ठेव योजनेचा फायदा घ्या.

आज बँकेत २५,००० रुपये ठेवा
व दहा वर्षांनी त्याचे
७४,००० रुपये बँकेकडून घ्या.

अधिक माहितीसाठी
नजीकच्या शाखेला भेट द्या !

बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा नवीन उपक्रम )
मुख्य कचेरी :
" लोकमंगल "
१५०१ शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

# पॉवर गेम इज द रियल गेम....

शेवटी पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सनना पौंडाच्या अवमूल्यनाची घोषणा करावीच लागली. अवमूल्यनाला रेमंडने आधीपासूनच त्याच्या पुस्तकांतून, भाषणांतून जाहीर विरोध केला होता. त्यामुळे सरकारातून आपल्या पदाचा राजिनामा देण्यावाचून त्याला पर्यायच उरला नाही. कारण प्रश्न तत्त्वाचा होता.

जॉईसने त्याला विचारले, तू काय करणार आहेस ? तेव्हा त्याने त्याचा राजिनाम्याचा निर्णय कळवून घाईघाईने पंतप्रधानांना पत्रही पाठवून दिले.

राजिनाम्याचं पत्र वाचून पंतप्रधानांनी तात्काळ त्याला फोन केला.

"रे"

"गुड मॉर्निंग प्राईम मिनिस्टर."

"तू अजून वार्ताहरांशी बोलला नाहीस ना ?"

"नाही. तुम्हाला पत्र मिळेपर्यंत राजिनामा वृत्तपत्रात जाहीर करायचा नाही असं ठरवलं होतं मी."

"उत्तम. मला भेटेपर्यंत कुणाशीच काही बोलू नकोस. तुला तावडतोब येथे येता येईल का ?"

"येस प्राइम मिनिस्टर."

"पण वार्ताहरांना टाळून ये."

अशा विचित्र ताणतणावात पंतप्रधानांशी रेमंडचं काय बोलणं झालं, रेमंडने राजिनामा दिला का ? त्याच्या राजिनाम्यामुळे त्याच्या आजूबाजूच्या राजकारणावर काय परिणाम झाला आणि त्याचे सहकारी सायमन, अँड्रयू आणि चार्ल्स यांच्या राजकीय प्रवासानं कोणती वळणं घेतली ते पुढील अंकात......

□

# शर्यत........

## पंतप्रधानपदासाठी चाललेल्या सत्ताशर्यतीचं चित्रण करणारी मती गुंग करणारी कादंबरी....